१८. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा चिद्विलासवाद

थोडा पूर्व इतिहास

काही वर्षापूर्वी कोल्हापुरचे वे.शा.सं. **बाळाशास्त्री हुपरीकर** यांनी शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या तत्त्वज्ञानांत फरक आहे हे दाखविण्याकरिता एक निबंध लिहिला. त्यासंबंधी मी मुमुक्षु वर्तमानपत्रातून चर्चा करून श्रीज्ञानेश्वरमहाराज व शंकराचार्य यांच्या तत्त्वज्ञानात फरक नाही हे दाखविले; पण त्यांचे समाधान झाले नाही. पुढे हाच वाद आळंदीचे श्री. **पांडुरंगशर्मा** यांनी चित्रमयजगताच्या काही अंकातून चालविला. गतवर्षी वे. शा. सं. बाळाशास्त्री हुपरीकर यांचे विद्वान् चिरंजीव यांनीहि माझ्याशी पत्रव्यवहार करून वरील विषयासंबंधीचे माझे विचार कळविण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांनी आपल्या लेखातून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या अमृतानुभव ग्रंथात चिद्विलासवादाचे मंडन केले असल्यामुळे त्यांना आचार्यांचा मायावाद मान्य नाही व ते आचार्यानुयायी नव्हते असा पुरस्कार केला. त्यांच्या पत्रातील मुद्यांचा योग्य विचार करून अमृतानुभवातील वाद व आचार्यांचा वाद यात काही फरक नाही हे दाखविले. पण त्यानेहि समाधान झाले नाही. अलीकडे दैनिक महाराष्ट्रातून कोणी **ज्ञानदेवोपासकांनी** हाच वाद चालवून श्री ज्ञानेश्वर महाराज हे शंकरमतानुयायी नाहीत असे ज्ञानेश्वरी, चांगदेवपासष्टी इत्यादि ग्रंथाचे उतारे देऊन सिद्ध करण्याचा फार मोठा प्रयत्न केला आहे. वे.शा.सं. बाळाशास्त्री हुपरीकर, यांचे चिरंजीव व पांडुरंग शर्मा यांचे तरी असे म्हणणे आहे की, गीता ग्रंथात मायावादाचा स्वीकार असल्यामुळे श्री ज्ञानेश्वर महाराजांना मायावाद स्वीकारावा लागला. पण त्यांना तो मान्य नव्हता. म्हणूनच त्यांनी आपल्या आवडीच्या चिद्विलासवादाचे मंडन करण्याकरता अमृतानुभवग्रंथ लिहिला.

पण प्रस्तुत ज्ञानदेवोपासकानी तर ज्ञानेश्वरी ग्रंथातहि श्री 'ज्ञानेश्वर महाराजांनी शंकराचार्यांचा मायावाद न स्वीकारता पूर्ण द्वैत स्वीकारले आहे' असे प्रतिपादिले आहे. हा त्यांचा विशेष आहे. म्हणून मागल्याच वादाची ही नवीन आवृत्ती

म्हणावे लागते.

विचाराची दिशा कोणती असावी?

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी मायावाद स्वीकारला नाही असे प्रतिपादणाऱ्या वरील महाशयांची प्रतिपादन शैली मोठ्या चतुर व चलाख वकिलासारखी आहे. माझ्या पक्षकाराचा पक्ष कायद्याला धरून आहे असे न्यायधीशाला दाखविताना एखादा वकील जसा आधाराकरिता देण्यात येणाऱ्या वरिष्ठ कोर्टाचे निकालातून आपल्या म्हणण्याला विरोधी असलेली नेमकी तेवढी वचने गाळून टाकून पोषक वचने घेतो किंवा त्यांचा विपरीत अर्थ करून न्याशधीशाच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रयत्न करितो त्याप्रमाणेच श्री ज्ञानेश्वर महाराजांना मायावाद मान्य नाही असे दाखविताना वरील सर्व गृहस्थानी श्री ज्ञानेश्वर महाराजांची मायावादप्रतिपादक वचने गाळून चिद्विलासवादाचा पुरस्कार करणारी वचने वाचकांपुढे मांडून वाचकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रयत्न केला आहे.

वास्तविक पाहता कोणताहि ग्रंथकर्ता कोणत्या मताचा आहे हे त्याच्या एखाद्या ग्रंथावरून पाहावयाचे असल्यास त्याच्या त्या ग्रंथातील सर्व विरोधी वचने घेऊन व त्यांचा समन्वय करूनच पाहिले पाहिजे. तेव्हाच एक काही निश्चय होऊ शकतो, एरव्ही नाही. त्याचप्रमाणे अमुक ग्रंथकाराने अमुक ग्रंथकाराचे अनुसरण केले नाही असे आपल्याला म्हणावयाचे असेल तेव्हा जे मत आपण ग्रंथकाराचे पदरी बांधतो ते मत, ज्याचे अनुकरण केले नाही असे आपले म्हणणे त्याला मान्य आहे की नाही हेहि पाहिले पाहिजे.

'प्रस्तुत वादात श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आचार्यांच्या मायावादाचा पुरस्कार केला नाही तर चिद्विलासवादाचा पुरस्कार केला' असे म्हणत असता आचार्यांना चिद्विलासवाद मान्य होता की नाही हे पाहावयास पाहिजे. आचार्यांनीहि चिद्विलासवाद मान्य केला नसल्यास श्रीज्ञानेश्वरमहाराज आचार्यानुयायी आहेत असे म्हणता यावयाचे नाही व मान्य केला असल्यास श्रीज्ञानेश्वर महाराजांचे आचार्यानुयायित्व कितीहि खटपट केली तरी निवारण करता येणे शक्य नाही.

तसेच 'मायावाद हा चिद्विलासवादाहून भिन्न आहे' असे सिद्ध झाल्यासच या सर्व उठाठेवींचा उपयोग होईल व मायावादानेच चिद्विलासवाद सिद्ध होतो असे

सिद्ध झाल्यास सर्व विरोधांचा डोलाराच कोसळून पडणार यांत संशय नाही. श्रीज्ञानेश्वर महाराज मायावादी नाहीत हा समज बराच रूढ होऊ लागला आहे. कित्येक वारकरी सांप्रदायिकांनीहि त्याचा पुरस्कार सुरू केला आहे. तेव्हा ज्ञानदेवोपासकांच्या लेखांचा विचार करणे अगत्याचे आहे. तो विचार करताना असंबद्ध व अप्रस्तुत मुद्यांचा विनाकारण पाल्हाळ न करता संबद्ध व मुख्य मुद्यांना धरूनच मी विचार करणार आहे.

शंकराचार्यादि सर्व केवलाद्वैतवाद्यांनाहि चिद्विलासवाद मान्य

ज्ञानदेवोपासकांनी महेश्वरानंद यांच्या ग्रंथाशी श्री ज्ञानेश्वरीचे साम्य दाखविण्याकरता जे काही लिखाण खर्ची घातले त्याचा विचार तूर्त बाजूस ठेवून श्री शंकराचार्यांना चिद्विलासवाद मान्य नाही काय, या मुख्य प्रश्नाचा विचार करू. आचार्यांना चिद्विलासवाद मान्य असेल तर ज्ञानेश्वरीतील चिद्विलासवाद व महेश्वरानंदाचा चिद्विलासवाद या दोघांच्या वादात काय भेद आहे व कोणाच्या वादाचे कोणाच्या वादाशी साम्य आहे हे पाहिले पाहिजे. ज्ञानदेवोपासकांनी महेश्वरानंदाच्या चिद्विलासवादाशीच श्रीज्ञानेश्वरीतील श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा चिद्विलासवाद जुळता आहे असे गृहीत धरूनच दोघांच्या ग्रंथातून साम्य दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वेदान्तमतातील चिद्विलासवाद हा आचार्यांसह सर्व अद्वैतवाद्यांचे अंतिम ध्येय आहे हे ज्ञानदेवोपासकांना माहित आहे किंवा नाही, सांगता येत नाही.

शंकराचार्य केवलाद्वैतवादी आहेत. त्यांच्या मताने भेदाला म्हणजे वस्तुभेदाला किंवा धर्मभेदाला मुळीच जागा नाही. रामानुजाचार्यांचा विशिष्टाद्वैतवाद, शुभाचार्यांचा शुद्धाद्वैतवाद, प्रत्यभिज्ञामतातील पूर्णाद्वैतवाद व आचार्यांचा केवलाद्वैतवाद हे सर्व चिद्विलासवादच आहेत. अद्वैत म्हटले की एक परब्रह्म सर्वभावाने नटले आहे किंवा आविष्कृत झाले आहे असे प्रतिपादन ओघानेच येते. जीव असो, जगत् असो, ईश्वर असो, अज्ञान असो, माया असो 'सर्व परब्रह्माचाच तो भास' असे मानले जाते.

या सर्व आचार्यांच्या चिद्विलासवादात थोडा थोडा फरक असून एक केवलाद्वैतवादी शंकराचार्यांचा चिद्विलासवादच काय तो श्रुती, युक्ती, अनुभव या प्रमाणत्रयीला धरून दिसतो. बाकीच्या आचार्यांचे चिद्विलासवाद युक्तिरहित, केवळ

शब्दांचा भर देऊन मांडलेले आहेत. ईश्वर, जीव, जगत्, ह्या तीन वस्तू आहेत असे अज्ञानी जीव समजतो. पैकी ईश्वर हा त्याला ऐकूनच माहित आहे. जीव व जगत् या वस्तूंचे मात्र त्याला प्रत्यक्ष ज्ञान आहे. जीववस्तू तोच आहे म्हणून तो स्वतःस अपरोक्ष आहे. जगद्वस्तू प्रत्यक्ष आहे. ह्या तीन वस्तू परस्पराहून निराळ्या स्वतंत्र आहेत असे अज्ञानी समजतो व हा मानलेला भेदच त्याच्या सर्व दुःखाला कारण असल्यामुळे दुःखातून कायमचे सुटावयाचे असल्यास भेद नाहीसा केला पाहिजे म्हणजे ह्या तीन गोष्टी निराळ्या नसून जी एकच वस्तू तीन प्रकाराने भासते तिलाच परब्रह्म म्हणतात, असा सर्व आचार्यांच्या वेदान्तज्ञानाचा आशय आहे. अशा प्रकारे जे भासते व ज्याला भासते ते सर्व परब्रह्म आहे असे प्रतिपादन करणे यालाच चिद्विलासवाद म्हणतात.

शंकराचार्येतर आचार्यांचा चिद्विलासवाद

येथे मी या विषयाचा जास्त विचार न करता प्रस्तुत चर्चेस उपयोगी पडेल इतकाच ऊहापोह करणार आहे. केवलाद्वैतवादी शंकराचार्य सोडून बाकीचे अद्वैतवादी आचार्य हा चिद्विलासवाद म्हणजे सर्व ब्रह्मच आहे हा वाद प्रतिपादन करताना किंवा जीव व जगत् हेहि पूर्ण ब्रह्मरूपच आहे असे म्हणतांना ब्रह्म सच्चिदानंदानंतरूप आहे, अविकारी आहे, एकजिनसी आहे असे स्वीकारतात. पण जीवाला जो जगद्वस्तूचा व स्वतःविषयीचा अनुभव आहे तो असा आहे - जगद्वस्तू उत्पन्न होते व नाश पावते. ती जडरूप, अनेकरूप, मर्यादित व दुःखरूप आहे. स्वतः जीव आपल्याला कर्मकर्ता व सुख-दुःखभोक्ता व अज्ञानी समजतो. शंकराचार्येतर आचार्यांचे म्हणणे असे आहे की सच्चिदानंद परब्रह्मच आपल्या शक्तीने कर्तृभोक्तृ जीवस्वरूप, उत्पत्तिनाशवान्, जड, अनेक व मर्यादित, जगत्स्वरूप बनले.

पैकी **विशिष्टाद्वैती** म्हणतात की परब्रह्मच चेतन-अचेतनरूप जगत् झाले. ते कर्ता व ज्ञाता आहे. तेच जीवरूप झाले.

शुद्धाद्वैती म्हणतात की सच्चिदानंद परब्रह्म सत् स्वरूपाने जगत् झाले. यांच्या मतात ब्रह्म जरी सच्चिदानंदरूप आहे तरी जीव-जगत् हे ब्रह्मधर्माहून निराळ्या धर्माचे आहेत. परब्रह्मानेच त्या त्या स्वरूपांत आविर्भूत होताना आपल्या शक्तीनेच आपल्या धर्माचा संकोच विकास केला असल्यामुळे व ते ब्रह्मरूपच आहेत,

किंवा ब्रह्माचाच तो सर्व आविष्कार आहे. म्हणजे आहे त्या दशेतच ते सर्व सत्य आहे.

शंकराचार्यांचा चिद्विलासवाद

शंकराचार्य आपल्या ग्रंथातून चिद्विलासवादाचेच समर्थन करतात. जीव जगत् हे सर्व सच्चिदानंद ब्रह्मरूपच आहेत असाच त्यांचा सिद्धान्त आहे. **'ब्रह्मैवेदममृतं पुरस्तात्'** या मुंडकोपनिषदातील श्रुतीवर भाष्य करताना -

ब्रह्मैवेदं विश्वं समस्तमिदं जगद्वरिष्ठं वरतमम् ।

म्हणजे सर्वजगत् ब्रह्मस्वरूपच आहे असे स्पष्ट म्हटले आहे. छांदोग्योपनिषदात-

सदेव सौम्य इदमग्र आसीत् ।

या श्रुतीवर भाष्य करताना 'इदानीमपीदं सदेव' जगत् दिसते तेव्हाहि ते सद्ब्रह्मस्वरूपच आहे असेहि त्यांचे वचन आहे. तेथेच पुनः 'सर्व खल्विदं ब्रह्म' या श्रुतीवर भाष्य करताना,

इदं जगन्नामरूपविकृतं प्रत्यक्षादिविषयं ब्रह्म ।

हे सर्व नामरूपात्मक जगत् ब्रह्मच आहे.

एवं ब्रह्मतया त्रिषु कालेषु अविशिष्टं । तद्व्यतिरेकेण विषयं ब्रह्म गृह्णीयात् ॥

परब्रह्माहून निराळे सिद्ध होत नसल्यामुळे तिन्ही काळी म्हणजे नित्य ब्रह्मरूपच आहे.

सर्वं च नामरूपादि सदात्मनैव सत्यं विकारजातं स्वतस्त्वनृतमेव ।
अतः सदात्मना सर्वव्यवहाराणां सर्वविकाराणां च सत्यत्वम् ।
सतोऽन्यत्वे चानृतत्वमिति न कश्चिद्दोषः ॥ (छांदोग्य ६/२/२)

सर्व नामरूपादिक सत् ब्रह्मस्वरूपच असल्यामुळे नामरूपादि कार्यरूप पदार्थ सत्य आहेत. पण परब्रह्माहून त्यांना निराळे समजल्यास मात्र ते खोटे आहेत असे आम्ही म्हणतो. सर्व व्यवहार, सर्व कार्य सद्ब्रह्मस्वरूपच आहे व सत्य आहे. परब्रह्माहून निराळे केल्यास असत् खोटे मानावे लागतात.

ब्रह्मणः सर्वभूतानि जायन्ते परमात्मनः ।
तस्मादेतानि ब्रह्मैव भवन्तीत्यवधारयेत् ।
ब्रह्मैव सर्वनामानि रूपाणि विविधानि च ।
कर्माण्यपि समग्राणि बिभर्तीति श्रुतिर्जगौ ।

सुवर्णाद्यायमानस्य सुवर्णत्वं शाश्वतम् ।
ब्रह्मणो जायमानस्य ब्रह्मत्वं च तथा भवेत् ।

सर्व भूते परमेश्वरापासूनच झाली असल्यामुळे ती परमेश्वर स्वरूपच आहेत असे जाण. सर्वनामरूपे, सर्व कर्मे ब्रह्मरूपच आहेत. सुवर्णापासून झालेले अलंकार जसे नित्य सुवर्णस्वरूपच असणार तसे ब्रह्मापासूनच झालेले जगत् नित्य ब्रह्मस्वरूपच आहे.

यथा तरंगकल्लोलैर्जलमेव स्फुरत्यलम् ।
पात्ररूपेण ताम्रं हि ब्रह्माण्डौघैस्तथाऽऽत्मता ॥६३॥
घटनाम्ना यथा पृथ्वी पटनाम्ना हि तंतवः ।
जगन्नाम्ना चिदाभाति ज्ञेयं तत्तदभावतः ॥६४॥
सर्वोऽपि व्यवहारस्तु ब्रह्मणा क्रियते जनैः ।
अज्ञानान्नविजानन्ति मृदेव हि घटादिकम् ॥६५॥ (अपरोक्षानुभूतिः)

ज्याप्रमाणे तरंगरूपाने पाणीच असते किंवा पात्ररूपाने तांब्यादि धातुच असतात त्याप्रमाणे अनंत ब्रह्मांडांचे प्रवाह देखील आत्मरूपच आहेत. घट म्हणजे मातीच, वस्त्र म्हणजे सूतच, कारण मातीहून घट व तंतूहून वस्त्र स्वतंत्र निराळी वस्तू दिसूनच येत नाही, तसेच जगत् देखील ब्रह्माहून निराळी वस्तू सिद्ध होत नाही तर ते चैतन्यात्मक आहे. सर्वलोक ब्रह्मस्वरूपच असून ब्रह्मस्वरूपाशीच ब्रह्मस्वरूप व्यवहार करतात. पण अशी खरी वस्तुस्थिती असताना अज्ञानी लोक जाणत नाहीत.

यथैव मृण्मयः कुंभस्तद्वद्देहोऽपि चिन्मयः ।
आत्मानात्मविवेकोऽयं मुधैव कियते बुधैः ॥

जसा कुंभ मातीमय आहे तसा देहहि चिन्मय आहे. असे असताना हे जड, हे चेतन असा विचार मूर्ख करितात.

तरंगफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा ।
चिदेव देहाद्यहमन्तमेतत्सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ।

तरंग, फेस, बुडबुडे हे सर्व जसे शुद्ध पाणीच आहे, दुसरे काही नाही. त्याप्रमाणे आकाशापासून देहापर्यंत जेवढा कार्यरूप प्रपंच आहे तो सर्व शुद्ध चैतन्याचाच विलास

आहे.

मृल्लोहविस्फुल्लिंगादिदृष्टान्तोपन्यासैः सृष्टिर्या चोदिता -।
प्रकाशिता कल्पिता अन्यथान्यथा च स सर्वः सृष्टिप्रकारो ।
जीवपरमात्मैकत्वबुद्ध्यवताराय उपायोऽस्माकम् ॥

मातीपासून होणारे पदार्थ, लोहादि धातूपासून बनणारे पदार्थ किंवा विस्तवापासून निघणाऱ्या ठिणग्या, यांचे दृष्टांत जे नाना प्रकाराने भासणाऱ्या सृष्टिकार्यास वेदान्तातून दिले गेले आहेत, ते देण्यामध्ये आमचा हा उद्देश आहे की, जसे मातीचे विकार मातीस्वरूप, लोहादि धातूचे कार्य लोहरूपच किंवा अग्नीच्या ठिणग्या अग्निरूपच असतात, त्याप्रमाणे ही सर्व नानाविध सृष्टी ब्रह्मस्वरूपच आहे असे ज्ञान व्हावे.

या सर्व प्रमाणवचनांवरून वाचकांच्या लक्षात येईल की चिद्विलासवाद हा शंकराचार्यांनाहि मान्य आहे व तोच सिद्ध करण्याकरता वेदान्तशास्त्र प्रवृत्त झाले आहे. किंबहुना नाथ-तुकारामादि जेवढे संत झाले त्या सर्वांनी तो स्वीकारला आहे.

साखरेचा फणस प्रबळ । तेथे काटे त्वचा बीज गोळ ।
अवघी साखरची केवळ । तेवि ब्रह्मचि सकळ जगदाकारे ॥ (ए.भा.अ.३ओ.७०५)

अशा नाथांच्या किती तरी ओव्या आहेत. यावरून हे दिसून येईल की आपल्या ग्रंथातून चिद्विलासवादाचे प्रतिपादन करण्याकरिता भाष्यकाराची वाट सोडून महेश्वरानंदाचे अनुयायित्व स्वीकारण्याची श्रीज्ञानेश्वरमहाराजांना तरी काही आवश्यकता दिसत नाही.

मग मायावाद कशाकरिता ?

या प्रश्नाचा आता विचार करणे अगत्याचे आहे. जीवजगद्रूपाने सर्वच चैतन्य भासते हा जरी वेदान्तातील निश्चित सिद्धांत असला तरी जीव म्हणून ज्याला म्हणतात त्याला हे समजत नाही. तो तसे मानीत नाही. या बाबतींत सर्व जीव प्रथम अज्ञानी आहेत. महेश्वरानंदाचे ग्रंथ वाचण्यापूर्वी ज्ञानदेवोपासकांनाहि हा सर्व चिद्विलास आहे हे कळले नव्हते, हे खास. कळूं लागल्यावर ते, आपणासह सर्व जगत् चिद्विलास मानून पूर्णाद्वैतब्रह्मस्वरूप झाले असतील. पण त्यापूर्वी सर्व जीवांप्रमाणे तेहि परमेश्वर, जीव, जगत् ह्या तीन वस्तू निरनिराळ्या मानीत असलेच पाहिजेत. महेश्वरानंदानें पूर्णाद्वैतातहि जीव प्रथम अज्ञानी मानलाच आहे, नाहीतर पूर्णाद्वैत निरूपण करण्याचे कारणच नव्हते.

शंकराचार्यांचे मत पुढील प्रमाणे आहे. - ब्रह्म म्हणून जे सर्वांचे कारण समजले जाते ते, सच्चिदानंद, शुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आहे. त्या एका परब्रह्मावाचून दुसरी काहीहि निराळी स्वतंत्र वस्तू अस्तित्वात नाही असे ब्रह्म अद्वैतरूप आहे. ब्रह्मवस्तू विकार पावणारी किंवा परिणाम पावणारी नाही. ती निरवयव असून सर्वत्र व्यापक आहे. हे तिचे धर्म कोण्याहि काळी बदलत नाहीत.

ब्रह्म अद्वैतस्वरूप असल्यामुळे ते कर्तृत्वभोक्तृत्वरहित आहे. कर्तृत्वादिधर्म, जेथे कर्त्याहून कर्मवस्तू व भोक्त्याहून भोग्यवस्तू निराळी असते अशा द्वैत स्थितीतच राहतात, अद्वैतात राहत नाहीत. ब्रह्म निर्विकल्प अद्वैतस्वरूप आहे. अशा परब्रह्मापासून कार्योत्पत्तीचे प्रकार जीव व जगत् किंवा भोक्ता व भोग्य हा संपूर्ण जगत्प्रपंच निर्माण झाला असे अद्वैतवादी म्हणतात. कारणापासून कार्य उत्पन्न होण्याच्या ज्या पद्धती आपण जगात पाहतो त्या चार प्रकारच्या दिसतात.

१- पहिला प्रकार सोन्यापासून अलंकार होतात किंवा पाण्याच्या ठिकाणी लहरी उत्पन्न होतात; या प्रकाराने कारण व कार्य हे दोन्ही सुवर्णमय असतात किंवा पाणी व लहरी दोन्ही पाणीच असते. फक्त नुसता नामरूपाचा बदल कार्यदशेत दिसतो.

२- दुसरा कार्योत्पत्तीचा जो प्रकार आहे त्यात कारण वस्तूच आपल्या धर्मासह बदलते व ती दूसरीच वस्तू समजली जाते. जसे दुधापासून दही होते. दहीदशेत दूधवस्तू व तिचे धर्म राहत नाहीत.

३- तिसरी कार्योत्पत्तीची पद्धती अशी आहे की लहान लहान वस्तूपासून मोठी वस्तू तयार होते. जसे सुतापासून कापड तयार होते.

४- चवथ्या उत्पत्तीचा प्रकार एका वस्तूपासून दुसरी स्वतंत्र वस्तू उत्पन्न होते. जसे मनुष्यापासून मनुष्य उत्पन्न होतात.

ब्रह्मापासून जगत् उत्पन्न झाले असे मानून जगताचा व ब्रह्माचा कार्यकारण भाव दाखविताना कोणी अद्वैत वेदान्त्यांनी सोन्यापासून अलंकार होतात तसे ब्रह्मापासून जगत् झाले हा कार्योत्पत्तीचा पहिला प्रकार स्वीकारला आहे व कोणी अद्वैत्यांनी दूधच जसे दहीस्वरूप होते तसे ब्रह्मच जगत्स्वरूप होते

असे म्हटले आहे. शंकराचार्यांनी मात्र यथार्थ दृष्टीने पाहिल्यास सुवर्णापासून जसे अलंकार व्हावे किंवा पाण्यावर लहरी उठाव्या त्याप्रमाणे केवल नामरूपांच्या योगाने ब्रह्म बहुरूप म्हणजे जगद्रूप झाले असे मानले आहे.

कथमेकस्यार्थान्तराननुप्रवेशे बहुत्वं स्यादुच्यते ।

नहि पुत्रोत्पत्तिरिवार्थान्तरविषयं बहुभवनम् ।

कथं तर्हि ।

आत्मस्थानभिव्यक्तनामरूपाभिव्यक्त्या ।

यदात्मस्थे अनभिव्यक्ते नामरूपे व्याक्रियेते तदा नामरूपे आत्मरूपापरित्यागेनैव ब्रह्मणाऽप्रविभक्तदेशकाले सर्वावस्थासु व्याक्रियेते तदेतन्नामरूपव्याकरणं ब्रह्मणो बहुभवनम् ।

नान्यथा निरवयवस्य ब्रह्मणो बहुत्वापत्तिरुपपद्यतेऽल्पत्वं वा । (तैत्तिरीयोपनिषत्)

भावार्थ - ब्रह्म अद्वितीय आहे. तिच्यावाचून दुसरी वस्तू नाही. पुनः ती निरवयव वस्तू आहे. तेव्हा एका ब्रह्मरूपाचे पुष्कळरूप होणे, बापापासून मुलगा होतो त्याप्रमाणे मानता येत नाही. कारण ब्रह्म निरवयव व अद्वितीय असल्यामुळे, ज्या कार्योत्पत्तीच्या प्रकारांत कारणाहून कार्य स्वतंत्र वस्तू मानली जाते असा कोणताही कार्योत्पत्तीचा प्रकार, ब्रह्मापासून जगत्कार्य होण्यात मानता येत नाही. म्हणून **ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी प्रकट नसलेली नामरूपे ब्रह्मसत्तेवरच प्रगट होणे व परब्रह्माला नामरूपाने सजविणें हेच ब्रह्मवस्तूचे बहुरूप होय.** अर्थात् याप्रमाणे ब्रह्मापासून जगत्कार्योत्पत्ती मानल्यास कार्यात व कारणात दोन्ही ठिकाणी सच्चिदानंद ब्रह्मच भरलेले आहे आणि कार्यदशा म्हणजे नुसत्या नामरूपांचा बदल असाच अनुभव येईल व तसा अनुभव ज्ञान्याला असतो असे शंकराचार्य मानतात, हे चिद्विलासवाद म्हणजे काय याचे विवरण करताना आचार्यांची वचने देऊन दाखविलेच आहे.

अज्ञान्याच्या दृष्टीने परिणामवादाचा स्वीकार

पण अज्ञानी लोकांना अशा प्रकारचे सच्चिदानंदधर्माने युक्त जगत् दिसत नाही. त्यांना ते जड व ब्रह्माहून निराळी वस्तू अशा रीतीने अनुभवाला येते. त्यांच्या या विपरीत अनुभवाला धरून, अशा प्रकारचे जगत् सच्चिदानंदरूप ब्रह्मापासून कसे झाले हे सांगण्याकरिता शंकराचार्यानीही परिणामवादानुसार जगदुत्पत्ती मानण्यास संमती दिली आहे.

पूर्वसिद्धोहि परमात्मा विशेषेण विकारात्मना परिणमयामासआत्मानमिति ।

ब्रह्मानेच आपल्याला जगद्रूपाने परिणत करून घेतले.

परमार्थाभिप्रायेण तदनन्यत्वमिति अप्रत्याख्यायैव ।

कार्यंप्रपंचं परिणामप्रक्रियां चाश्रयति ।

प्रपंचाला खोटे न ठरविता परिणामवादाचा अंगीकार केला आहे. परिणामवादानुसार उत्पत्ती म्हणजे वर जे उत्पत्ती मानण्याचे प्रकार सांगितले आहेत त्यापैकी दुसऱ्या प्रकारची उत्पत्ती होय. या उत्पत्तीत कारणवस्तू आपल्या धर्मासह बदलून जाते. म्हणजे मूळ कारणवस्तू कार्यात शिल्लक राहिली असे दिसत नाही. दुधाचे दही होणे हे उदाहरण वर दिलेच आहे. अज्ञानी जीवाला जगत् दिसते. त्याचे कारण ब्रह्म जगद्रूपकार्यात त्यांना दिसत नाही म्हणजे ब्रह्मधर्म दिसून येत नाहीत. म्हणून दूध मुरून दही झाले असता त्या दह्यात जसे दूध व दुधाचे धर्म दिसत नाहीत त्याप्रमाणे अज्ञानी जीवाला ब्रह्म परिणाम पावून जगद्रूप झालेल्या कार्यदशेत ब्रह्म व त्याचे सच्चिदानंद धर्म दिसत नाहीत, म्हणूनच अज्ञान्याचे अनुभवानुसार, जगत् म्हणजे ब्रह्मच त्या धर्माने परिणाम पावले असे शंकराचार्य म्हणतात. ब्रह्मबोध होण्यापूर्वी 'चेतनब्रह्म जड जगताचे कारण कसे', ही अज्ञान्याची शंका निरसन करण्याकरता हा परिणामवादाचा युक्तिवाद शंकराचार्यांनी केला आहे. पण वस्तुतः ब्रह्माच्या जगद्रूप होण्यात त्यांना परिणाम प्रक्रिया मान्य नाही. ब्रह्म स्वयंपूर्ण, नित्य, अविनाशी, नित्यचैन्यस्वरूप आहे व हा त्याचा स्वभाव आहे. वस्तूचा स्वभाव कधी बदलत नसतो. कदाचित् सावयव वस्तूचा स्वभाव कालाने किंवा दुसऱ्या वस्तूच्या संगाने बदलणे शक्य असले तरी ब्रह्म निरवय व अद्वितीय असल्यामुळे त्याचा स्वभाव बदलणे शक्यच नाही. तेव्हा परमार्थ दृष्टीने म्हणजे यथार्थ दृष्टीने ब्रह्माचा व जगाचा कार्यकारण भाव दाखविणारे सुवर्ण व त्यापासून झालेला अलंकार अशासारखे दृष्टान्त योग्य आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. हे म्हणणे त्यांनी -

तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः॥

इत्यादि सूत्रात मांडलेले आहे. परिणामवादात वस्तू परिणाम पावण्याकरता जो वस्तूच्या परमाणूचा संकोच विकास व्हावा लागतो तो निरवयव ब्रह्मात होऊ शकत

नाही. म्हणून परिणामवाद आचार्य मानीत नाहीत.

वस्तुशक्ती वस्तूचे धर्म बदलू शकत नाहीत

ज्ञानदेवोपासकांनी निर्देशिलेल्या महेश्वरानंदाचे मत व आणखी दुसऱ्या अद्वैतवाद्यांनी निरवयव चेतन अविनाशी ब्रह्म हे जड विनाशी व सावयव रूपाने कसे परिणाम पावले ह्या शंकेचे उत्तर देताना 'अज्ञानी लोकांना असे भासते' असे उत्तर न देता ब्रह्म आपल्या स्वभावशक्तीने तसे परिणाम पावू शकते किंवा तशा रीतीने परिणाम पावणे, ही ब्रह्माची शक्ती आहे असे उत्तर दिले आहे. म्हणजे ब्रह्म स्वभावतःच जडविनाशी होते असे त्यांचे म्हणणे दिसते.

- पण परब्रह्म अविनाशी चेतन वस्तू आहे. सच्चिदानंद स्वरूपाने प्रगट होणे हाच तिचा शक्तिस्वभाव आहे. नित्य वस्तूचे धर्म नित्य असतात व अनित्य वस्तूचे धर्म अनित्य असतात हा तर्कशास्त्राचा अबाधित नियम आहे. कोणत्याही वस्तूची स्वभावशक्ति बदलत नाही.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥ गीता.

अविनाशी वस्तू विनाशी होत नाही व विनाशी वस्तू कधी अविनाशी होत नाही. हा सिद्धांत सर्व ज्ञान्यांना मान्य आहे. दुधासारखी विभाग होणारी वस्तू दहीरूपाने परिणाम पावते व तिचे धर्म बदलतात हे सावयव वस्तूंच्या स्वभावशक्तीला धरूनच आहे. सर्व विभाग पावणाऱ्या सावयव वस्तू बदलतात हा मुळी सृष्टिनियमच आहे. तसा निरवयव वस्तू बदलते हा नियम सृष्टीत पाहण्यात येत नाही.

प्रत्येक वस्तू धर्मरूपच आहे म्हणजे वस्तू व तिचे धर्म यांचे ऐक्य किंवा तादात्म्य असते. वस्तूंचे धर्म बदलले की ती वस्तूच निराळी होते व वस्तू बदलली की धर्म बदलतात. साखर गोड आहे पण गोडी हा धर्म नाहीसा झाला की ती साखरवस्तू आहे असे कधी म्हणता येणार नाही. गोडी आहे तोपर्यंत साखर व साखर आहे तोपर्यंत गोडी राहणारच. सर्व वस्तू त्यांच्या स्वरूपभूत धर्मावरूनच ओळखल्या जातात. स्वरूपभूत धर्म नाहीसे झाले की वस्तूच नष्ट झाली असे समजण्यात येते. गोडी जसा साखरेचा स्वरूपभूत धर्म तसे सत्‌चिद्‌आनंद हे देखील परब्रह्माचे स्वरूपभूत धर्म आहेत. असे हे परब्रह्म जगद्रूप होताना स्वभावशक्तीने जडविनाशी अशा विपरीत धर्माने अविर्भाव पावते असे विधान करणे म्हणजे जगत् ब्रह्मरूप नाही असेच मान्य केल्यासारखे होते. असे विधान करणारे लोक आपल्या चिद्विलासवादाला आपणच मूठमाती देतात.

वस्तूशक्तीच वस्तूच्या धर्माचे रक्षण करते

परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ।

परब्रह्माची स्वभावशक्ती ज्ञानबलस्वरूप असून ती विविध प्रकारची आहे असे श्वेताश्वतर श्रुतीत सांगितले आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की ब्रह्म आपल्या मूळच्या सच्चिदानंद धर्माशी अगदी विरुद्ध असलेल्या जड विनाशी धर्माने जगद्रूप होऊ शकते. कोणत्याही वस्तूची स्वाभाविक शक्ती, ती वस्तू नष्ट करण्याकरता कधीही झटत नाही. उलट तिचे अस्तित्व कायम राखण्याकरताच झटते. वस्तूला नष्ट व्हावे असे मुळीच वाटत नाही. ब्रह्मच जगद्रूपाने नटले असून ब्रह्माचे ठिकाणी निःस्सीम स्वात्मप्रेम असल्यामुळे ते स्वात्मप्रेम जगातील प्रत्येक वस्तूत भरलेले आहे म्हणूनच कोणत्या पदार्थाला आपण नष्ट व्हावे असे वाटत नाही, हे आपल्याच अनुभवावरून आपण समजू शकतो.

भारतातील व्यास व किडा यांचाहि या अर्थी एक संवाद आहे. प्रत्येक वस्तूची स्वभावशक्ती तिच्या स्वरूपभूत धर्मानेच अभिव्यक्त झाली असल्यामुळे व

कारणगुणा हि कार्ये उत्पद्यन्ते ॥

कारणाचे स्वरूपभूत धर्म कार्यात प्रगट होतातच असा नियम आहे. ते कारणधर्म, कार्यात उत्पन्न न झाले तर अमुक कार्य अमुक कारणापासून उत्पन्न झाले असा कार्यकारणभावच सांगता येणार नाही.

कारणात्कार्यं स्वरूपं निरूपं च ॥

असे सांख्यशास्त्राचे मत आहे तरी स्वरूपधर्म बदलतात असा त्यांचा अर्थ नाही. कारणाचे स्वरूपधर्म तसेच कार्यात उतरतातच पण स्वरूपभूत धर्माहून इतर कांही धर्म कार्यात कारणाहून निराळे येतात. मातीच्या ढेकळात पाणी साठविता येत नाही पण त्याच ढेकळाचा घट केल्यास पाणी साठविता येते. पाणी साठविण्याचा धर्म कारणरूप मातीत नव्हता तो कार्यरूप घटात उत्पन्न झाला. पण माती व मातीचा गंध हा स्वरूप धर्म बदललेला दिसणार नाही.

सारांश मूळची वस्तू नष्ट झाली असे ज्या स्वरूपधर्माच्या नाशाने समजते त्या स्वरूपधर्माचा नाश वस्तूची स्वभावशक्ती कोणत्याहि दशेत करू शकत नाही

हा सिद्धांत आहे. जगांतील सर्व वस्तू कोणत्या ना कोणत्या कारणाने विकार पावणाऱ्याच असल्यामुळे जगातील वस्तू आपण होऊन काही काळाने बदलतील किंवा नष्ट होतील पण परब्रह्म अविकारी म्हणजे कधीहि न बदलणारे व अद्वितीय असल्यामुळे त्याच्या ठिकाणी केव्हाही धर्माचा बदल मानता येत नाही. म्हणून दुधापासून दही होते तसे ब्रह्मापासून जगत् झाले असे म्हणण्यापेक्षा 'नामरूपानेच ब्रह्म जगत्स्वरूप भासते हेच शंकराचार्याचे म्हणणे योग्य दिसते.'

नामरूपे हीच माया

नामरूपांच्या योगानेच जर सोन्याचे अलंकाराप्रमाणे ब्रह्म जगद्स्वरूप झाले तर जगद्रूप दशेत परब्रह्माची सच्चिदानंद लक्षणे कां प्रतीत होत नाहीत याचे, शंकराचार्य माया, भ्रम, अज्ञान हे कारण देतात. जीवाला जगद्रूप होणारी परब्रह्मवस्तू दिसत नाही. त्याची त्याला ओळख नाही व तिकडे त्याची दृष्टीही नाही. परब्रह्मावर भासणाऱ्या नामरूपाकडेच त्याची दृष्टी असते. ज्याप्रमाणे लाकडाच्या केलेल्या हत्तीच्या आकाराकडे लक्ष देणाऱ्याचे लाकडाकडे लक्ष राहत नाही व त्याला ते लाकूड असून नसल्यासारखे होते व लाकडाकडे लक्ष देणाऱ्याचे हत्तीच्या आकाराकडे लक्ष नसते, त्याला आकार असून नसल्यासारखाच होतो.

त्याप्रमाणे परब्रह्माकडे लक्ष न देणाऱ्याचे लक्ष नामरूपावर खिळून राहिल्याने त्याला परब्रह्माचा विसर पडतो व परब्रह्माकडे लक्ष देणाऱ्याला नामरूप दिसत नाहीत. परब्रह्माकडे लक्ष देणारा ज्ञानी व नामरूपाकडे लक्ष देणारा अज्ञानी म्हटला जातो. नामरूपाकडेच दृष्टी दिल्याने अज्ञानी पुरुष परब्रह्माला विसरला. हेच अज्ञान म्हणजे अविद्या आहे व या अज्ञानाने त्याला परब्रह्म वस्तूच नामरूपाने प्रगट झाली असे न वाटता नामरूपाची एक जगत् स्वतंत्र वस्तू आहे असे तो समजतो. सच्चिदानंद परब्रह्मवस्तूहून नामरूपात्मक जगद्वस्तू निराळी आहे असा समज झाला की त्या जगद्वस्तूच्या ठिकाणी सच्चिदानंद धर्म जाऊन असत् जड असे विरूद्ध धर्म भासावयाला लागतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजही असेच म्हणतात -

जैसे पवने तोय हालविले । आणि तरंगाकार जाहले ।
तरी कवण के जन्मले । म्हणो ये तेथ ॥१०६॥
तेचि वायूचे स्फुरण ठेले । आणि उदक सहज सपाट जाहले ।
तरी आता काय निमाले । विचारी पां ॥१०७॥ (ज्ञा.अ२)

या ओव्यांचा भावार्थ असा की पाण्याकडे दृष्टी नसली व तरंग हा पाण्याहून निराळा पदार्थ आहे अशी दृष्टी असली तरच तरंगाचे ठिकाणी उत्पत्ती नाश दिसतील: एरवी पाण्याकडे जर दृष्टी असली व तरंगाचे स्वतंत्र वस्तुत्व आहे असे वाटले नाही तर तरंगाचे उत्पत्ती नाश दिसणे शक्य नाही. म्हणजे तरंग हा पाणीच आहे, दुसरी वस्तु नव्हे असे जो समजतो त्याला, पाण्याच्या ठिकाणी उत्पत्तिनाश दिसत नाहीत. उत्पत्ती दिसावयाला, उत्पन्न झालेली वस्तू उत्पत्तिपूर्वी नव्हती असे वाटावयाला पाहिजे. तसेच नाश दिसावयाला नाश पावलेली वस्तू आता दिसत नाही असे वाटले पाहिजे. उत्पत्ती व नाश हे वस्तूचे ठिकाणीच दिसणार. तरंगदशेपूर्वी पाणी होते. पाणी उत्पन्न झाले, पूर्वी नव्हते असे काही वाटत नाही. तरंगदशा नाहीशी झाली तरी पाणी नाहीसे झाले असा आपला समज होत नाही कारण ते तरंगदशेनंतरही राहिलेच आहे हे आपण पाहतो. याप्रमाणे पाणी दृष्टीने उत्पत्तिनाश नाहीतच आणि तरंगदृष्टीने विचार केल्यास तरंग ही पाण्याहून स्वतंत्र वस्तूच नव्हे; तेव्हा तिच्या ठिकाणी उत्पत्तिनाश आहे असे म्हणताच यावयाचे नाही. मग दिसतात ते -

हे उपजे आणि नाशे । ते मायावशे दिसे ।
एरवी तत्वतां वस्तु जे असे । ते अविनाशचि ॥१०५॥ (ज्ञा.अ२)

मायाभ्रांती मानल्यावाचून गत्यंतर नाही.

सारांश, तरंग म्हणजे पूर्वीची नामरूपे टाकून दुसरी नामरूपे घेतलेले पाणीच होय असे जो शहाणा समजतो त्याला उत्पत्तिनाश दिसत नाही व ही वस्तुस्थिती जो मूर्ख समजत नाही व त्यामुळे तरंग ही वस्तू स्वतंत्र आहे असे ज्याला वाटते त्याला तरंगाचे ठिकाणी उत्पत्तिनाशाचा प्रत्यय येतो. पण खरोखर, हा प्रत्यय म्हणजे भ्रमाने उत्पन्न केलेला भास होय यात शंका नाही. म्हणूनच शंकराचार्य म्हणतात ज्ञानी पुरुषाला सर्व नामरूपात्मक जगत् सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपच दिसते व अज्ञान्याला तेच जगत् ब्रह्मकार्य असूनही म्हणजे सच्चिदानंद रूप असूनही विनाशी जड, उत्पन्न होणारे असे वाटते. अज्ञानी पुरुषाचा हा जगताविषयीचा अनुभव भ्रममूलक आहे. हा मायाभ्रम, ब्रह्मसोडून नामरूपाकडे दृष्टी देणाऱ्यांना

नामरूपानेच पाडला. हा नामरूपाचा देखावा, विचार न करणाऱ्याला भ्रम उत्पन्न करतो म्हणून नामरूपे हीच माया असे शंकराचार्य म्हणतात –

सर्वज्ञेश्वरस्यात्मभूते इवाविद्याकल्पिते नामरूपे ।

तत्त्वान्यत्वाभ्यामनिर्वचनीये संसारप्रपंचबीजभूते मायाशक्तिः प्रकृतिरिति च श्रुतिस्मृत्योरभिलप्येते । (ब्रह्मसूत्र)

ईश्वरस्वरूप असल्यासारखी ज्यांच्याविषयी ब्रह्मस्वरूप की ब्रह्मस्वरूपाहून निराळी याचा आपल्याला निश्चय करता येत नाही, सर्व जगत्प्रपंचाला कारण असणारी ही नामरूपेच माया- प्रकृति शब्दाने संबोधिली जातात. याप्रमाणे ब्रह्मस्वरूप कारणापासून झालेल्या जगताचे ठिकाणी जड विनाशी इत्यादि जे ब्रह्मविरोधी धर्म दिसतात त्याला परब्रह्माची स्वभावशक्ती कारण नसून अज्ञान्याचा भ्रमकारण आहे हे सिद्ध होते.

माया ही जीवाची कल्पना,

जडविनाशी या धर्माचा जगत्पसारा अज्ञानी जीवालाच दिसतो म्हणजे तो तशी कल्पना करतो. ही कल्पना परब्रह्माच्या मूळ शक्तीवरच तो करतो. म्हणजे परब्रह्माची शक्ति मुळांत निरुपाधिक व सच्चिदानंदस्वरूप असून जीवाला भ्रम होतो म्हणून जीव तिच्यावर भ्रमरूपतेचा आरोप करतो.

या विनश्यति सा माया चिन्मात्रे परिकल्पिता ।

ज्ञानाने नाश पावणारी माया कल्पित आहे व

चिन्मात्राश्रयमायायाः शक्त्याकारे द्विजोत्तमाः ।

अनुप्रविष्टा या संवित् निर्विकल्पा स्वयंप्रभा ॥

''चिन्मात्र स्वरूपाचा आश्रय करणारी माया जेव्हां शक्तिस्वरूपाने स्फुरण पावते तेव्हा तिच्यात स्वयंप्रकाश निर्विकल्प चैतन्यच भरून राहते, असे सूतसंहितादि ग्रंथात स्पष्ट म्हटले आहे. शंकराचार्यांचाही हाच आशय आहे. या चैतन्यशक्ति स्फुरणालाच भ्रमाने जीव विपरीत भासविणारी माया म्हणतो. भ्रमाने भासणारा देखावा सत्य नसतो. खरे ज्ञान झाले असता तो भास राहत नाही. एवढेच नाही तर जेव्हा तो भ्रमाचा देखावा भासत असतो तेव्हाही तो जीवाला सत्य वाटत असला तरी नसतोच. नुसती त्याच्या आहेपणाची कल्पनाच जीव करतो. शंकराचार्याच्या मतात -

आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा ।

जे आदि अंती नसते ते दिसते तेव्हाहि वस्तुतः नसतेच; अशी भ्रमानें भासणाऱ्या भासाची स्थिती सांगून जगत् (म्हणजे जड विनाशी) हे पूर्वी नसते, मग उत्पन्न होते व शेवटी नाहीसे होते म्हणून जेव्हा ते भासते तेव्हाहि वस्तुतः नसतेच. शंकराचार्यांच्या मतात दृश्य जगताच्या जडविनाशी देखाव्याला मायाभ्रम कारण मानला आहे. म्हणजेच ते मायेला स्वतंत्र वस्तुत्व मानीत नाहीत. त्यांच्या मते वस्तू एक ब्रह्मच आहे. ती सत्य म्हणजे तिन्ही काळी असणारी आहे. जी सदा असते व जिचा नाश कल्पिता येत नाही तीच सत्य वस्तू व बाकी काल्पनिक म्हणजे ज्यांच्या उत्पत्ती व नाशाची कल्पना झाली असता ज्यांचे अस्तित्व व नाश भासतात अशा वस्तू असत् खोट्या; असे ते म्हणतात. मुळात ब्रह्म निर्विकल्प जाणल्यावाचून कशाच्याहि आहे नाहीपणाचा आपण निश्चय करू शकत नाही. उत्पत्तिनाश कळल्यावाचून उत्पत्ती झाली किंवा नाश झाला असे म्हणता यावयाचे नाही. **उत्पत्तिनाश जाणणारा जो असतो त्याचे उत्पत्तिनाश मानता येत नाहीत.** ज्ञानरूप आत्मा जाणणारा आहे म्हणून तो अविनाशी आहे व माया व मायेचे कार्य जगत् हे सर्व काल्पनिक आहे. अज्ञानाने काल्पनिक वस्तू खरी वाटते व ज्ञानाने ती खोटी वाटते. कल्पना करणाऱ्याचे अस्तित्व कल्पनेवर किंवा कल्पनेबरोबर नसते. कारण कल्पना करणारा कल्पनेच्या पूर्वी असला तरच तो कल्पना करू शकतो. आत्माच ब्रह्म आहे **''आत्मा हि ब्रह्म''** असे ब्रह्मसूत्र भाष्यात शंकराचार्य म्हणतात, **''कल्पना करणारा आत्माच जीव म्हटला जातो व कल्पना न करणारा आत्मा ब्रह्म म्हटला जातो.''** म्हणून मुळात ब्रह्म कल्पनारहित म्हणजे निर्विकल्प आहे व तेच कल्पना करणारे झाले की त्याला जीव म्हणतात. ब्रह्म स्वतःसिद्ध असल्यामुळे, त्याला स्वतःच्या अस्तित्वाची कल्पना करण्याची आवश्यकता नाही. 'मी आहे' अशी जाणिवेची कल्पना मनुष्याच्या मनात केव्हा केव्हा उठते पण ती दुसऱ्या पदार्थाच्या अपेक्षेनेच उठत असल्यामुळेच केव्हा केव्हा उठते, सदा उठत नाही. ही कल्पना उठण्यापूर्वी चेतन आत्मा असतो व म्हणूनच तो या उठलेल्या कल्पनेलाही जाणतो. पण या कल्पनेच्या उठण्यापूर्वी आत्मा निर्विकल्पच होता हे यावरूनच सिद्ध आहे. आत्मा हाच ब्रह्म होय म्हणून ब्रह्म मुळात निर्विकल्प आहे. पुढेही ब्रह्मावाचून दुसरी वस्तूच नसल्यामुळे त्या ब्रह्माला स्वतःची व दुसऱ्याची कल्पना करण्याचा प्रसंगच

नाही. म्हणजे ते किंवा ब्रह्मस्थिती सदासर्वदा निर्विकल्प आहे.

ब्रह्म अकर्तृ अभोक्तृ

जीवहि मूळात ब्रह्मस्वरूप आहे पण अज्ञानाने तो आपल्याला परमेश्वराहून निराळा व कर्ता भोक्ता समजतो. मी निर्विकल्प ब्रह्मस्वरूप आहे असे समजत नाही. ज्ञान झाल्यावर मात्र सर्व कल्पना सोडून तो निर्विकल्प होतो. अर्थातच जीवाचेही कर्तृत्व भोक्तृत्व गैरसमजुतीने किंवा यथार्थ ज्ञानाचे अभावी त्याने आपले ठिकाणी मानून घेतले आहे, म्हणजे मी कर्ता-भोक्ता आहे अशी तो आपल्या विषयी कल्पना करतो. या कल्पनेनेच तो ब्रह्मस्वरूपापासूनच च्युत होऊन जीव दशेला आला म्हणजे सदा पूर्ण असून तो तसे आपल्याला समजत नाही.

सृष्टी म्हणजे जर ब्रह्माचे नामरूपाने प्रगट होणे असा अर्थ आहे व हा जर ब्रह्माचा स्वभाव मानला आहे तर तेथे ब्रह्माचे कर्तृत्व मानता येणे शक्य नाही कारण स्वभाव प्रगट होण्यात कोणत्याही वस्तूचे कर्तृत्व मानणे शक्य नाही. ज्याप्रमाणे उष्णता हा अग्नीचा स्वभाव आहे. अग्नी हा उष्ण होण्यास कोणती क्रिया करतो? तेथे त्याचे कर्तृत्व धरता येईल काय?

सोऽकामयत बहुस्यां प्रजायेय ॥

ही कामना परमेश्वरानी केली असा उपनिषदात उल्लेख आहे खरा. पण हा स्वभाव मानल्यास कर्तृत्व मानण्यास तेथे जागा राहत नाही. वस्तूचा स्वभाव वस्तुभूत असतो हे वर सांगितलेलेच आहे. दिवसरात्र सूर्यामुळेच जाणता येतात पण सूर्य प्रकाशस्वरूप असल्यामुळे त्याला रात्र व दिवस यांचा प्रत्यय नसतो. पाण्याला तरंगाचा प्रत्यय नाही. तो प्रत्यय पाहणाऱ्या जीवाला आहे. त्याप्रमाणे नामरूपात्मक सृष्टी हा जर परमेश्वराचा स्वभाव मानला तर स्वभावभूत सृष्टीला कर्तृत्वाची आवश्यकता नाही व परमेश्वराकडे ते येत नाही. जीव आपल्या अज्ञानमूलक समजुतीनुसार परमेश्वरावर सृष्टीच्या कर्तृत्वाचा आरोप करतो. पुनः जीवाला जशा विनाशीजड सृष्टीचा अनुभव येतो तशी सृष्टी, काल्पनिक भ्रमरूप असल्यामुळे ती उत्पन्न करण्याकरता कर्ताच मुळी लागत नाही.

किंवा 'कल्पना करणे याचे तरी कर्तृत्व मानालच की नाही' असे कोणी म्हणतील तर यावर एवढेच उत्तर की ही सृष्टीची कल्पना परमेश्वराची नाही, जीवाची आहे म्हणून सृष्टीचे कर्तृत्व स्वीकारल्यास ते जीवाचे मानावे लागेल, परमेश्वराचे मानता येत नाही. मी बहुरूप व्हावे या संकल्पाचा अर्थ, परमेश्वराचे दृष्टीने मी सच्चिदानंदरूपाने पुष्कळ व्हावे असाच राहणार, कारण तो नित्य ज्ञानी असल्यामुळे, सच्चिदानंद प्रत्ययावाचून दुसरा जडविनाशी प्रत्यय त्याला केव्हाच येणे शक्य नाही. म्हणूनच ''सोऽकामयत'' या श्रुतीवर भाष्य करताना शंकराचार्य म्हणतात -

सत्यज्ञानलक्षणा स्वात्मभूतत्वाद्विशुद्धा ।

भगवंताची ही कामना स्वरूपभूतच असल्यामुळे अत्यंत शुद्ध सच्चिदानंद लक्षणात्मकच असते. तरंगरूपाने जसे पाणी आपल्याशीच खेळत त्याप्रमाणे ब्रह्मस्वरूपहि आपल्याशीच प्रेमाने खेळते. हे सर्व प्रेमाने स्वाभाविकच होत असल्यामुळे किंवा स्वरूपच असल्यामुळे, येथे कर्तृत्वाचा स्पर्शहि मानता येत नाही.

सर्व वाद परस्पर पोषक

हा अंतिम अनुभव एका परमेमश्वरावाचून दुसऱ्या कोण्याहि जीवाला नाही. जीवाचा अनुभव वरील अनुभवाच्या विरुद्ध आहे. त्याचा विरोधी अनुभव खोटा ठरवून त्याला वरील **अंतिम अनुभव पटवून देण्याकरता आचार्यांनी मायावाद, अध्यासवाद, निर्वाणवाद, अजातवाद, चिद्विलासवाद असे वाद निरनिराळ्या भूमिकेवर स्वीकारले आहेत. पण ते सर्व परस्परांना पोषकच आहेत.**

*__नामरूपांचा पसारा ब्रह्मसत्तेवरच निरनिराळ्या सारखा भासतो हेच विवर्ताचे स्वरूप आहे.__ या नामरूपानेच ब्रह्म विसरून नामरूपात्मक देखावा हा एक सृष्टी नांवाचा पदार्थ आहे, असे भासविले आहे. हेच अध्यस्त विवर्ताचे स्वरूप आहे.

*पण एवढ्याहि नामरूपविस्ताराने मूळची ब्रह्मवस्तू किंचितही न बदलता तशीच राहते म्हणून जेवढे विपरीत भासले तो सर्व अज्ञानाने उत्पन्न केलेला भ्रमच समजला पाहिजे. हा **मायावाद** होय.

*भ्रमाने भासलेले नुसते भासते पण वस्तुदृष्टीने पहाता मूळ वस्तूहून निराळी वस्तू नसते, वस्तूच जर नाही तर ती उत्पन्न झाली हेहि म्हणणे शोभत नाही. ब्रह्म अनादि सिद्ध आहे त्याची उत्पत्तीच संभवत नाही व ब्रह्माहून दुसरे काहीच नाही म्हणून कोठेच काहीच उत्पन्न होत नाही. हाच **अजातवाद** होय, आणि

*वस्तुतः ब्रह्माहून दुसरे काहीच नाही तर जेवढे भासते तेवढा ब्रह्मविलास आहे असेच सिद्ध होते यालाच **चिद्विलासवाद** म्हणतात. या अंतिमवादाकडे दृष्टी

ठेवूनच संपूर्ण द्वैतभ्रमाचा नाश करण्याकरता ह्या सर्व वादांचा स्वीकार करावा लागतो.

श्रीज्ञानेश्वरमाऊली कोणाला अनुसरते ?

वाचकांना शंकराचार्यांचे मताची थोडी दिशा समजावी म्हणन आम्ही त्यांच्या मताचा सारांश दिला आहे. आता श्रीज्ञानेश्वरमाउलीचा वेदान्तविचार आचार्य वेदान्ताशी जुळतो की ज्ञानदेवोपासकांनी आपल्या लेखातून दाखविल्याप्रमाणे, महेश्वरानन्दाचे विचाराशी जुळतो हे आपण पाहू.

''भगवान् शंकराचार्यानी भाष्य करताना गीतेतील काही शब्दांचे जे अर्थ केलेत तेच अर्थ श्रीज्ञानेश्वरीत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी न स्वीकारता निराळे अर्थ केलेत असे सांगून श्रीज्ञानेश्वर महाराज भाष्यकाराची वाट धरत नाहीत'' असे दाखविण्याचा ज्ञानदेवोपासकानी जो प्रयत्न केला त्याचा विचार तूर्त आपण बाजूला ठेवू. कारण दोन चार शब्दांचे अर्थ भिन्न केले एवढ्यावरून काही ग्रंथकर्त्यांच्या मताचा निवाडा होऊ शकत नसतो. ह्या गोष्टी दुय्यम दर्जाच्या आहेत. मुख्य सिद्धांत कोणाशी जुळतो हेच पाहिले पाहिजे.

मुख्य सिद्धान्त

ज्ञानदेवोपासक आपल्या १९-३-१९५१ च्या दैनिक महाराष्ट्राचे अंकातील लेखात म्हणतात ''श्रीज्ञानेश्वरांची अद्वैत तत्त्वज्ञानाची मांडणी शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानासारखी आहे किंवा निराळी आहे ... ... वगैरे प्रश्न ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांच्या विचाराकरता मी त्यांच्या समोर मांडत आहे. 'जग म्हणजे काय, ते कोणी व कशापासून उत्पन्न केले, जगाचा व ते उत्पन्न करण्याचा संबंध काय' हे प्रश्न उपस्थित करून महेश्वरानंदानीच उत्तर दिले आहे ते असे —

स्त्यानस्य क्रमवशादिक्षुरसस्यैव शिवप्रकाशस्य
गुलपिण्डमिव पंचानि भूतानि मधुरतां न मुंचन्ति ।

अर्थ - उसाच्या रसापासून जसा उत्तरोत्तर तो रस कठिण घनीभूत होत होत क्रमाने राब, गूळ या स्वरूपास येतो तसे शिव स्वरूपही होत होत पंचभूतात्मक घनीभूत किंवा कठिण अवस्थेत आले. यालाच जग म्हणावयाचे. हे जग म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर झाले. जग कशापासून झाले या प्रश्नाचे उत्तर महेश्वरानन्द असे देतात की, शिवतत्त्वच जगद्रूप झाले. मातीच जशी घटरूप होते किंवा पाणी जसे तरंगरूप होते त्याप्रमाणे शिवतत्त्व जगद्रूप झाले.

जे कारण कार्यरूप बनते व कार्यात भरून राहते त्याला उपादान कारण म्हणतात. कार्य घडविणाऱ्याला निमित्तकारण म्हणतात. जगाचे निमित्त कारणहि शिवतत्व आहे. उसाचा रसच राब किंवा गूळ या कार्याचे कारण आहे म्हणून उसाची गोडी राब व गूळ या कार्यातहि राहते. तसेच शिवतत्त्वच जगाचे उपादान व निमित्त असे दोन्ही प्रकारचे कारण असल्यामुळे, जगत् ब्रह्मरूपच आहे हे विधान कोणालाहि नाकबूल नाही.

प्रकृतिश्चोपादानकारणं च ब्रह्माभ्युपगन्तव्यं निमित्तकारणं च ।

परमेश्वरच जगत्स्वरूप झाला असून त्यानेच ईक्षणपूर्वक ते केले.

असे जग जड राहील काय?

पण महेश्वरानन्दाच्याच वचनावरून आम्ही ज्ञानदेवोपासकांना असे विचारतो की ज्याप्रमाणे ऊसाच्या रसाची गोडी, राब, गूळ इत्यादि तिच्या कार्यात राहते, तशी सच्चिदानंद परमात्म्याच्या जगद्रूप अवस्थानांत जड विनाशी असा प्रत्यय न येता अविनाशी चेतन असाच प्रत्यय कायम राहावयास नको का? हा प्रत्यय असला तरच जगत् खरोखर ब्रह्मरूपाने अनुभवले असे म्हणता येईल की तो प्रत्यय नसून त्याच्या उलट विनाशी भावाने जगताचा प्रत्यय आला तरी नुसते ब्रह्मापासून झाले म्हणूनच जगत् ब्रह्मरूप आहे. असे शब्दाने म्हटले म्हणजे भागते? ब्रह्मवस्तू निरवयव व विकाररहित आहे. तिचा घनीभाव होणे तिच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे. म्हणून परब्रह्माच्या स्वभावधर्माच्या विरुद्ध असलेल्या धर्माने युक्त अशा जगद्रूपाने परमात्मा परिणाम पावतो असे म्हणणे बुद्धिमानांना शक्य नाही. – आचार्य असे जगत् ब्रह्मावर भ्रमाने भासते किंवा नुसत्या परब्रह्मापासून असे जगत् झाले नसून मायाभ्रमाला आधार होणाऱ्या ब्रह्मापासून झाले असे म्हणतात.

कर्ताच नाही

परमेश्वराच्या जगत्कर्तृत्वाविषयींचा विचारहि शंकराचार्यांना संमत नाही. उत्पत्तीची क्रिया करणारा कर्ता म्हटला जातो. पण सच्चिदानंद परमात्म्यापासून झालेले जगत् सच्चिदानंदस्वरूप भासत असेल तर ते उत्पन्न होते म्हणणेच व्यर्थ आहे. म्हणून कर्ता मानणे व्यर्थ आहे. सच्चिदानंदापासून सच्चिदानंद उत्पन्न होते म्हणणे वदतोव्याघातरूप आहे, आणि जडविनाशी धर्माने भासत असेल

तर ते खोटे भ्रमरूप असल्यामुळे त्याला कर्त्याची जरूरीच नाही. म्हणूनच शंकराचार्य ब्रह्माचे ठिकाणी वस्तुतः जगत्कर्तृत्व मानीत नाहीत. अज्ञानी लोक परमेश्वरावर जगत्कर्तृत्वाचा आरोप करितात आणि अज्ञान्याला जगताची ब्रह्मरूपता सिद्ध करून दाखविण्याकरिता, अज्ञान्याला प्रतीत होणाऱ्या जगताचा व ब्रह्माचा कार्यकारणभाव स्वीकारून तशा जगताचे कर्तृत्व परमात्म्याकडे त्यांनी दिले आहे, खऱ्या दृष्टीने नाही.

तसेच, **वेदितृस्वभावं न्यक्भावाधीनं वेद्यतोत्कर्षात्मकं काठिन्यमनुभवति ।**

परब्रह्म ज्ञातृस्वरूप म्हणजे जाणणारे आहे व तेच पुढे हीन दर्जाचे होऊन त्यांत वेद्यता धर्म उत्कर्ष पावतो. या महेश्वरानन्दाचे मतांत वेत्त्यापेक्षा वेद्य कमी दर्जाचे आहे.

शंकराचार्य म्हणतात -

ब्रह्मैवेदं विश्वं समस्तमिदं जगद्वरिष्ठं वरतमम् । (मुंडक)

ब्रह्म सदापूर्ण आहे म्हणून त्याचे जगद्रूपहि अत्यंत शुद्ध पूर्णब्रह्मस्वरूप आहे. यत्किंचित्हि ते ब्रह्मापेक्षा न्यून नाही.

यद्यपि कार्यात्मनोद्रिच्यते ।

तथापि,

यत्स्वरूपं पूर्णत्वं परमात्मभावं तन्न जहाति पूर्णमेवोद्रिच्यते ॥

जरी ब्रह्म कार्यरूपाने स्फुरते तरी ते त्याहि दशेत पूर्णच राहते. अपूर्ण कधी होत नाही. म्हणजे जीव वास्तविक पाहता जीव दशेतहि पूर्णब्रह्मस्वरूपच असतांना तो तसे समजत नाही व आपल्या विषयी हीन कल्पना करून घेतो व अशा जीवाला पूर्णब्रह्मस्वरूप असलेले जगतहि हीन दर्जाचे दिसते. असा शंकराचार्यांच्या म्हणण्याचा भाव आहे.

श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे मत

आता श्रीज्ञानेश्वरमाऊली काय म्हणते ते पहा. हे जगत् खरोखर कसे भासावयाला पाहिजे व ज्ञानी पुरुषाला कसे भासते -

येर अधिदैवाधिभूत । तेहि मीचि करी समस्त ॥
सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुती ओविले ।
तैसे जग म्या धरिले । सबाह्याभ्यांतरी ॥

ह्या ओव्या महेश्वरानन्दाचे विचाराशी साम्य दाखविण्याकरिता ज्ञानदेवोपासकांनी घेतलेल्या आहेत. पण हे विचार शंकराचार्यांनीहि आपल्या ग्रंथातून मांडले आहेत हे आम्ही वर दाखविलेलेच आहे. पण हे विचार ज्ञान झाल्यानंतरचे आहेत. हे विचार शंकराचार्यांना मान्य नाहीत असे जर ज्ञानदेवोपासकांना वाटत असेल तर मी त्यांना अशी विनंति करतो की शंकराचार्यांबद्दल असा वाईट ग्रह टाकून देऊन त्यांनी नीट लक्ष देऊन आचार्यांचे ग्रंथ पुनः वाचावे, आणि हे विचार शंकराचार्यांनीहि आपल्या ग्रंथातून मांडले आहेत हे जर ज्ञानदेवोपासकांना माहित असेल तर या विचाराचे बाबतीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांना महेश्वरानंदाचे चेले बनविण्यात त्यांचा उद्देश काय आहे ते कळत नाही.

जड जग कसे उत्पन्न झाले व कसे आहे

अज्ञानी लोकांस जो जगताचा जडविनाशीरूपाने विपरीत अनुभव येतो तशा प्रकारचे जगत् केवळ ब्रह्मापासून निर्माण झाले किंवा शंकराचार्यांप्रमाणे ब्रह्माबरोबर अशा जगदुत्पत्तीला, ज्ञानेश्वरमहाराज अविद्या कारण मानतात याचा उलगडा पुढील ओव्यानी होतो.

तैसे अधिभूतादि आघवे । हे अविद्येचे पालवे ।
झाकले तव मानावे । वेगळे ऐसे ॥
तेचि अविद्येची जनविका फिटे । आणि भेदभावाची अवधि तुटे ॥

अधिभूत-अधिदैव हे सर्व पूर्णब्रह्मरूपच असतांना अविद्येमुळे म्हणजे मायाभ्रमाने सच्चिदानंद ब्रह्माहून निराळे म्हणजे जडविनाशी भासतात व हा अविद्येचा पडदा निघाला की ते ब्रह्माहून अलग जाणले जात नाहीत.

तैसे विचारितां निरसले । ते प्रपंच सहज सांडवले ।
मग तत्वतां तत्व उरले । ज्ञानियांसी ॥१३१॥
भ्रांतीते पाही असारता ॥१३३॥
जैसे स्वप्नामाजी देखिजे । ते स्वप्नींची साच आपजे ।
मग चेउनिया पाहिजे । तव कांही नाही ॥
तैसा हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वाया ॥

तैसे सकळ हे मूर्त । जाण पां मायाकारित ।
जैसे आकाशी बिम्बत । अभ्रपटल ॥

अर्थ - विचार करून पाहता अशा प्रपंचाचे स्वतंत्र अस्तित्व व वस्तुत्व सिद्ध होत नाही. म्हणून ज्ञानानंतर प्रपंच नाहीसा होतो व ब्रह्मतत्त्वच ज्ञान्याच्या दृष्टीने शिल्लक राहते. हाच शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यामध्ये -

ब्रह्मव्यतिरेकेण कार्यजातस्याभावः ॥

परब्रह्म निराळे करून पाहिले असता कार्यरूप प्रपंचवस्तु शिल्लकच राहत नाही असे म्हटले आहे. असार वस्तु म्हणजे यथार्थ विचाराने ज्या वस्तूचे अस्तित्व सिद्ध होत नाही ती वस्तु भ्रांतीने भासते असे म्हटले आहे. ज्याप्रमाणे जेवढे आपण स्वप्नांत पाहतो ते स्वप्नापुरतेच खरे असते. जाग आल्यावर तो देखावा मुळीच राहत नाही त्याप्रमाणे हा सर्व पसारा (दृश्य विनाशी जड जगाचा देखावा) मायाभ्रांति आहे तोपर्यंतच आहे. अर्जुना, जग सत्य आहे असा तुला विनाकारण भ्रम झाला आहे. संपूर्ण हा साकार जगत्प्रपंच माया भ्रमानेच निर्माण केला आहे. आकाशात जशी अभ्रपटले एकत्र व्हावी त्याप्रमाणे परब्रह्मावर हा प्रपंच भ्रमानेच भासतो.

जें उपजे आणि नाशे । ते मायावशे दिसे ।
येऱ्हवी तत्त्वता वस्तु जे असे । अविनाशची ॥१०५॥
जैसे पवने तोय हालविले । आणि तरंगाकार झाले ।
परी कवण के जन्मले । म्हणो ये येथ ॥१०६॥
तेचि वायूचे स्फुरण ठेले । आणि उदक सहज सपाट झाले ।
तरी आता काय निमाले । विचारी पां ॥१०७॥

हा जो उत्पत्तिनाश दिसतो तो देखील भ्रांतीनेच भासतो. वास्तविक पाहतां अविनाशी ब्रह्मवस्तुच आहे. वाऱ्याने पाणी हालते की तेच तरंगाकार होते. पाणी पूर्वीच होते व तरंगहि पाणीच मग कोणती निराळी वस्तू जन्मास आली असे म्हणावयाचे ? वायूचे वाहणे बंद झाले की पाणी तरंगाकार होणे बंद होऊन ते सपाट होते. आता येथे कोणती वस्तू नाहीशी झाली ते सांगा बरे,

येर मध्ये जे प्रतिभासे । ते निद्रिता स्वप्न जैसे ।
तैसा आकार हा मायावशे । सत्स्वरूपी ॥

उत्पत्तीपूर्वी नसलेले मध्येच भासते व पुनः नष्ट होते, तेव्हा मध्येच भासणारे जे हे जगत् निजलेल्या माणसास स्वप्न भासते तसे सद्ब्रह्मावर भासते.

मी अजहि परी संभवे । प्रकृति योगे ॥
माझे अव्ययत्व न नासे । परी होणे जाणे एक दिसे ।
ते प्रतिबिंब मायावशे । माझ्याच ठायीं ॥
माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीन ऐसा आवडे ।
तेहि भ्रांतिबुद्धि तरी घडे । एऱ्हवी नाही ॥ (ज्ञा. ४-४६)

मी खरोखर अर्जुना, जन्मरहित आहे; पण मी अखंड जन्मरहित राहूनच जन्म घेतो. मी कधी विनाशी होत नाही. माझ्या ठिकाणी उत्पन्न होणे व नाश पावणे हे जे धर्म दिसतात ते मायाभ्रांतीने दिसतात. मी सदासर्वदा स्वतंत्र आहे; पण तोच मी भ्रांतिबुद्धीने कर्माचे स्वाधीन झालेला दिसतो.

जैसा कां सर्वेश्वर । पाहिजे तंव निर्व्यापार ।
परि तोची रची विस्तार । त्रिभुवनाचा ॥
आणि कर्ता ऐसा म्हणिजे । तरी कवणें कर्मे न शिंपे ॥
जे हातपावो न लिंपे । उदासवृत्तिच्या ॥
योग निद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा सळू न पडे ।
परी महाभूतांचे दळवाडे । उभारी भले ॥
जगाच्या जीवी आहे । परी कवणाचा कहीं नोहे ।
जगचि हे होय जाये । तो शुद्धिही नेणें ॥
तो सृजी पाळी संहरी । ऐसे बोलती चराचरीं ।
ते अज्ञान गा अवधारी । पंडुकुमरा ॥ ज्ञा. ३-७६-८२

परमात्मा अखंड व्यापारहित आहे पण तोच सृष्टीची रचना करितो. त्याला कर्ता म्हणावे तर सर्व कर्मापासून अलिप्त आहे. त्याचे हातपायहि, उदास वृत्तीमुळे कर्माने लिंपित होत नाहीत. त्याची योगनिद्रा (निर्विकल्प अवस्था) मोडत नाही. त्याच्या अकर्तेपणांत तिळमात्र फरक पडत नाही; पण एवढी मोठी पंचमहाभूतें उत्पन्न करितो. या सर्वाचा भावार्थ असा की सर्व जगाच्या अंतर्यामी तो परमात्मा आहे खरा; पण सर्वाहून अलिप्त असून जग उत्पन्न होते, नाहीसे होते, यापैकी त्याला कांहीच माहीत नसते. म्हणून परमात्मा जग उत्पन्न करितो, त्याचे पालन करितो किंवा त्यांचा संहार करितो हे असे अज्ञानी लोक नेहमीं बोलत असतात, ते त्या

अज्ञानी लोकांचे अज्ञान आहे. विचार न करिता बोलणे आहे.

तैसे भूतजात सर्व । हे माझेची कीर अवयव ।
परी मायायोगे जीव । दशे आले ॥ (ज्ञा. ७-६६)

त्याप्रमाणे सर्व भूते माझीच अवयवे आहेत. म्हणजे माझ्यापासून अलग नसून अविचाराने ते आपल्याला अपूर्ण समजतात. हाच महेश्वरानंदाचा न्यक्भाव आहे. पण श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात तो न्यक्भाव किंवा हीनपणा भ्रांतिमूलक आहे.

ऐसा मायापूर हा कवणें । तरिजेल गा ॥८१॥

सर्व पसारा मायेचा पूर आहे, किंवा,

तैसा मायामय सरिता । न तरवे जीवा ॥९६॥

ही माया नदी आहे.

येथे भूते जिये आहाती जेतुली । तिये मीचि होऊनि ठेली ॥
आणि वर्तत आहाति जेतुली । तीहि मीचि ॥१६१॥
कां भविष्यमाणे जियेही । तीहि मजवेगळी नाही ॥१६२॥ज्ञाने.अ७

ह्या ओव्या ज्ञानदेवोपासकांनी, जगत् ब्रह्मापासून झाले व ब्रह्मरूप आहे हे श्रीज्ञानेश्वरमहाऊलींचे म्हणणे महेश्वरानंदाप्रमाणेच आहे हे दाखविण्याकरिता घेतल्या. पण त्या ओव्यांच्या पुढेच त्यापुढील ओव्या आहेत -

हा बोलचि येऱ्हवी कांही । तेवी भूतांसी मिथ्यत्वे ॥
परि दुजेनिविण एकला । परब्रह्मचि संचला ॥
अनेकत्वाचा आला । पूर जैसा ॥२५॥
तैसे समविषमत्व नेणे कैचे । वायाचि चराचर रचे ॥२६॥
पाहिजे कवण हे आघवे विये । तंव मूळ ते शून्य ॥२७॥
म्हणूनी कर्ता मुद्दल न दिसे । आणि शेखी कारणहि कांही नसे ॥
माजी कार्यचि आपैसे । वाढोचि लागे ॥२८॥
ऐसा करितेनिविण गोचर । अव्यक्तीं आकार ॥२९॥ (ज्ञा.अ८)
माझिया विस्तारलेपणाचियेनि नांवे । हे जगचि नोहे आघवे ॥
जैसे दूध मुराले स्वभावे । तरी तेचि दही ॥६४॥
कां बीजचि जाहले तरू । अथवा भांगारचि अलंकारू ॥
तैसा मज एकाचा विस्तारु । ते हे जग ॥६५॥
हे अव्यक्तपणे थिजले । तेचि मग विश्वाकारे वोथिजले ।
तैसे अमूर्तमूर्ति मिया विस्तारले । त्रैलोक्य जाणे ॥६६॥

या सर्व ओव्यांत परमात्माच जगस्वरूप झाला आहे असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात व हाच सिद्धांत शंकराचार्याचाहि आहे.

मग महदादि देहान्ते । इये अशेषेहि भूते ।
पै माझ्याठायीं बिंबिते । जैसे जळी फेण ॥६७॥
परी तया फेणां आंत पाहता । जेवि जळ न दिसे पांडुसुता ।
नातरी स्वप्निची अनेकता । चेइलिया नोहिजे ॥६८॥
तैसे भूते इये माझ्या ठायीं । बिंबिती तयामाजी मी नाही ॥(ज्ञा.अ९)

यापुढील ओव्यांत, पाण्याचे ठिकाणी जसा फेस उत्पन्न होतो त्याप्रमाणे बुद्धिपासून देहापर्यंतची सर्व तत्त्वे परमेश्वराचे ठिकाणी भासत असून फेसामध्ये जसे पाणी नाही त्याप्रमाणे त्या तत्त्वात मी नाही, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज कां म्हणतात याचा विचार ज्ञानदेवोपासकांनी केला नाही असे दिसते किंवा आम्ही महेश्वरानंदांची वचने देऊन परब्रह्मच संकोच पावून जगद्रूप होतांना दुधापासून होणाऱ्या दह्याप्रमाणे घनीभूत होत गेले व बदलत गेले व त्यामुळे परब्रह्माच्या मूळच्या सच्चिदानंद धर्माहून भिन्न धर्म कार्यरूप जगांत येत गेले म्हणून सच्चिदानंद धर्माने मी जगतांत नाही असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे महेश्वरानंदासारखे म्हणणे आहे असे जर विज्ञानोपासकांचे म्हणणे असेल तर वर दाखविल्याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ही सर्व भ्रांति आहे, माया आहे. **तैसे सकल हे मूर्त । जाण पां मायाकारित ॥१६८॥(ज्ञा.अ२)**असे कां म्हणावे, कशाला लक्षून त्यांचे हे शब्द आहेत याचा विचार कोठे केला गेला आहे?

पै मूर्तिचेनि मेळे । तो मूर्त होऊनी खेळे ॥
परी अमूर्तपण न मैळे । दादुलयाचे ॥

परमेश्वर व्यक्त झाला तरी त्याचा अव्यक्तपणा मुळीच बिघडत नाही ह्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या म्हणण्यात दुधाचे दही होऊन जसा बदल होतो त्याप्रमाणे परब्रह्म थिजून जगद्रूप झाले या महेश्वरानंदाच्या म्हणण्याला संमति मिळते काय? परब्रह्म घनीभूत होत जगद्रूप झाले असते तर -

तयाची परी किरीटी । इया प्रकृती झालीया सृष्टि ।
जै उपसंहारोनी किजेल ठी । तैं मीची आहे ॥

या ओळीत प्रकृति जगद्रूप होते असे ते कां म्हणतात? आणि सोन्याचे मणी सोन्याच्या सुतात ओविले तर जसे सर्वत्र सोने दिसते तसे मणी किंवा सूत आटून सोने पहाण्याची आवश्यकता नाही तसेच ब्रह्म जगद्रूप झाले असेल तर जगताचा उपसंहार करून ब्रह्म पहाण्याची आवश्यकता काय? बरे पुढे पहा -

आमुच्या प्रकृति पलीकडील भावो । जरी कल्पनेविण लागसी पाहो ।
तरी मज माजी भूते हेही वावो । जे मी सर्व म्हणऊनी ॥१७१॥
एरवी संकल्पाचीये सांजवेळे । नावेक तिमिरेजती बुद्धिचे डोळे ।
म्हणोनी अखंडितचि परी झांवळे । भूत भिन्न ऐसे देखे ॥१७२॥
तेची संकल्पाची सांज जै लोपे । तै अखंडितची आहे स्वरूपे ।
जैसी शंका जात खेवो लोपे । सापपण माळेचे ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराज अर्जुनाला सांगतात की अर्जुना भूतांची कल्पना न करिता जर प्रकृतीच्या पलीकडील माझी स्वरूपस्थिति पाहशील तर माझ्या ठिकाणी भूते आहेत हे म्हणणेहि खोटे आहे. कारण मीच सर्व आहे म्हणजे मजवांचून भूते काल्पनिक आहेत. परमेश्वरावाचून दुसरी काही वस्तु नसल्यामुळे दुसऱ्या वस्तूची कल्पना करतांना आपल्याला परमेश्वर-वस्तूचे विस्मरण होते म्हणूनच एक अखंड आत्मवस्तु असतांना भूते आहेत अशी भेदकल्पना होते. दुसऱ्या वस्तूची कल्पनाच जर मुळी आली नाही तर मीच एक आहे हे अखंड ज्ञान कायम राहते. ज्याप्रमाणें दोरीहून भिन्न असलेल्या सर्पाची शंका आल्याबरोबर दोरीचे सर्परूप भासावयाला लागते व सर्पशंका नाहीशी झाल्याबरोबर सर्पाचा भास जाऊन दोरीच दिसू लागते त्याप्रमाणे समज. या ओव्यांत रज्जुसर्पाप्रमाणे कल्पनेमुळे ब्रह्म जगद्रूप भासते असे स्पष्टच म्हटले आहे. शंकराचार्य जगताविषयी रज्जुसर्पाचा दृष्टांत देतात हे प्रसिद्ध आहे व तोच दृष्टांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीहि जगताविषयी दिला आहे. एका मूळ वस्तूचे ठिकाणी भलत्याच वस्तूचा भास व्हावा यालाच शंकराचार्य अध्यस्त विवर्त म्हणतात व हीच अध्यस्तविवर्ताची प्रक्रिया श्रीज्ञानेश्वर महाराजांनीहि जगताविषयी स्वीकारली आहे. ब्रह्मच स्थायीभावाने जगत्स्वरूप होते असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे जगताविषयीचे विवरण कोठेहि सांपडत नाही. या रज्जुसर्पाच्या दृष्टांताने श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जसा रज्जुसर्पाचा कर्ता नाही तसा जगत्कर्ताहि कोणी नाही असे सुचविले आहे. इतरत्र त्यांनी तसे स्पष्ट म्हटलेहि आहे. त्याप्रमाणे भगवंतानी आपली स्थिति प्रकृतीच्या पलीकडे सांगितली आहे. तेव्हां ही प्रकृति भगवंताची स्वभावशक्ति म्हणता येत नाही कारण वस्तु स्वभावशक्तिहून निराळी नसते.

एरवी तरी भूमि आतुनी स्वयंभ । काय घडेया गाडगेयांचे निघती कोंभ ।
परी ते कुलालमतीचे गर्भ । उमटले कीं ॥

ही ओवी घेऊन ज्ञानदेवोपासकांनी ''ब्रह्म जगाची कल्पना करिते व जगाचे कल्पनामूलक कर्तृत्व ब्रह्माकडे येते असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात व हे म्हणणे महेश्वरानंदाप्रमाणेच आहे, शंकराचार्याप्रमाणे नाही कारण शंकराचार्याचे मतात जगत् भ्रमाने उत्पन्न होते.'' असा ज्ञानदेवोपासकांनी त्या ओवीतून अर्थ काढला पण या ओवीच्या पूर्वीच्या ओवी आणि नंतरच्या ओवी पाहता त्यातून ज्ञानदेवोपासकांनी केलेला अर्थ कसा निघतो हे एक मराठी वाचकांना कोडेच पडणार आहे. भगवान् श्रीकृष्णानी दुसरी कल्पना न करिता आपल्या प्रकृतिपलीकडील भाव पहाण्यास सांगितले तेव्हां ही कल्पना अर्जुनाची किंवा ब्रह्माची ? अर्जुनरूपी जीवाच्या कल्पनेमुळे भूते भासतात असे भगवंताचे स्पष्ट म्हणणे दिसते. तेव्हा ब्रह्म सृष्टीची कल्पना करिते व सृष्टि उत्पन्न होते असा अर्थ करणे म्हणजे वाचकांना भुरळ पाडणे आहे.. त्या ओवीचा अर्थ असा आहे - ज्याप्रमाणे आपण होऊन भूमीतून घडे गाडगे ही मातीची कार्ये बाहेर पडत नाहीत, तो सर्व कुंभाराच्या कल्पनेचा पसारा आहे त्याप्रमाणे ब्रह्मातून आपण होऊन सृष्टि प्रगट होत नाही. तो सर्व स्वतःस विसरलेल्या जीवाचा पसारा होय. हा आम्ही केलेला अर्थच श्रीज्ञानेश्वर महाराजांचा अभिप्रेत अर्थ आहे हे पुढील ओव्यावरून स्पष्ट होण्यासारखे आहे.

तैसी इये निर्मळ माझ्या स्वरूपी । जो भूत भावना आरोपी ।
तयासी तयाच्या संकल्पी । भूताभास असे ॥७९॥
तेचि कल्पिति प्रकृति पुरे । आणि भूताभास आधीच सरे ।
मग स्वरूप उरे एकसरे । निखिळ माझे ॥८०॥
हे असो आंगी भरलिया भवंडी । जैसा भोवती दिसती अरडी दरडी ।
तैशी आपुलिया कल्पना अखंडी । गमती भूते ॥८१॥
तेचि कल्पना सांडूनी पाही । तरी मी भूती भूते माझ्या ठायी ।

स्वप्नीहि तरी नाही । कल्पावया जोगे ॥८२॥
आता मीच एक भूताते धर्ता । अथवा भूतामाजी मी असता ।
या संकल्पाची सत्ता । आतुलिया बोलिया ॥८३॥
म्हणोनी परियेसी गा प्रियोत्तमा । यापरी मी विश्वेसी विश्वात्मा ।
जो इया लटकिया भूतग्रामा । भाव्यु सदा ॥८४॥
रश्मिचेनि आधारे जैसे । नव्हतेच मृगजळ आभासे ।
माझ्याठायी भूतजात तैसे । आणि मातेहि भावी ॥८५॥
तैसे भूतजात माझ्याठायी । कल्पिजे जरी आभासे कांही ।
निर्विकल्पीं तरी नाही । तेथ मीचि मी आघवे ॥९०॥
जैसे विरजणीयाचेनी संगे । दूधची आटो जो लागे ।
तैसी प्रकृति आंगा रिघे । सृष्टिपणाचिया ॥१०८॥
बीज जळाची जवळिक लाहे । आणि तेची शाखोपशाखी होये ।
तैसे मज करणे आहे । भूतांचे हे ॥१०९॥
आणि मी प्रकृति अधिष्ठीं ते कैसे । जैसा स्वप्नी जो असे ।
मग तोचि प्रवेशे । जागृतावस्थे ॥१११॥
या अवघियाचा अभिप्रावो कायी । जे हे भूतसृष्टिचे कांही ।
मज एकहि करणे नाही । ऐसाची अर्थ ॥११३॥
तैसा प्रकृतिसंग माझा । येर करणे ते इयेचे ॥११४॥(ज्ञा.अ९)
का स्वप्नासी कारण निद्रा । तैसी प्रकृति हे नरेन्द्रा ।
या अशेषहि भूतसमुद्रा । गोसाविणी गा ॥१२०॥
स्थावरा आणि जंगमा । स्थूळा आणि सूक्ष्मा ।
हे असो भूतग्रामा । प्रकृतिचि मूळ ॥१२१॥ (ज्ञा.अ.९)

भावार्थ :- या माझ्या निर्मळ स्वरूपाच्या ठिकाणी जो कोणी भूतांची कल्पना करितो त्याला त्याच्याच कल्पनेप्रमाणे माझ्या स्वरूपाच्या ठिकाणी भूते दिसतात. या ठिकाणी श्रीज्ञानेश्वर महाराजांनी **'कल्पना करणारे ब्रह्म नसून सृष्टीची कल्पना जीव करितो'** असे स्पष्ट म्हटले आहे. जीवाची कल्पना हीच सृष्टीची उत्पत्ति करणारी प्रकृति आहे ती कल्पना नाहीशी झाली की भूताभास रहात नाही, मग माझे शुद्ध स्वरूप शेष रहाते. महेश्वरानंदाचे मतांत सृष्टीचा नाश नाही. ती सत्य मानिली आहे. – ज्ञान्याला भासणारी सृष्टी जरी श्रीज्ञानेश्वरमहाराज नित्य सत्य असे मानतात तरी ते अज्ञान्याला भासणारी जड विनाशी सृष्टि जीवाने कल्पनेने मानलेली व ज्ञानाने नाश पावणारी आहे असे म्हणतात. शंकराचार्यहि ज्ञान्याला भासणारी सृष्टि सत्य व अज्ञान्याला भासणारी सृष्टि काल्पनिक व नाशिवंत मानतात. तेव्हा येथे श्रीज्ञानेश्वरमहाराज महेश्वरानंदाच्या मताचा पुरस्कार करितात की शंकराचार्याच्या मताला अनुसरतात हे वाचकांनी आपल्या मनाशी ठरवावे. वरील सिद्धांताला पोषक असा दृष्टांत श्रीज्ञानेश्वर महाराज पुनः देतात. ज्याप्रमाणे आपल्या अंगात भोंड भरली असता सभोवारचे पदार्थ फिरताना दिसतात त्याप्रमाणे ज्यांना जड नाशवंत सृष्टि दिसते ती त्यांच्या कल्पनेमुळे दिसते. ती कल्पना सोडून पहाता परब्रह्माचे ठिकाणी भूतसृष्टि नाही व भूतसृष्टीत परमात्मा नाही असा अनुभव येतो. सर्व भूतसृष्टीला मीच धारण करितो व सर्व भूतसृष्टीत मीच भरला आहे असे बोलणे सन्निपातातील भ्रमजन्य बडबड आहे. या सर्व खोट्या भूतसृष्टीमध्ये जी माझी भावना करावयाची त्या माझा व भूतसृष्टीचा याप्रमाणे संबंध आहे. ज्याप्रमाणे सूर्याच्या किरणांच्या आधारे खोटेच मृगजवळ भासते त्याप्रमाणे माझ्या शुद्ध स्वरूपाचे ठिकाणी भूतसृष्टीचा खोटाच पसारा भासतो व अशा सृष्टीच्या ठिकाणी मला पहाणे हेहि त्यापैकीच आहे. म्हणून माझ्या ठिकाणी भूतांची कल्पना केली तरच भूते भासतात नाहीतर कल्पनेवाचून पहातां माझे एक समरस शुद्ध स्वरूपच रहाते. ज्याप्रमाणे विरजणाच्या योगाने दूधच दही होते त्याप्रमाणे प्रकृति म्हणजे जीवाचे अज्ञान किंवा कल्पना हीच जगद्रूप बनते. येथेच 'ब्रह्म संकोचून महाभूतात्मक बनते' ही महेश्वरानंदाची उपपत्ति श्रीज्ञानेश्वर महाराजांनी टाकून देऊन श्रीशंकराचार्याची जगत्प्रक्रिया स्वीकारली आहे हे स्पष्ट दिसते. ज्याप्रमाणे पाण्याच्या ओलाव्याचा संबंध होणे एवढेच बीजापासून झाड होण्याला पूरे आहे व मग बीजच झाडाचे रूपाने प्रगट होते त्याप्रमाणे भूतसृष्टिरूप कार्याशी माझा कर्तेपणाचा संबंध आहे. मी प्रकृतीचा अधिष्ठाता होतो म्हणजे काय हेहि अर्जुनाला सांगतो. स्वप्नातून जागृति अवस्थेत येण्याला चालण्याची क्रिया करावी लागत नाही व काही शीणही होत नाही. अर्जुना या सर्व प्रतिपादनाचा अर्थ इतकाच की ही भूतसृष्टि निर्माण करण्यात मला काहीच करावे लागत नाही. माझा व प्रकृतीचा संबंध होतो व ती प्रकृति सृष्टि उत्पन्न करिते. ज्याप्रामणे स्वप्नातील

देखाव्यास कारण आपली विस्मृति आहे त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या भूतसृष्टीच्या उत्पत्तीला आत्मविस्मृतिरूप प्रकृति किंवा अज्ञान कारण आहे.

या सर्व ओव्यात ''ब्रह्मसंघटणरूप जगत्प्रक्रियेस'' श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी कोठेच थारा दिला नाही. जगताविषयी ज्ञानी लोकांचा अनुभव तरंग व पाणी, सुवर्ण व अलंकार या दृष्टान्ताने नमूद करून अज्ञानी लोकांचा अनुभव रज्जुसर्प, मृगजळ, भ्रम, भोंड, स्वप्न इत्यादि दृष्टान्तांनी श्रीज्ञानेश्वर महाराज सांगत आहेत. दोन्ही ठिकाणी परमेश्वराकडे ते काहीच कर्तृत्व देत नाहीत. अज्ञानी लोकांना भासणाऱ्या जड विनाशी जगाचे सर्व कर्तृत्व ते प्रकृतिकडेच देतात. पण ज्ञानदेवोपासकांनी जगताचे अनित्यत्व, विनाशीत्व, व मायिकत्व दाखविणाऱ्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वरील ओव्या न घेता व त्याचा विचार न करिता ज्ञानी पुरुषांचा अनुभव ज्या ओव्यात सांगितला आहे तेवढ्याच ओव्या घेऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांना जगताविषयी मायावाद मान्य नाही असा वाचकासमोर आभास उत्पन्न केलेला आहे आणि महेश्वरानंदाची ब्रह्मसंघटणरूप प्रक्रिया श्रीज्ञानेश्वरमाऊलीच्या माथी मारली आहे.

आणखी श्रीज्ञानेश्वरमहाराज पुढे काय म्हणतात पहा -

अथवा भूते माझ्या ठायी । आणि भूतामाजी मी नाही ॥
या खुणा तू काही । चुको नको ॥
हा दंश जव न ये हाता । तव माझे साचोकारपण पार्था ॥
न सापडे गा सर्वथा । जेवी तुषीं कण ।
पैं स्थूल दृष्टिं देखती माते । तेचि न देखणे जाण निरुते ।
जैसे स्वप्नीचेचि अमृते । अमर नोहिजे ॥

भावार्थः- भूतसृष्टि माझ्या ठिकाणी नाही व मी भूत सृष्टीत नाही हे मात्र विसरु नकोस. हे जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत माझे खरे स्वरूप समजणे शक्य नाही. कारण

तैसे स्थूलाकारी नाशिवंते । भरवंसा बांधोनि चित्ते ।
पाहती मज अविनाशाते । तरी कैंचा दिसे ॥

नाशिवंत अशा स्थूल स्वरूपाने पहाणाऱ्याला माझे अविनाशी स्वरूप कसे कळणार. म्हणजे संपूर्ण स्थूल सृष्टि नाशिवंत आहे हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे आहे. ज्ञानेश्वरीच्या अकराव्या अध्यायात स्थूल दृष्टीने झांकलेले व्यापक भगवत्स्वरूप जेव्हा भगवंताने ज्ञानदृष्टि देऊन अर्जुनाला दाखविले तेव्हां ते कसे दाखविले गेले याचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वर्णन केले आहे. **हे विश्वरूप म्हणजे ज्ञान्याला सर्व जगत् भगवत्स्वरूप कसे दिसते याचे प्रात्यक्षिकच होय.** हे भगवंताचे विश्वरूप ज्ञानदृष्टिवांचून दिसू शकले नाही.

मग दिव्य चक्षु प्रगटला । तया ज्ञानदृष्टि फांटा फुटला ।
यापरी दाखविता झाला । ऐश्वर्य आपुले ॥

भगवंताने ज्ञानदृष्टि दिली व मग त्याला भगवंताचे ऐश्वर्य दिसू लागले. तुला दिव्यदृष्टि देतो अशी अक्षरे भगवंताच्या मुखातून निघताच अविद्यांधःकार नाहीसा झाला म्हणजे अविद्याभ्रमाने भासणारी सृष्टि मावळली. अर्जुन या दृष्टीने पाहू लागला तर अर्जुनाला असे दिसले की -

म्हणे केवढे गगन येथ होते । ते कवणें नेले पां केऊते ।
ती चराचरे महाभूतें । काय जहाली ॥
दिशांचे ठावहि हारपले । अधोर्ध्व काय नेणो जाहले ।
चेइलिया स्वप्न तैसे गेले । लोकाकार ॥
नाना सूर्यतेजप्रतापे । सचंद्र तारांगण जैसे लोपे ।
तैसी गिळिली विश्वरूपे । प्रपंचरचना ॥

केवढे मोठे आकाश पण ते बाकीच्या सर्व महाभूतांसह व सर्व चराचरासह दिसेनासे झाले. ज्याप्रमाणे सूर्य उगवल्याबरोबर नक्षत्रासह चन्द्र लोपला जातो तसे विश्वरूपाचे दर्शनाने, प्रपंच रचना दिसेनाशी झाली. या ओव्यावरून, अज्ञानी लोकांना दिसणारे जगत् त्यांच्या अज्ञानाचा परिणाम असून तो ज्ञानाने नाहीसा झाल्यावर संपूर्ण नामरूपाचा भास मग ब्रह्माचा विलास आहे असे ते मानतात की नाही, हे वाचकांनीच ठरवावे.

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा निराळेपणा दाखविला आहे व क्षेत्र भाग निराळा केल्याखेरीज क्षेत्रज्ञ शुद्ध स्वरूप होत नाही असे दाखविले आहे. क्षेत्रज्ञाचे, क्षेत्ररहित शुद्ध स्वरूप जाणले असता -

जे जाणतलेयासाठी । संसार काढुनिया कांठी ॥
जिरोनी जाइजे पोटी । नित्यानंदाच्या ॥

संसार बाजूला सारून जाणणारा तद्रूप होतो. क्षेत्रज्ञाचे शुद्ध स्वरूप म्हणजे ब्रह्मच.

जे नाही म्हणो जाईजे । तंव विश्वाकारे देखिजे ॥
आणि विश्वचि ऐसे म्हणीजे । तरी हे माया ॥

जे परब्रह्म दिसत नाही म्हणून नाही म्हणावे तर तेच विश्वरूप झाले आहे आणि विश्व हेच परब्रह्म होय असे म्हणावे तर हा सर्व मायेचा पसारा होय. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मते नामरूपात्मक जगताशी ब्रह्माचा कोणता संबंध आहे हे पुढील ओव्यात पहा.-

नामरूप संबंध । जातिक्रियाभेद ।
हा आकारासीच प्रवाद । वस्तूसी नाही ॥९०५॥
ते गुण नव्हे काही । गुणा तया संबंध नाही ।
परी तयाच्याचि ठायी । आभासती ॥९०६॥
येतुलियासाठी । संभ्रांताच्या पोटी ।
ऐसे जाय किरीटी । जे हेचि घरी ॥९०७॥
ते गा धरणे ऐसे । अभ्राते जेवि आकाशे ।
का प्रतिवदन जैसे । आरसेनी ॥९०८॥
तैसे गा संबंधेविण । यया सर्वाते घरी निर्गुण ।
परी ते वाया जाण । मिथ्यादृष्टीं ॥९१०॥
यापरी निर्गुणे । गुणाते भोगणे ।
रंका राज्य करणे । स्वप्नी जैसे ॥९११॥ (ज्ञा.अ१३)

भावार्थ - नामरूप यांचा संबंध किंवा जाति क्रिया इत्यादि भेद यांचा संबंध साकाराशी आहे. ब्रह्मवस्तूशी याचा काही संबंध नाही. ब्रह्मवस्तु सत्त्वादिगुणरूप होत नाही. ज्याप्रमाणें गुणाचा व ब्रह्मवस्तूचा काहीएक संबंध नाही पण हे गुणादिक ब्रह्मवस्तुवरच भासतात. ब्रह्मवस्तुवर भासतात म्हणूनच अज्ञानी लोकांना ब्रह्मवस्तुच ह्या सर्वांना धारण करिते असा भ्रम होतो. वास्तविक पहाता ज्याप्राणे आकाशांत अभ्रे येतात पण आकाशाचा व त्यांचा संबंध नसतो. ते आकाशात अधरच असतात; किंवा आरशात मुखाचे प्रतिबिंब दिसते पण प्रतिबिंबाचा आरशाला स्पर्शहि होत नाही त्याप्रमाणें निर्गुणब्रह्म कोणत्याहि संबंधद्वारा आपल्यास स्पर्श न होऊं देता सर्व सृष्टीला धारण करिते. श्रीज्ञानेश्वरमहाराज परब्रह्माचा परिचय करून देतांना-

तरी केवल जी सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता ॥

नुसती सत्ता हे परब्रह्म आहे म्हणतात व या सत्तेला सोडून जेवढें स्फुरण होईल त्याला,

प्रकृति ते समस्ता । क्रिया नाम ॥

प्रकृति म्हणतात. या प्रकृतीचा पुरुषांत अंतर्भाव करीत नाही किंवा या प्रकृतीसह ब्रह्म आहे असे ते म्हणतात. कार्यकारणकर्तृत्व हे सर्व प्रकृतींत मोडतात. ब्रह्माशी त्याचा संबंध नाही -

तयाच्या तव ठायी । निपटुनी काहीच नाही ॥

परब्रह्माचे ठिकाणी मुळीच काही नाही पण -

कीं तया आघवेहि । आपणची होय ॥

ब्रह्मावर जेवढे काही भासते ते सर्व आपणच झालो आहे. वास्तविक पाहता -

तो तरी अकर्ता । उदास अभोक्ता ॥

ब्रह्म अकर्तृ आहे व उदास असून भोक्ताहि नाही पण प्रकृतीच्या संगाने भोक्ता होतो. ज्याप्रमाणे -

राजा पराधीन झाला । कां सिंह रोगे रुंधला ॥

राजा पराधीन झाला किंवा सिंहाला रोग झाला असता निस्तेज होतो.

तैसा पुरुष प्रकृतीं आला । स्वतेजा मुके ॥

तसा ब्रह्मपुरुषहि प्रकृतींत सापडला की ब्रह्म स्थिति झाकोळली जाते. प्रकृतीत सापडलेले ब्रह्म -

जागता नर सहसा । निद्रा पाडूनी जैसा ।
स्वप्नीचिया सोसा । वश्य कीजे ॥१०१३॥

ज्याप्रमाणे जागता मनुष्य निद्रावश होऊन स्वाप्निक सुखदुःखाचा भोग घेतो त्याप्रमाणे–

तैसे प्रकृति जालेपणें । पुरुषा गुण भोगणें ।

प्रकृतीच्या योगानेच पुरुषाला भोग होतो. या प्रकृतीचे स्वरूप सांगतांना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

हे भ्रमाचे महाद्वीप । हे व्याप्तिचे रूप ॥
विकार उमप । इया केले ॥

प्रकृति हे एक भ्रमाचे मोठे बेटच आहे. ब्रह्माच्या व्याप्तीचे ते स्वरूप आहे. सर्व कार्य

तिनेच केले.

आणि महाभूतादिकी । प्रभेदली अनेकी ॥
पसरलीसे लटिकी । प्रकृति जे हे ॥११३७॥
जैसी माळाते माळा । ऐसीच देखिजे डोळा ॥
सर्पबुद्धि टवाळा । उखी होऊनी ॥११३९॥
कां शुक्ति ते शुक्ति । हेम साच होय प्रतीति ॥
रुपेयाची भ्रांति । जाऊनिया ॥११४०॥
तैसी वेगळी वेगळेपणे । प्रकृति जे अंतःकरणें ॥
देखती ते मी म्हणे । ब्रह्म होती ॥११४१॥

इत्यादि ओव्यांत श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - पृथिव्यादि पंचमहाभूताने अनेकरूप भासणारी प्रकृतिच असून ती खोटी आहे. ज्याप्रमाणे खोटीच भासत असलेली सर्पबुद्धि टाकून देऊन ही माला आहे असे पहाणे हेच खरे पहाणे होय किंवा ही शिंप आहे रूपे नव्हे अशी यथार्थ कल्पना झाल्यावर झालेली रूप्याची कल्पना भ्रांति वाटते व ती तात्काल नाहीशी होते, त्याप्रमाणे प्रकृति माझ्याहून निराळी व मी प्रकृतीहून वेगळा असे जो अंतःकरणाने ओळखतो तो ब्रह्मरूप होतो असे मी म्हणतो. म्हणजे प्रकृति व प्रकृतीचे कार्य जगत् खोटे आहे व परब्रह्म त्याहून निराळे आहे, व

एक निघे पूर्वेकडे । एक ते पश्चिमेकडे ।
तिये भेटीचेनि पाडे । संबंध हा ॥

एक मनुष्य पूर्वेकडे निघाला व दुसरा पश्चिमेकडे निघाला असता त्यांची दोघांची जशी भेट होणें शक्य नाही तशी जड विनाशी जगत् उत्पन्न करणारी प्रकृति व तिला जाणणारा पुरुष एक होणे शक्य नाही. आता ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायात, ब्रह्म व जगत्, जीव याचा संबंध श्रीज्ञानेश्वर कसा दाखवितात ते पाहूं -

अव्यक्त वाद मती । अव्यक्त ऐसे वदंती ।
सांख्याचिया मती । प्रकृति हेचि ॥७०॥
वेदान्ती इयेते माया । ऐसीं म्हणिजे प्राज्ञराया ।
असो किती बोलणें वाया । अज्ञान हे ॥७१॥
आपला आपणपेया । विसर जो धनंजया ।
तेचि रूप इया । अज्ञानासी ॥७२॥

या ओव्यांचा सरळ अर्थ असा आहे - अर्जुना जगाचे कारणाला कोणी अव्यक्त नांव देतात. सांख्यशास्त्रात त्या अव्यक्तालाच प्रकृति म्हणतात. वेदान्तवेत्ते त्या प्रकृतीला माया म्हणतात. फार काय बोलून उपयोग. त्यालाच अज्ञान संज्ञा आहे. अज्ञानाचे स्वरूप म्हणजे आपण आपल्या यथार्थ आत्मस्वरूपाला विसरणें होय. श्रीज्ञानदेवोपासकांनी शंकराचार्याच्या वेदान्तविचाराहून श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे विचार निराळे आहेत हे दाखविण्यापूर्वी शंकराचार्याच्या वेदान्ताचा विचार केला असल्यास त्यांना कळावयास पाहिजे होते की श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अज्ञान हा शब्द स्वतंत्र आपला म्हणून योजिला नसून माया/प्रकृति/अव्यक्त या अर्थीच अनेक ठिकाणी शंकराचार्याच्या ग्रंथातून आलेलाच त्यांनी वापरला आहे. शंकराचार्यांनी माया/प्रकृति हे शब्द अज्ञानार्थी म्हणजे आत्मविस्मृति या अर्थीच दिले आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज ही माया, प्रकृति, अव्यक्त, अज्ञान हे चारी शब्द एकार्थीच आहेत असे वरील ओवीत स्पष्ट सांगत असतांना ''अव्यक्तवादी व सांख्य यांजबरोबर वेदान्त्याचाहि उल्लेख करून १४.७० ओवीच्या चवथ्या चरणात उर्ध्वमूल यांचा अर्थ अव्यक्त, प्रकृति किंवा माया असा न करता अज्ञान असा केला आहे.'' असे ज्ञानदेवोपासक विधान करितात हे कोणत्या मराठी भाषेच्या आधारे करितात हे समजत नाही. सर्वसाधारण मराठी भाषा जाणणाऱ्या आमच्या सारख्या लोकांना तर अ. १४.७० ओवीत सर्व शब्द एकार्थी वापरले आहेत असेच दिसते. माया प्रकृति अव्यक्त ह्या शब्दाच्या अर्थाहून अज्ञान शब्दांतील अर्थ श्रीज्ञानेश्वर महाराजांना निराळा अभिप्रेत असेल तर ज्ञानेश्वरी अ. १३ ओ. ९० मध्ये -

पैं. सांख्याचिया सिद्धांति । प्रकृति जे महामति ॥
तेचि येथे प्रस्तुती । अव्यक्त गा ।

सांख्याच्या सिद्धांतात जी प्रकृति मानिली आहे तीच तेथे अव्यक्त शब्दाने सांगितलेली आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज कां बरे म्हणतात. या चारहि शब्दांचा एकच अर्थ आहे असाच वरील ओवींचा सर्वजण अर्थ करतांना दिसतात. त्यांना मराठी भाषाच येत नाही म्हणावयास ज्ञानदेवोपासक तयार आहेत काय?

जें गोविंदराव तेच तात्यासाहेब असे कोणी जर बोलला तर त्याचे

गोविंदरावाहून व तात्यासाहेबाहून निराळे समजण्यांत येतील कां ? मला वाटत नाही की ज्ञानदेवोपासक याला हो म्हणून उत्तर देतील. तीच शब्द रचना वरील ओवीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ओवीची रचना अशी आहे,

अव्यक्त वाद मतीं ।

अव्यक्त वाद्याच्या मताने,

अव्यक्त ऐसी वदंती ।

ज्याला अव्यक्त म्हणतात -

तेचि हे प्रकृति । सांख्याचिया मति ॥

त्यालाच सांख्यशास्त्रांत सांख्याचे दृष्टीने प्रकृति म्हणतात.

वेदान्ती इयेते म्हणती माया ।

त्यालाच वेदान्ती माया म्हणतात.

असो किती बोलो वाया ।

उगेची फार काय बोलायचे,

अज्ञान हे ।

हेच अज्ञान आहे. बरे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अज्ञान शब्दाचा अर्थ जर, अव्यक्त प्रकृति माया या शब्दाच्या अर्थाहून निराळा त्यांनी केला असता तर अज्ञान शब्द भिन्नार्थी आहे असे म्हणता आले असते; पण तसेहि नाही. आत्मविस्मृति हे अज्ञानाचे लक्षण श्रीज्ञानेश्वरमहाराज करितात, शंकराचार्यहि आत्मविस्मृति हेच मायेचे मुख्य लक्षण समजतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अज्ञानाच्या स्वरूपाविषयी आणखी जे स्पष्टीकरण केले आहे ते -

तैसी स्वरूपी झाली माया । स्वरूप नेणणे जे धनंजया ॥ अ.१५.८७.

तसेच मायावाद्यांनी आपल्या ग्रंथातून मायेविषयी केले आहे.

''परमात्मा संघटण पाऊन स्थूल महाभूते होतो किंवा वेत्ताच थोडा कमी दर्जाचा होऊन वेद्य स्वरूपास येतो'' या महेश्वरानंदाच्या प्रक्रियेचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्वीकार केला असे चौदाव्या अध्यायातहि कोठे दिसत नाही. अज्ञानाचे स्पष्टीकरण करतांना -

तेवि वस्तु जैसी असे । तैसी कीर न दिसे ।
परी कांही अनारिसे । देखिजेना ॥७८॥
ना राती ना तेज । ते संधि जेवी सांज ।
तेवि विरुद्ध ना निज । ज्ञान आथी ॥७९॥
ऐसी कोणी एकी दशा । तिये वाद अज्ञान ऐसा ।
तया गुंडलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञ नाम ॥८०॥
अज्ञान थोरिये आणिजे । आपणपे तरी नेणिजे ।
ते रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचे ॥८१॥ (ज्ञाने.अ१४)

ज्याप्रमाणे मूळ वस्तु जशी आहे तशी न दिसतां किंवा दुसरेहि भलतेच न दिसतां, रात्र व दिवस यांच्यामधील संधिदशेप्रमाणे विपरीतहि दिसत नाही किंवा खरेहि ज्ञान नाही अशी जी दशा तिला अज्ञान म्हणतात. या अज्ञानाने युक्त चैतन्यास जीव म्हणतात.

आता अज्ञानासारिखे । वस्तु आपणपाचि देखे ।
परी रूपें अनेके । नेणो कोणे ॥८२॥

जीवचैतन्य भ्रमाने मी अज्ञानी आहे असे मानू लागले.

तेवि लचकलिया दिठी । मग देखणे जे जे उठी ।
तया नाम सृष्टि । मीचि विये पैं गा ॥८५॥
जैसे कां स्वप्न मोहा । तो एकाकी देखे बहुवा ।
तोचि पाड आत्मया । स्मरणेविण असे ॥८६॥

ज्ञानदृष्टीच्या ऐवजी अज्ञानदृष्टि आली की त्या दृष्टीला जे जे दिसेल त्यालाच सृष्टि म्हणतात व मीच त्या स्वरूपाने भासतो. ज्याप्रमाणे स्वप्न भ्रमाने एकच पुरुष आपल्याला बहुस्वरूपाचा झालेला पाहतो तसाच प्रकार आत्म्याला आत्मविस्मृति झाली असता होतो.

तरी माझी हे गृहिणी । अनादि तरुणी ।
अनिर्वाच्य गुणी । अविद्या हे ॥८८॥
इये नाही हेचि रूप । ठाणे हे अति उमप ।
हे निद्रिता समीप । चेता दुरी ॥८९॥
पै माझेनिचि आंगे । पहुडल्या हे जागे ।
सत्ता संभोगे । गुर्विणी होय ॥९०॥ (ज्ञा.अ१४)

येथे श्रीज्ञानेश्वरमहाराज अज्ञानाचे वर्णन करितांना, शंकराचार्याच्या वेदान्तातील अविद्या हेच अज्ञान आहे असे सांगतात. त्रिगुणात्मक, अनिर्वाच्य, अनादि अशी अविद्या, परमेश्वर म्हणतात माझी पत्नी आहे. मुळी अस्तित्वच नसणे हेच या अविद्येचे रूप होय. तिचे राहणे अमर्याद वस्तूवर आहे. विचार न करण्याच्याहि अगदी जवळ असते व विचार करणाऱ्याला कोठे दिसत नाही. 'माझेनि आंगे पहुडल्या' म्हणजे माझ्या सत्तेवर भासू लागली की तेवढाच सत्तेचा मिळालेला आधार तिला कार्योन्मुख करण्यास पुरेसा असतो. माझ्या सत्तेने सत्तावान झालेली ती अविद्या सृष्टीची गर्भधारणा करिते. या ओव्यांचा स्पष्टार्थ एवढाच की शंकराचार्यांप्रमाणेच श्रीज्ञानेश्वर महाराजहि सर्व जगत्पसारा अविद्याकल्पित मानतात.

नाना कल्लोळ परंपरा । संतती जैसी सागरा ।
आम्हा आणि चराचरा । संबंध तैसा ॥१२२॥
म्हणोनि जग परौते । सारूनि पाहिजे माते ।
तैसे नोहे उखिते । आघवेचि मी ॥

श्रीज्ञानेश्वर महाराजाच्या निरूपणात परब्रह्माचा व जगाचा संबंध दाखविण्याकरिता ह्या ज्या ओव्या दिल्या आहेत त्या अज्ञानदृष्टि व त्या दृष्टीमुळेच जगताचे ठिकाणी दिसणारे जड अनित्यादि धर्म नाहीसे झाल्यावर ज्ञानदृष्टीने येणाऱ्या अनुभवाचे वर्णन करणाऱ्या आहेत हे वर आम्ही वारंवार सांगितलेले आहे. त्या ओव्याकडे आम्ही दुर्लक्ष करीत नाही. परमेश्वराचा व जगताचा संबंध दाखवितांना या ओव्या जशा निरूपणांत आल्या आहेत. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरी पंधराव्या अध्यायांत या संसाराचे अश्वत्थ वृक्षाच्या रूपकाने वर्णन करितांना -

तैसा संसार हा वीरा । रुख नाही साचोकारा ।
मा उन्मूलनी दरारा । कायसा तरी ॥२१६॥
आम्ही सांगितली जे परी । मूळडाळांची उजरी ।
ते वांझेची घरभरी । लेकुरे जैसी ॥२१७॥
म्हणोनि पैं धनंजया । आम्ही वानिले रूप ते माया ।
कासविचेनी तूपें राया । वोगरिले जैसे ॥२२१॥
मूल अज्ञानचि तव लटिके । मा तयाचे कार्य हे केतुके ।
म्हणोनि संसार रुख सत्य के । वावोचि गा ॥२२३॥
म्हणोनि जन्मे ना आहे । ऐसिया सांगो कवण माये ।
या लागीं नाहीपणेचि होय । अनादि हा ॥२३३॥
अर्जुना ऐसेनि पाही । आद्यंत ययासी नाही ।
माजी स्थिति आभासे कांही । परी टवाळ ते गा ॥२३७॥

इत्यादि ओव्या आहेत. इकडे श्रीज्ञानदेवोपासकांचे लक्ष आम्ही वेधू इच्छितो. जगत्स्वरूप वर्णन करणाऱ्या ह्या दोन्ही प्रकारच्या ओव्या लक्षात घेऊन श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या मताचा निर्णय करावयाला पाहिजे असे आमचे म्हणणे आहे आणि असा विचार करणाऱ्याला श्रीज्ञानेश्वरमहाराज शंकराचार्यानुयायी आहेत असे स्पष्ट दिसून येईल.

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायांत संपूर्ण संसारवृक्षाचे वर्णन केले आहे. त्यांत संसारवृक्षाचे मूळ ऊर्ध्व म्हणजे ब्रह्म आहे असे सांगितले आहे. (अ.१५-७६) या परब्रह्माचे ठिकाणी संसारवृक्षाने कसे मूळ घेतले ते सांगतांना –

माया ऐसी ख्याति । नसतीच जया आथी ।
कां वांझेची संतति । वानणे जैसे ॥८०॥
तैसी सत् ना असत् होये । ते विचाराचे नाम ना साहे ।
ऐसी परीची आहे । अनादि म्हणती ॥८१॥
तो माया वस्तुच्या ठायी । असे जैसेनि नाही ।
मग वस्तुप्रभाचि पाही । प्रगट होय ॥८४॥
तैसी स्वरूपी झाली माया । आणि स्वरूप नेणणें जे धनंजया ।
तेचि तरु तया । मूळ पहिले ॥८७॥
वस्तूसी आपुला जो अबोध । तोचि ऊर्ध्वा आठुळिजे कंद ।
वेदान्ती हाचि प्रसिद्ध । बीज भाव ॥८८॥
ऐसी यया वेदांती । निरूपण भाषा प्रतीति ।
परी ते असो प्रस्तुती । अज्ञान मूळ ॥९०॥
ते ऊर्ध्व आत्मा निर्मळे । अधोर्ध्व सूचि ती मूळे ।
बळिया बांधुनि आळे । माया योगाचे ॥९१॥

शुद्ध ब्रह्माचे आधाराने जरी संसार वृक्षाची मूळे असली तरी शुद्ध ब्रह्माचा

संसारवृक्षाशी कांही संबंध नाही म्हणूनच संसारवृक्ष व ब्रह्म यांच्या मध्ये बळकट माया संबंधाचे आळे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्वीकारले आहे. माया व अज्ञान एकच असेहि दाखविले आहे. श्रीज्ञानदेवोपासकांनी आपल्या लेखात -

ऐसी यया वेदान्ती । निरूपण भाषा प्रतीति ।
परी ते असो प्रस्तुती । अज्ञान मूळ ॥

ह्या ओवीने पुनः श्रीज्ञानेश्वरमहाराज माया वगैरे न मानता अज्ञान मानतात असे विधान करितात पण त्या ओळीच्या पुढल्या ओळीतच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी -

बळिया बघुनि आळे । माया योगाचे ।

असे म्हणून मायेचा स्वीकार केला की नाही याचा विचार ते करीत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - माया हे नांव व्यर्थच आहे कारण वांझेच्या संततीस नांव देण्यासारखेच हे नांव आहे. ही माया सत् नाही असत् नाही. विचार करावयाला गेल्यास विचार करणाऱ्याला दिसत नाही. अशी ही अनादि आहे. आत्मविस्मृति हेचि तिचे स्वरूप होय. ही माया वस्तुतः नसल्यामुळे यथार्थ दृष्टीने पाहिल्यास जगत्पसारा हा वस्तूचा स्वभावच होय. अशा रीतीने खरोखर जगत् सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपच असून ते तसे न भासता अज्ञान्याला ते जड विनाशी भासते. याचे कारण श्रीज्ञानेश्वर महाराज असे देतात की ऊर्ध्व असे जे ब्रह्म, त्याचे विस्मरण हेच माया अज्ञान होय. हे अज्ञानच, सर्व संसार वृक्षाची मूळे धारण करणारा कंद आहे. येथूनच सर्व वृक्षाचा विस्तार झाला -

कां समुद्राचेनि पैसारे । वरी तरंगता आस्तरे ।

जेवढा समुद्राचा विस्तार असतो तेवढाच तरंगाचा विस्तार असतो किंवा –

परी शिंपीचि एवढे उमटे । रूपे जेवि ॥

जेवढी शिंप असते तेवढेच रूपे भासते त्याप्रमाणे -

तैसे ब्रह्मचि होय वृक्षाकारे । अज्ञानमूळ ॥

अज्ञानामुळे सर्व ब्रह्मच संसाररूप भासते.

तरी क्षणिकत्वेचि अश्वत्थ । बोलिजे हा ॥

हा संसार वृक्ष अत्यंत क्षणिक आहे.

तैसा व्ययेचि हो रूख । अव्यय गमे ॥

हा संसार वृक्ष इतका क्षणिक व नाशिवंत आहे की, विनाशीपणाचे वेगामुळे तो अविनाशी आहे असा भ्रम होतो.

नाही अज्ञानावाचूनी मूळ ।

या संसार वृक्षास अज्ञानाखेरीज मूळ नाही म्हणून –

ययाचे असिलेपण टवाळ ।

याचे असणेपण म्हणजे अस्तित्व खोटे आहे.

ऐसे झाड सिनसाळा । देखिले जेणे ॥

हा प्रपंच वृक्ष सर्व खोटा म्हणजे ह्याला स्वतंत्र वस्तुत्व नाही व स्वतंत्र अस्तित्व नाही असे ज्याने ओळखले त्याला -

तयाते गा पांडुसंता । मी सर्वज्ञहि म्हणे जाणता ॥

आम्ही जाणता शहाणा म्हणतो.

आपुलिया अज्ञानासाठी ।

आपल्या ब्रह्मरूपतेचे आपल्याला ज्ञान नसल्यामुळे –

नव्हता थावळा किरीटी ।

खोटाच जगत्प्रपंच भासतो त्याला –

तरी आता आत्मज्ञानाच्या लोटी । खांडेनि गा ॥

आपल्या ब्रह्मरूपतेच्या ज्ञानखड्गाने छाटून टाक.

जिये का वस्तूचे नेणणे । आणिले थोर जगा जाणणे ।

आत्मवस्तूचे न जाणणे हेच जगाला जाणण्याला कारण आहे.

या अनेक ओव्यावरून जड विनाशी जगत् अज्ञान भ्रांतिमूलक आहे असेच श्रीज्ञानेश्वर महाराजांना मान्य आहे असे स्पष्ट दिसते. त्याचप्रमाणे शुद्ध चैतन्याच्या ठिकाणी जीवभावहि अज्ञानकल्पितच महाराज मानतात –

तैसा स्वमन ये वेटाळे । शुद्ध जे मी ॥

अज्ञानामुळे शुद्ध चैतन्याचे ठिकाणी,

ऐसे शरीराचि ऐवढे । जे आत्मज्ञान वेगळे पडे ॥

ब्रह्मापुरते अमर्यादित असणारे आत्मज्ञान, देहापुरतेच मर्यादित होते. त्या देहापुरत्या मर्यादित आत्मज्ञानाला जीवभाव म्हणतात. या अज्ञानमूलक जीवालाच उत्पत्तिनाश खरे वाटतात.

अगा उपजणे निमणे । हे साचचि जे का मानणे ।
तो जीवलोक मी म्हणे । संसार हन ॥ (१५-३४७)
जीव जगत् ही दोन्ही भ्रांतीने भासणारी परमेश्वराची रूपे आहेत हे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे हे आम्ही दाखवित आलो. त्यांच्या मते हे सर्व भ्रांतिमूलक आहे हे आणखी दुसऱ्या रीतिने त्यांनी दाखविले आहे. भ्रांतीने भासलेल्या प्रकाराने मूळ वस्तूत किंवा तिच्या मूळच्या धर्मात यत्किंचित फरक पडत नाही –
यत्र यदध्यासस्तत्कृतेन दोषेण गुणेन वा अणुमात्रेणापि स न संबध्यते ।
असे शंकराचार्य म्हणतात. म्हणजे दोरीवर भासलेल्या सर्पधर्मानी दोरी कधीच युक्त होत नाही. परमेश्वरावर भासलेल्या जगताचे जड विनाशी दुःखादि धर्मानी किंवा कर्ताभोक्ता अज्ञानी इत्यादि जीवाचे धर्मानी परमेश्वर कधीच युक्त होत नाही.
तैसे माझे अनादिपण न मोडे । माझे अक्रियत्व न खंडे ।
परी कर्ता भोक्ता ऐसे आवडे । ते जाण गा भ्रांति ॥
परमात्मा अनादिच राहतो. उत्पन्न होत नाही. म्हणून जगद्रूपाने उत्पन्न होतो असे वाटते ती भ्रांति होय. परमात्मा नित्य अक्रिय आहे म्हणून तो सृष्टिकर्ता आहे असे म्हणणे ही भ्रांति होय. परमात्मा भोक्तृत्वाचा साक्षी आहे.
भोक्तुः स आत्मेति - (शांकरभाष्य)
म्हणून त्याला भोक्ता म्हणणे हीहि भ्रांतिच आहे.
जैसे स्वप्नी परिव्राजे । आपणया आपण कुटुंब होईजे ॥
मग तयाचेनी धांवे । मोहे सैरा ॥
जसा एखादा संन्यासी मी संन्यासी आहे असे स्वप्नात विसरल्यामुळे आपणच तेथे बायको मुले वगैरे सर्व कुटुंब बनतो त्याप्रमाणे,
तैसा आपुलिया विस्मृति । आत्मा आपणचि प्रकृति ।
सारखा गमोनि पुढती । तियेसीचि भजे ॥१५.३५४.
आपल्या स्वरूपास विसरलेला जीवात्मा आपल्यालाच प्रकृति जगत्स्वरूप झालेला पाहतो व त्या प्रकृतीच्या ठिकाणी मोहित होऊन तिचेच सेवन करितो.
पै नेणतया प्रती । रूपेपणाची प्रतीति ।
रूपें न होनि शुक्ति । दावी जेवि ।
खरे ज्ञान नसलेल्याला शिंप जशी रूपे न होता रुप्याचा भास दाखविते किंवा सोने अलंकार दशेत आल्यावर मूर्खाला सोने लपल्यासारखे होऊन जाते त्याप्रमाणे,
विश्व न होवोनिया तैसे । विश्व जो धरी ।
परमेश्वर स्वतःस सच्चिदानंदस्वरूपापासून कधीही च्युत न होता किंवा जड विनाशी धर्मयुक्त न होता जड विनाशी अशा जगाला धारण करितो.
तैसा विश्वपणे कांही होये ।
परमात्मा विश्वस्वरूप झाला म्हणजे त्याच्या सच्चिदानंद स्थितीत बदल होतो असे नाही किंवा -
विश्वलोपी केही जाये ।
विश्व नाश पावले की नाश पावतो असे नाही.
तैसा कंहीचि कोणीकडे । कायिसे तिहि वेची न पडे ।
जयाचे सांगडे । जयासी ॥
केव्हाहि कोण्याहि अंशाने, कशाच्यानेहि त्याच्या स्वरूपात न्यूनपणा येत नाही. ह्या भगवंताच्या लीलेस कशाचीहि उपमा देता येत नाही. अमृतानुभवातहि श्रीज्ञानेश्वरमहाराज -
तैसे भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ।
हे सरले अद्वैता । अफुटामाजी ॥९॥

जगत् ब्रह्मरूप केव्हा आहे

आता श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जलतरंग, सुवर्ण अलंकार यांचे दृष्टांत देऊन परब्रह्माचा व जगताचा जो संबंध दाखविला आहे, जग बाजूला सारून ब्रह्म घेण्याची गरज नाही, जगासहितच परब्रह्म आहे, असे जे प्रतिपादन केले आहे आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांना शंकराचार्याचा मायावाद मान्य नाही म्हणून घंटानाद करीत आहेत त्या ओव्यातील दृष्टांतानुसार जगद्ब्रह्मरूप केव्हा दिसते हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओव्यावरून आपल्याला सापडते.
चेइलिया आपुले ज्ञान । जैसे नाहीचि होय स्वप्न ।
जागे झाल्या बरोबर जसे स्वप्न नाहीसे होते त्याप्रमाणे -
तैसे स्फुरते त्रिभुवन । वावो झाले ॥
ज्ञानचित्रे म्हणजे ज्ञानसूर्याचा उदय झाल्याबरोबर जड विनाशी धर्माने प्रत्ययास

येणारे सर्व त्रिभुवन खोटे स्वप्नासारखे होते किंवा -

कां हाती घेतलिया माळा । फिटे सर्पाभासाचा कांटाळा ।
तैसे माझेनि बोधे टवाळा । नागवे तो ॥५६१॥

हाती घेऊन पाहिली व माळ असे कळल्यावर सर्पाचा भास व भीति नाहीशी होते त्याप्रमाणे ब्रह्मबोध झाला की ह्या खोट्या जगाचे ठिकाणी तो ज्ञाता फसत नाही.

लेणें सोनेचि जाणें । तो लेणेपण ते वाव म्हणे ।
तेवि मी जाणोनि जेणे । वाळिला भेद ॥(५६२-१५)

अलंकार सोनेच आहे असे जाणणारा ज्याप्रमाणे अलंकार खोटे म्हणजे सोन्याहून निराळी वस्तु नव्हे असे म्हणतो त्याप्रमाणे परमेश्वराला जाणणाऱ्याच्या ज्ञानदृष्टीत जीव, जगत्, ईश्वर हे तीन पदार्थ परस्पराहून निराळे आहेत असे कधी येत नाही.

जगत् ब्रह्मस्वरूप होते म्हणजे काय?

आत्मज्ञानाने जीव, जगत् व ईश्वर यांचा भेद जाऊन अद्वैत बोध उत्पन्न झाल्यावर एक परब्रह्मच तीन रूपाने भासते असा अनुभव येतो. या अद्वैत अनुभवातहि जीव, जगत्, ईश्वर हे जे सर्व एकरूप भासतात ते काय? पूर्वी अज्ञानदशेत ज्या धर्माचे भासत होते त्या धर्माने युक्तच भासतात आणि तसे भासत असले तरी ब्रह्मकार्य म्हणून ते ब्रह्मरूपच आहेत असे ज्ञानी पुरुष म्हणतो की अज्ञान दशेत ज्या कर्ताभोक्ता इत्यादि धर्माने युक्त जीव व जड विनाशी धर्माने जगत् भासत होते ते धर्म जाऊन त्या ऐवजी जीव हा अकर्ता, अभोक्ता सच्चिदानंद स्वरूप व जगत् तसेच सच्चिदानंद स्वरूप त्याला भासू लागते हा मुख्य प्रश्न आहे. याचे उत्तर शंकराचार्यांचे मतानुसार आम्ही वर दिलेच आहे. आता श्रीज्ञानेश्वरमहाराज काय म्हणतात हेच पहावयाचे आहे.

मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंद । मीचि एक स्वतःसिद्ध ।

या ओवीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानी पुरुषाला, जीव जगत् ब्रह्म स्वरूपाने म्हणजे सच्चिदानंद स्वरूपानेच अनुभवाला येतात असेच मानले आहे, हे स्पष्ट दिसते.

उपसंहार

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्ञानेश्वरी किंवा कोणत्याहि इतर ग्रंथाचा विचार करून श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे विचार श्रीशंकराचार्यांशी जुळतात की श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात त्याप्रमाणे महेश्वरानंदाशी जुळतात हे पाहू गेल्यास, 'भाष्यकारासी वाट पुसतच' ते आपल्या सर्व ग्रंथात विहार करीत आहे असेच दिसून येते.

(१) भाष्यकार शंकराचार्य ब्रह्म किंवा आत्मा याचे ठिकाणी कर्तृत्व मानीत नाहीत. श्रीज्ञानेश्वरमहाराजासहि,

आणि कर्तृत्व कुळाळाचे । येथ काय ते पृथिवीयेचे ।
आधारावाचूनि वेचे । विचारी पां ॥१८॥

माती घटाला आधार व कर्तृत्व कुंभाराचे त्याप्रमाणे ब्रह्म जगताला आधार व कर्तृत्व प्रकृतीचे असेच मानतात.

(२) जीव हा कर्ता आहे पण प्रकृतीचे कर्तृत्व त्याने आपल्यावर ओढून घेतले. खरोखर त्याचे शुद्ध स्वरूप ब्रह्म कर्तृत्वरहितच आहे असे आचार्य म्हणतात. श्रीज्ञानेश्वर महाराजहि असेच म्हणतात –

तैसे पांच हेतु मिळणीं । पांचचि इही कारणीं ।
कीजे कर्मलतांची लावणी । आत्मा सिना ॥ १८-३१३

जीव, देह, इंद्रिये, क्रिया व देवता या पांच कारणापासून सर्व क्रिया प्रगट होते; आत्म्याशी क्रियेचा संबंध नाही.

प्रकृति करी कर्मे । तो म्या केली म्हणे भ्रमें ।
येथे कर्ता येणे नामें । बोलिजे जीव ॥

(३) सर्व जग भ्रमाचे कार्य आहे. भ्रमाच्या कार्यास कर्ता नसतो म्हणून जगास कोणी कर्ता नाही. शास्त्रात परमेश्वराला जगत्कर्ता ठरविले ते अज्ञानी जीवाच्या दृष्टीने ठरविले आहे. खरोखरच परमेश्वर जगाचा कर्ता आहे या दृष्टीने नव्हे, असे शंकराचार्य म्हणतात.

जगचि हे होय जाय । तो शुद्धिहि नेणे ॥ (ज्ञा. ५-७६)

हे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वचन आम्ही वर दिले आहे.

(४) ब्रह्म निर्विकल्प आहे म्हणजे सर्व त्रिपुटीरहित आहे. त्याचे ठिकाणी जसे कर्तृत्व नाही तसेच ज्ञातृत्व व भोक्तृत्वहि नाही. त्याचे ठिकाणी जड विनाशी जगदुत्पन्न करण्याविषयी संकल्प किंवा कल्पना देखील उठत नाही, 'सोऽकामयत'

इत्यादि श्रुतीत भगवंताला कामना झाली असे जे सांगितले आहे ती जगद्विषयक कामना नसून शुद्ध सच्चिदानंदलक्षणात्मक कामना होय असे शंकराचार्य म्हणतात.

श्रीज्ञानेश्वर महाराजांचेहि असेच म्हणणे आहे.

तैसी अबोधाचिये कुशी । कर्म कर्ता कार्य ऐसी ।
त्रिपुटी असे ते जैसी । गाभिणी मारिली ॥ (१८-९७१)

गर्भिणी मेली की जसा गर्भहि मरतो तशी अज्ञाना पोटी असलेली त्रिपुटी, अज्ञान मेले की मरते.

जाला ज्ञातृज्ञेयाविहीन । चिदाकार ॥

ज्ञातृज्ञेयादि त्रिपुटीरहित केवल चैतन्य मात्र होतो.

तैसे नेणणें जे गेले । तेणें जाणणेहि नेले ।
मग निष्क्रिय उरले । चिन्मात्रचि ॥ (१८-५७७)

अज्ञान नाश पावले की ज्ञानहि नाश पावते. मग निष्क्रिय असे केवल चैतन्य राहते.

तेथ स्वभावें धनजंया । नाही कोणीची क्रिया ।
म्हणूनी प्रवाद तया । नैष्कर्म्य ऐसा ॥ (१८-९८८)

अर्जुना, परब्रह्माचे ठिकाणी स्वभावतः कोणतीच क्रिया नाही . म्हणून त्याला नैष्कर्म्य म्हणतात. ज्ञान व अज्ञान नाहीसे झाल्यावर जी निर्विकल्प दशा राहते तीच परम सिद्धि होय. १८-१८२

ऐक्याचे एकपण सरे । जेथ आनंद कणहि विरे ।
कांहीचि नुरोनि उरे । जे कांही मा ॥ (१८-१००५)

ज्या ठिकाणी अद्वैताची जाणीव राहत नाही. भोक्तृत्व निःशेष नाहीसे होते. दुसरे कांही उरत नाही. तेच एक उरते असे ब्रह्म निर्विकल्प आहे. अमृतानुभवातहि या परब्रह्माची निर्विकल्पावस्था वर्णन केली आहे.

जो आपणासी नव्हे विखो । तो कोण लाहे देखो ॥

जे ब्रह्म आपल्यालाच जाणू शकत नाही म्हणजे आपणच आपल्याला जाणण्यापूरतेहि ज्ञातृज्ञेय भावाला येऊ शकत नाही त्याला ज्ञेय करून दुसरा कोणी कसा जाणणार!

(५) जीव हा अज्ञानी आहे. त्याच्या अज्ञानामुळे नामरूपाचा जगत्पसारा खरा वाटतो. वास्तविक तो मृगजलासारखा खोटा आहे. हा जगत्पसारा नाहीसा झाल्याखेरीज जीवाला खरे आत्मस्वरूप कळू शकत नाही. म्हणून तो ज्ञानाने नाहीसा करून आत्मज्ञान झाल्यावर मग जगतहि सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप भासू लागते ही विचारसरणी शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज या दोघांनाही सारखीच मान्य आहे. जगत् अज्ञानभ्रमाचे कार्य आहे हे मान्य असलेल्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मतात शंकराचार्याचा मायावाद आपोआपच येतो व महेश्वरानंदाची जगत्प्रक्रिया त्यांनी स्वीकारली नाही हे आपोआप सिद्ध होते.

किरकोळ मुद्यांचे परीक्षण

याप्रमाणे जगत् म्हणजे काय, त्याचा कर्ता कोण, कर्त्याशी जगताचा संबंध कोणता इत्यादि मुख्य सिद्धांतविषयक श्रीज्ञानेश्वर महाराजांची विचारसरणी शंकराचार्याशी जुळते हे आम्ही दाखविले. काही किरकोळ साम्य उपस्थित करून श्रीज्ञानेश्वरमहाराजांना महेश्वरानंदाचे मतानुयायी आहेत असा दाखविण्याचा जो श्रीज्ञानदेवोपासकांनी प्रयत्न केला आहे त्या मुद्याचे आता परीक्षण करू.

गोरखनाथच महेश्वरानंद काय?

आमचे मत असे आहे की, कोणतेहि ठाम विधान करायला निश्चित काही आधार असावा लागतो. एकाच नांवाने दोन पुरुष राहू शकतात. काही वर्षापूर्वी श्रीज्ञानदेवांचा योगवासिष्ठ म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध झाला. पण त्या ग्रंथात मानभावाच्या ग्रंथातून मांडलेले विचार दिसून आले. पुष्कळांना हा फरक कळून आला नाही. पुष्कळ लोक तो ग्रंथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा आहे असे समजू लागले. अजून कित्येक समजत असतीलहि. पण श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे जे ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत त्यातील सिद्धांताशी, विरोधी असणाऱ्या सिद्धांताचे प्रतिपादन करणारे ग्रंथ तेच कसे लिहितील हा विचार त्यांच्या डोक्यात येत नाही. सर्व पंथांचे सिद्धांत ठरलेले आहेत, त्या पंथाचे लोक त्या त्या सिद्धांताला धरूनच ग्रंथ करितात व तसेच केले आहेत, **आपल्याला संमत असलेल्या सिद्धांताला परमताची पुष्टि मिळत असल्यास तेवढ्यापुरते परमताचे वचन प्रमाण मानण्याची दर्शनकारांची प्रथा आहे.** अशा ठिकाणी परमताचे वचन प्रमाण मानले म्हणून ग्रंथकर्त्यावर परमताचा पगडा बसला असे विधान ठोकून देणे मूर्खपणाचे होते.

कारण आपल्या सिद्धांताला परमताचीहि संमती आहे एवढेच त्या अभ्युपगमाने दाखविले जाते. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या गुरुपरंपरेने जे ज्ञानविचार ह्यांना मिळाले ते त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि ग्रंथातून मांडले आहेत व ते सर्व एकसारखेच आहेत, त्यांच्यात मुळीच फरक नाही. अर्थातच हे सर्व विचार गुरुपरंपरेचेच असल्यामुळे गोरक्षनाथांचेहि तेच विचार होते. कारण तेच विचार त्यांनाहि गुरुपासूनच प्राप्त झाले हे उघड आहे. महेश्वरानंदाचे विचार व श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे विचार परस्पराशी जुळत नाहीत हे ज्ञानेश्वरीचा विचार केल्यास स्पष्ट दिसते. तेव्हा गोरखनाथांचे विचार महेश्वरानंदाचे विचाराशी जुळत नाहीत असे म्हणणे भाग आहे. असे असताना महेश्वरानंदाला गोरक्षनाथ ठरविणे हा अव्यापारेषु व्यापार होय.

नाथ संप्रदायात गोरक्षनाथांचा महेश्वरानंद म्हणून कोठेही उल्लेख नाही. प्रत्येक सांप्रदायिकाला आपल्या सांप्रदायिक महापुरुषांना नमस्कार करावा लागतो. त्याकरिता प्रत्येक सांप्रदायिकाला आपली संप्रदायपरंपरा गुरुकडून सांगितली जाते. तुकाराममहाराजांना उपदेश झाला तेव्हा बाबाजी चैतन्यांनी परंपरा सांगितली असे महाराजांनीच अभंगात नमूद केले आहे. संप्रदायपरंपरेत सांप्रदायिक नांवच घेण्यात येते दुसरे घेतले जात नाही. नाथ संप्रदायात योग व मंत्रशास्त्रे याचा अभ्यास असून गोरखनाथांच्या ठिकाणी तो होता हे नाथचरित्रावरून दिसते. तो अभ्यास महेश्वरानंदाच्या ठिकाणी दिसत नाही. तो असता तर, श्रीज्ञानदेवोपासकांनी त्याचा निश्चित उल्लेख केला असता. महेश्वरानंदाचे ग्रंथातून ज्या सिद्धांताचे किंवा जगत्प्रक्रियेचे वर्णन दिसते ती प्रक्रिया काश्मीरकडील प्रत्यभिज्ञामताची दिसते. अभिनवगुप्त व त्यांच्या ग्रंथाच्या उल्लेखावरून महेश्वरानंद प्रत्यभिज्ञामतानुयायी असावेत व म्हणूनच त्यांनी प्रत्यभिज्ञामतानुयायी अभिनवगुप्ताचार्य व त्यांच्या ग्रंथाचा उल्लेख केलेला आहे. आपले तत्त्वज्ञान मंडन करणाऱ्या मध्वाचार्यादि द्वैत-अद्वैतवादी आचार्यांनी उपनिषदे, ब्रह्मसूत्र व गीता हे ग्रंथ प्रमाण मानूनच त्यातून आपलेच मत सांगितले आहे, किंवा आपण म्हणतो त्याप्रमाणेच भगवंतांनी अर्जुनाला उपदेश केला आहे असेच प्रतिपादन केले आहे; महार्थमंजरीकारानीही तीच प्रथा स्वीकारली एवढ्यावरून काही महेश्वरानंद गोरक्षनाथ होय असे ठरविता येत नाही. असे अनिश्चित विचार कोणताहि निश्चय करण्याला उपयोगी पडत नाहीत. उलट वाचकांच्या मनांत घोटाळा मात्र उत्पन्न करितात. महेश्वरानंदानी महार्थमंजरी ग्रंथ लिहितांना, तो ग्रंथ लिहिण्याला कारण एका योगिनीने स्वप्नात येऊन ग्रंथ करण्यास आदेश दिला असे दिले आहे. हे कारण पाहता, शिवसूत्रविमर्षणी म्हणून जो प्रत्यभिज्ञामताचा ग्रंथ आहे त्यात शिवसूत्रे कशी सांपडली हे सांगताना ग्रंथकर्त्यानी अशीच स्वाभाविक सूचना झाल्याचे सांगितले आहे. यावरूनही महेश्वरानंद प्रत्यभिज्ञमतानुयायी दिसतात. श्री पांगारकरांनी लिहिलेला मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ ला यात पृ. ४४८ वर जो गोरक्षनाथाविषयी मजकूर आला आहे तेथे श्रीपांगारकरानी गोरक्षनाथांच्या अमरनाथ संवाद या ग्रंथातील उतारा देऊन गोरक्षनाथ कोणत्या मताचे होते हे दाखविले आहे.

नातरी नाथलिये वांझेचे लेकरू । त्रिभुवन तैसा दृश्य प्रपंचु लटिकाचि ।

इत्यादि वचनावरून अस स्पष्ट दिसते की श्रीशंकराचार्याप्रमाणेच गोरक्षनाथहि जगत्प्रपंच खोटाच मानीत होते. तेव्हा ज्या गोरक्षनाथाना श्रीज्ञानदेवोपासक महेश्वरानंद बनवूं पाहतात त्या गोरक्षनाथांचे व महेश्वरानंदाचे विचारसाम्य दिसून येत नाही. श्रीज्ञानदेवोपासकानी इतक्या दूर गोरक्षनाथाकडे धांव घेण्यापेक्षा श्रीज्ञानेश्वर महाराजांचे साक्षात् गुरू जे निवृत्तिनाथ महाराज यांच्यापासूनच त्यांना बोध झाला असल्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान कोणते आहे, याचा त्यांच्या अभंगादिकावरून पाहिले असते आणि श्रीज्ञानेश्वरापासून विसोबा खेचर व तेथून नामदेव महाराजांना ते ज्ञान प्राप्त झाले असल्यामुळे नामदेव महाराजांचे तात्त्विक विचार कोणाशी जुळतात हे पाहिले असते तर श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पंथातील तत्त्वज्ञानाचा उलगडा सहज झाला असता. पण हे जवळचे खात्रीचे पुरावे सोडून श्रीज्ञानदेवोपासकांनी अनिश्चित व विपरीत पुराव्याच्या पायावर आपल्या विचाराची भिंत उभारली ती कशी टिकणार! अर्थात् ती ढासळली त्यांत काही आश्चर्य नाही. पण अशी अनुमाने कांहीहि निश्चय करण्यास मदत करीत नाहीत हे वरप्रमाणेच आताहि आम्ही म्हणतो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा तत्त्वविचार व शंकराचार्याचा तत्त्वविचार यांचे पूर्णपणे साम्य आहे हे कोणत्याहि सरळ वाचकास दिसून येईल.

श्रीज्ञानेश्वरमहाराज शंकराचार्यांचे झिरपे काय?

सर्व आर्यपंथामध्ये सर्वच ज्ञान परमेश्वरापासून लाभले असेच मानले

असल्यामुळे मूळ परमेश्वरावाचून सर्व जीव झिरपेच आहेत. आदिनाथ संप्रदायांत आदिनाथावाचून बाकीच्यांनी परंपरेनेच ज्ञान प्राप्त झाले असल्यामुळे मत्स्येंद्रनाथापासूनच तर त्या संप्रदायांतील शेवटल्या शिष्यापर्यंत सर्व झिरपेच होत. श्रीज्ञानदेवोपासकांचा हा प्रस्तुत प्रयत्न श्रीज्ञानेश्वरमहाराज हे कोणाचे झिरपे नाहीत असे दाखविण्याचा नसून ते शंकराचार्याचे झिरपे नाहीत, महेश्वरानंदाचे झिरपे आहेत असे दाखविण्याचा आहे.

साम्यस्थल

श्रीज्ञानदेवोपासकानी श्रीज्ञानेश्वरी इत्यादि महाराजांच्या ग्रंथातून व महेश्वरानंदाच्या महार्थमंजरीग्रंथातून साम्यार्थी स्थळे दाखविली आहेत. ही साम्यार्थी स्थळे म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराज व महेश्वरानंद दोघेहि ब्रह्मापासून झालेले जगत् ब्रह्मस्वरूपच आहे असेच मानतात हे दाखविण्याकरिता दिली आहेत. आम्हीहि श्रीशंकराचार्यहि जगत् ब्रह्म स्वरूपच मानतात हे दाखविण्याकरिता दिली आहेत. तत्त्वतः विचार करणाऱ्यांना म्हणजे ज्ञानी पुरुषाला जगताचे ब्रह्मरूपाने दर्शन होते; पण ज्ञानापूर्वी जे जगताचे जडविनाशी भावाने दर्शन होते ते मात्र ब्रह्मदर्शन नव्हे, ते मायाभ्रमाचे दर्शन आहे असे श्रीज्ञानेश्वर महाराज व शंकराचार्य म्हणतात, श्रीज्ञानेश्वरमहाराज जगताच्या जड विनाशी भावाने होणाऱ्या दर्शनाला जसे माया म्हणतात तसे महेश्वरानंदहि म्हणतात असे दोघांच्या प्रतिपादनातील साम्य किंवा महेश्वरानंद जसे जड विनाशी जगत् ब्रह्मच आहे म्हणतात, ते मायेचे नांवहि घेत नाहीत, त्याप्रमाणे श्रीज्ञानेश्वर महाराजहि मायेचे नांव घेत नाहीत. व ब्रह्मच जड विनाशी भावाने युक्त झाले आहे असे महेश्वरानंदाप्रमाणे समजतात हेहि साम्य त्यांना दाखविण्यांत आले नाही. या अर्थाच्या ओव्याचा विचारच त्यांनी नजरेआड केला आहे. मात्र अशा अर्थाच्या ओव्या ज्ञानेश्वरीत असून त्याचे शंकराचार्याच्या विचाराशी साम्य आहे हे आम्ही दाखविले आहे.

परिभाषा

बुडणाऱ्यानी गवताच्या काडीचा आधार पाहावा त्याप्रमाणे श्रीज्ञानदेवोपासक, भजने, भक्ति, वंदन इत्यादि कांही शब्दाचे अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी महेश्वरानंदाप्रमाणे केले आहेत हा आधार देऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांना महेश्वरानंदाचे अनुयायी ठरवू पाहात आहेत. पण बुडणाऱ्यास काडीचा आधार काही उपयोगाचा होऊ शकत नाही. त्याप्रमाणे वरील आधारहि श्रीज्ञानदेवोपासकांना साह्य देत नाही. आम्ही श्रीज्ञानदेवोपासकांना अशी विनंती करतो की, कांही शब्दांचे अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजानी महेश्वरनंदाप्रमाणे केले आहेत हे विधान आपण उदाहरणे देऊनच करावयाला पाहिजे. कारण आतापर्यंत आपण जी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने, महेश्वरनंदाशी जुळतात म्हणून दिली ती सर्व त्याचा मागचा पुढचा संबंध छपवून ठेऊन पुढे केली आहेत. मागला पुढला संबंध दाखविणाऱ्या ओव्या देऊन त्या ओव्या महेश्वरानंदाच्या तत्त्वविचाराशी कशा जुळत नाही हे आम्ही दाखविले आहे. प्रस्तुत अनुभवावरून आम्हाला निश्चित वाटते की त्यांनी जसा पुरावा पुढे मांडला किंवा जसे विधान केले ते तसेच्या तसे खरे मानून चालण्यांत आपली फसवणूक होते. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्या वचनाच्या आधारे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमुक शब्दाचा अर्थ महेश्वरानंदाप्रमाणे केला आहे असे ते विधान करितात ते श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन उद्धृत केले पाहिजे. आम्हाला मात्र असे कोठेच आढळून आले नाही. सांख्य वेदान्त्यांनी स्वीकारलेला प्रकृति अव्यक्त माया शब्द सोडून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अज्ञान शब्द स्वीकारला आहे. असे एक विधान श्रीज्ञानदेवोपासक करितात व ते कसे चूक आहे हे आम्ही वर दाखविले आहे. पुनः ते म्हणतात क्षेत्र शब्द हा आचार्यांनी देवाला लावलेला आहे. पण श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी परब्रह्माचे खाली स्थावरापर्यंत जे काही आहे ते क्षेत्र होय अशी क्षेत्राची व्याख्या केली आहे. श्रीज्ञानदेवोपासकांना श्रीज्ञानेश्वरमहाराज शंकराचार्यांप्रमाणे शब्दांचे अर्थ करीत नाही हे मुद्दाम दाखवावयाचे आहे म्हणून त्यांनी तेराव्या अध्यायातील पहिल्या श्लोकांवर टीका करितांना श्रीज्ञानेश्वरमहाराज क्षेत्र कशाला म्हणतात हे न पाहता एकदम त्यानी ५ व्या व ६ व्या श्लोकाच्या टीकेवर उडी मारली व तेथून क्षेत्र शब्दाचा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आचार्यांहून भिन्न केला आहे असे दाखविले. पण क्षेत्राचा हा अर्थ,

प्रकृतिश्च त्रिगुणात्मिका सर्वं कार्यं कारणविषयाकारेण परिणता पुरुषस्य भोगापवगार्थकर्तव्यतया देहेन्द्रियाद्याकारेण संहन्यते सोयं संघात इदं शरीरम् ।

शंकराचार्यानीहि ह्या पंक्तीत दिला आहे. एकच अर्थ निराळ्या रीतीने प्रतिपादण्यात आला की श्रीज्ञानदेवोपासक त्याला भिन्नार्थ म्हणतात असे दिसते. श्रीज्ञानेश्वरमहाराजहि शंकराचार्यांप्रमाणेच -

तरी पार्था परिसिजे । देह हे क्षेत्र म्हणिजे ।

क्षेत्राचा अर्थ देह असाच करितात. पुढे क्षेत्ररूपी देहाचा विस्तार सांगतांना श्रीज्ञानेश्वरमहाराज व शंकराचार्य दोघेहि संपूर्ण छत्तीस तत्वाचा संघात हेच क्षेत्र आहे असे म्हणतात. ज्ञानेश्वरी अ. १५ ओवी ५५४ -

आपुलिया संकोच विकाशा । आपणचि रूप वीरेशा ॥

या ओवीचा दाखला देऊन श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात की श्रीज्ञानेश्वर महाराजांना जगताविषयी संकोच विकास प्रक्रिया मान्य आहे. ब्रह्मस्वरूप जाणणाऱ्या ब्रह्मदेवाचे दृष्टीने नुसत्या नामरूपामुळे ब्रह्मच जगत्स्वरूप होते व नामरूपेहि ब्रह्माशी अभिन्न भासतात म्हणून सर्व जगत् ब्रह्मरूपच आहे हे तत्त्व शंकराचार्यहि मान्य करितात. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या बाबतीत शंकराचार्याचेच अनुकरण केले आहे. कारण या प्रत्ययात जड उत्पत्ति, नाश हे प्रत्यय राहत नाहीत हे दोघेहि सारखेच मानतात. वर आम्ही हा मुद्दा वारंवार मांडला व त्याचे स्पष्टीकरणहि केले आहे की ज्ञानदृष्टीने जगत् ब्रह्मरूप आहे हे शंकराचार्य मानतात याविषयी वादच नाही. प्रश्न आहे तो अज्ञानाला भासणाऱ्या जड विनाशी जगताविषयीचा आहे. तो अज्ञानाचा प्रत्यय भ्रांति आहे असे शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज दोघेहि म्हणतात. आम्ही श्रीज्ञानदेवोपासकांना अशी प्रार्थना करितो की मुख्यतः मतभेद जेथे असेल तेवढाच मुद्दा घेऊन विचार करणे बरे. म्हणून संकोच विकास ह्या शब्दाचे अल्पदेशव्यापित्व व बहुदेशव्यापित्व हे जे अर्थ आहेत ते अर्थ जर परब्रह्माचे संकोच विकासाचे ठिकाणी येत नसेल तर वाद राहत नाही कारण ते संकोच-विकास परब्रह्माचे न ठरतां परब्रह्मावर नामरूपाचे संकोचविकास ठरतील हे आचार्याना मान्य आहे. मग विनाकारण श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा सिद्धांत शंकराचार्याहून निराळा आहे असा उद्घोष करण्यांत काय अर्थ आहे. या ठिकाणी संकोचविकास आभास मात्र ठरतात व ते अज्ञानी लोकांना ब्रह्म व जगत् यांचा अन्योन्य संबंध दाखविण्याकरिताच उपयोगिले जातात. एरवी ज्ञान्याचे दृष्टीने एकरस बह्मवस्तूचे ठिकाणी संकोचविकास सामान्य-विशेष इत्यादि वस्तुतः काही मानता येत नाही. परब्रह्माची नामरूपात्मक लीला काही दृष्टांत देऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी समजविण्याचा प्रयत्न केला पण शेवटी त्यानी हे दृष्टांत सर्व कुचकामाचे आहेत, परब्रह्माची ही लीला कोणत्याहि दृष्टांताने सांगता येत नाही.

ऐसा निरूपमा परि । आपुलिये विलासवरी ।
आता राणीव करी । आपुला ठायी ॥

असे अमृतानुभवांत महाराज म्हणतात. तसेच चैतन्य दृश्यपणाने स्फुरले तरी -

तैसा चैतन्ये गिवसला । चिद्रूप स्फुरे ॥

ते स्फुरण जड नसते, चैतन्यच असते असे महाराज म्हणतात. तेव्हा शंकराचार्यांप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजहि स्फुरणात जडपणा, विनाशीपणा इत्यादि कांहीहि, मूळ स्वरूपात बदल मानित नाहीत हे स्पष्ट आहे. ही ज्ञानदृष्टी किंवा यथार्थदृष्टी ज्यांना नाही त्यांना भ्रमाने विपरीत भासते. तो त्यांचा भास भ्रमरूप म्हणजे नसतांना तसे भासते असेच कोणालाहि म्हणावे लागेल व शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज दोघेहि तसेच म्हणतात. परमेश्वराची उन्मेष-निमेषरूप स्वभावलीला त्रिपाद- महानारायणोपनिषदांत स्वीकारली आहे. ती काही महेश्वरानंदाचीच नाही.

भाष्यकाराते वाट पुसत

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या ज्ञानेश्वरीत भाष्यकाराते वाट पुसत ज्ञानेश्वरी लिहिली आहे असे स्वतःच म्हटले असल्यामुळे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा कोणताहि सिद्धांत शंकराचार्याच्या सिद्धांताहून स्वतंत्र नाही हे उघड आहे. पण श्रीज्ञानेदेवोपासकांना हे मान्य नाही. ते म्हणतात श्रीज्ञानेश्वरानी भाष्यकारा वाट पुसत ज्ञानेश्वरी लिहिली असेल पण भाष्यकाराच्या पाऊलावर पाऊल ठेवूनच त्यानी आपल्या अद्वैताची मांडणी केली नाही असे दिसते. पण हे विधान किती निर्मूल आहे हे आम्ही दाखविलेच आहे व महार्थमंजरीकाराच्या ग्रंथाची छाया ज्ञानेश्वरीवर मुळीच पडली नसून शांकर तत्त्वज्ञानाचीच संपूर्ण छाया पडलेली आहे हे निराग्रही वाचकांस दिसून येते. ब्रह्मस्थिती, जगत् व वस्तुत्व आणि त्यांचा संबंध हेच मुख्य सिद्धांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी महार्थमंजरीकाराचे जर स्वीकारले असतील तर त्यांनी भाष्यकाराला वाट पुसण्याचे कारण कोठे उरते हे समजत नाही. मग श्रीज्ञानेश्वर महाराजानी भाष्यकारांचा केलेला उल्लेख निरर्थक ठरतो. ज्ञानेश्वरीतील पद अन् पद सार्थक आहे असा काही साहित्यिक दावा करितात पण आमचे श्रीज्ञानदेवोपासक ज्ञानेश्वरीतील एक सबंध ओवीच निरर्थक ठरवू पाहतात हे आश्चर्य आहे.

श्रीज्ञानेश्वरांचे स्वातंत्र्य

कोणत्याहि ग्रंथकर्त्याचे ग्रंथ करण्यात काही स्वातंत्र्य असतेच यात शंका नाही. एकाच सिद्धांताचे मंडन करणारे दोन ग्रंथकार आपल्या ग्रंथातून सिद्धांताचा भेद प्रतिपादू शकत नाहीत. त्यात भेद किंवा प्रत्येकाचे स्वातंत्र्य जर कोणते राहील तर ते एवढेच की तो सिद्धांत मांडताना करावा लागणारा युक्तिवाद, द्यावे लागणारे समर्पक दृष्टांत, सिद्धांत समजावून देण्याची शैली व ग्रंथातील साहित्य संपत्ति याच्या योगाने ग्रंथाची जितकी सजावट करता येईल तितकी करावयाची. केव्हा केव्हा एका ग्रंथकाराने जो विषय संक्षिप्त किंवा ओझरता मांडला तोच विषय दुसरा ग्रंथकार विस्ताराने मांडतो. कोठे असेहि दिसेल की एकाने श्लोकाचा शब्दशः अर्थ दिला तर दुसऱ्यानी त्यातील भावार्थ सांगितला. पण मुख्य सिद्धांत मात्र दोघांचाहि एकच राहील. शंकराचार्याच्या व श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ग्रंथांचा विचार केल्यास दोघांचेही सिद्धांत एकच आहेत असेच दिसून येते हे आम्ही वर दाखविलेच आहे.

स्वतंत्र अर्थ

श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात गीता अ. ८ मधील अध्यात्म शब्दाचा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी महार्थमंजरीकार महेश्वरानंद यांच्या मताप्रमाणे केला आहे. खरोखर पाहता श्रीज्ञानदेवोपासकांनी ओढाताण करून त्या शब्दांचा अर्थ महार्थमंजरीकारानुसार श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केला आहे असे दखविण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओव्या पहा -

मग म्हणितले सर्वेश्वरे । जे आकारे इये खोकरे ।
कोदंले असत न खिरे । कवणे काळी ॥ (८-१५)

या आकाररूपी सच्छिद्र खोक्यांत जे भरून असून केव्हाहि त्यातून गळून पडत नाही हे अक्षर ब्रह्म होय. आणि -

आकाराचेनि झालेपणे । जन्मधर्माते नेणे ।
आकारलोपी निमणे । नाही काही ॥

आकाराचे उत्पत्तिबरोबर जे उत्पन्न होत नाही आणि आकार नाहीसा झाला तर जे केव्हाहि नाहीसे होत नाही.

ऐसिया आपलिया सहजस्थिति । ज्या ब्रह्माची नित्यता असती ।
तया नांव सुभद्रापति । अध्यात्म गा ॥

अशी ब्रह्माची स्वाभाविक नित्यता ज्याच्या ठिकाणी स्वाभाविक आहे त्याला अध्यात्म म्हणतात. यात सर्व नामरूपात व्यापून असणारे अविनाशी परब्रह्मच उत्पन्न होणाऱ्या व नाश पावणाऱ्या आकारात (म्हणजे शरीरात) कधीहि उत्पन्न होत नाही किंवा नाश पावत नाही व आपल्या स्वाभाविक अविनाश भावाला धरून राहते त्याला अध्यात्म म्हणतात. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वरील ओव्यांचा सरळ अर्थ आम्ही दिला आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी सर्व उत्पन्न होणाऱ्या व नाश पावणाऱ्या सृष्टीमध्ये अविनाशी असणाऱ्या वस्तूला ब्रह्म व प्रत्येक देहाच्या उत्पत्ति नाशाबरोबर उत्पन्न किंवा नाश पावणारे ब्रह्म तेच अध्यात्म असा सरळ अर्थ केला आहे व शंकराचार्यानीहि,

तस्यैव परस्य ब्रह्मणः प्रतिदेहं प्रत्यगात्मभावः स्वभावः ।
स्वभावोऽध्यात्ममुच्यते ॥

प्रत्येक देहात अविनाशी परब्रह्माचा जो अविनाशी भाव आहे त्याला अध्यात्म म्हणतात असेच म्हटले आहे. श्रीशंकराचार्याच्या ग्रंथातून प्रत्यगात्म शब्द प्रत्येक देहात असणाऱ्या शुद्ध ब्रह्मभावाला लावण्यांत आला आहे. एकच ब्रह्म अधिभूत, अधिदैव, अध्यात्म, अधियज्ञ झाले आहे असे सांगून श्रीज्ञानेश्वरमहाराज एकाच वस्तूत असा निरनिराळा प्रकार कशाने झाला याचे कारण सांगतात -

आता अधिभूत म्हणिजे । तेहि सांगो संक्षेपे ।
तरी होय आणि हारपे । अभ्र जैसे ॥ (८-३०)
तैसे असते पण आहाच । नाही होईजे साच ।
जया रूपाने आणिति पांचपांच । मिळोनिया ॥३१॥
भूताते अधिकरूनि असे । आणि भूतसंयोगे तरी दिसे ।
वियोग वेळे भ्रंशे । नामरूपादिक ॥

ब्रह्म अविनाशी असतांना ज्या भूताचे अस्तित्व लटिके आहे, नाहीपणा हीच त्यांची खरी वस्तुस्थिति आणि अभ्राप्रमाणे उत्पन्न होणे व नाश पावणे हाच ज्यांचा स्वभाव, त्या भूतांना धरून राहते म्हणजे आपण त्या भूताच्या जड उत्पत्ति नाश या धर्मानी युक्त झालेले दिसते त्या ब्रह्माला अधिभूत म्हणतात. वस्तुतः ब्रह्मच असतांना म्हणजे प्रकृतीच्या पलीकडे असतांना प्रकृतीत सांपडून -

जेणे प्रकृतीचे भोगिजे । उपार्जिले ॥

प्रकृतीचे कर्तृत्वभोक्तादि धर्म आपल्यावर ओढवून घेतो त्या ब्रह्मालाच अधिदेव म्हणतात. याप्रमाणे एकच ब्रह्म निरनिराळ्या उपाधीचा संबंध घेऊन अधिभूतादि भेदाने भासते असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रतिपादनाचा ओघ आहे हे ज्ञानेश्वरीतील या प्रकरणांतील ओव्या वाचून पाहणाऱ्याला समजण्याजोगे आहे. अध्यात्म हाहि उपाधीनेच झालेला परब्रह्माचा प्रकार आहे हे ओघानेच सिद्ध होते. उपाधीचा संबंध मानला नाही तर ते अक्षर ब्रह्मच असल्यामुळे अक्षर ब्रह्माच्या निर्देशाहून त्याचा निराळा निर्देश करण्याची आवश्यकता नाही. अक्षर ब्रह्माचा स्पष्टार्थ करतांना –

आकाराचेनि जालेपणे । जन्मधर्माते नेणे ।
आकारलोपि निमणे । नाही काही ॥

असा उल्लेख आला आहे. तेव्हा दोघांच्या उपाधिसंबंधाचा भिन्नपणा दाखवावयाचा असल्यास सर्व आकारात भरलेले व नाश पावणारे असे अ-क्षर ब्रह्मसंज्ञा व उत्पन्न होणाऱ्या नाश पावणाऱ्या प्रत्येक देहातील अविनाशी अक्षर ब्रह्मास अध्यात्मसंज्ञा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी दिली आहे असे उघड दिसते.

वरील सरळ अर्थ सोडून देऊन श्रीज्ञानदेवोपासक श्रीज्ञानेश्वर महाराजांचे पाऊल महेश्वरानंदाच्या पावलावर आहे हे दाखविण्याकरिता कशी मल्लिनाथी करतात पहा. श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात- निराकार निर्विकार परमात्मा आकारास येऊन तो पुनः लोप पावतो व अशी क्रिया प्रकट रूपाने नित्य असणे हीच त्याची नित्यता, सहज स्थिति, किंवा स्वभाव होय. परमेश्वराचा अक्षरत्व जसाएक भाव तसा क्षरत्व, ''अधिभूतत्व नामरूपे ।'' जगपण हाही एक भावच आहे आणि दोन्ही भाव मीच आहे - येर आधिदैवाधिभूत । तेहि मीचि किर समस्त ॥

यावर श्रीज्ञानदेवोपासकांना आम्ही असे विचारतो की तरंग पाणीच आहे असे ओळखणाऱ्या पुरुषाला पाणी तरंगरूपात आल्यावर पाणी केव्हां लोपले असते? लोपले असते तर तरंग पाणीच आहे हे तो कशाच्या भरांवशावर म्हणतो? आपण असे म्हणाल की ब्रह्म लोपले जात नाही पण त्याचा अक्षर भाव लोपून तेथे क्षर भाव उत्पन्न होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज -

आकाराचेनि झालेपणे । जन्मधर्माते नेणे ।
आकरलोपी निमणे । नाही काही ॥

या ओवीत उत्पत्ति, लोप हे धर्म ब्रह्माचे ठिकाणी नाहीत, नामरूपाचे ठिकाणी भासतात असे स्पष्ट मराठी भाषेत म्हणत आहे. ओव्यांचा विकृत अर्थ करून श्रीज्ञानदेवोपासक महेश्वरानंदाचे सिद्धांत श्रीज्ञानेश्वर महाराजांवर बळेच लादण्याचा प्रयत्न करीत आहेत. पुनः श्रीज्ञानेश्वर महाराज -

तैसे अधिभूतादि आघवे । हे अविद्येचेनि पालवे । झांकले असे ॥

स्पष्ट म्हणतात व श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात, ब्रह्म स्वाभाविकच लोपते. याची संगति कशी लावावयाची हे तेच जाणोत.

हे उपजे आणि नाशे । ते मायावशे दिसे ।
येऱ्हवी तत्वता वस्तु जे असे । ते अविनाशीचि ॥

याहि ओवीत नित्यक व अनित्यक किंवा अक्षरत्व व क्षरत्व हे ब्रह्माचे स्वभावधर्म आहेत असे श्रीज्ञानेश्वर मानीत नाहीत. उलट ते उत्पत्तीनाश हे मायेने भासतात. वस्तु जी आहे ती अविनाशी आहे असे श्रीज्ञानेश्वर म्हणतात.

तैसे विचारिता निरसले । ते प्रपंच सहजे सांडवले ।
मग तत्वता तत्व उरले । ज्ञानियासी ।

विचारापुढे ज्याचे अस्तित्व टिकत नाही असा प्रपंच सहजच टाकला जातो. मग अशा ज्ञान्याला एक ब्रह्मच शिल्लक राहते.

म्हणोनि अनित्याच्या ठायी । तया आस्तिक्यबुद्धि नाही ।

ज्ञानी पुरुष अनित्यता खरी समजत नाहीत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे या संबंधीचे सर्व विचार आम्ही वर दिलेच आहेत.

श्रीज्ञानदेवोपासकांच्या म्हणण्याप्रमाणे परब्रह्माचे अक्षरत्व व क्षरत्व असे दोन स्वभावधर्म मानल्यास ते परस्पर विरुद्ध म्हणजे जेव्हा अक्षरत्व असते तेव्हा क्षरत्व मुळीच नसते व जेव्हा क्षरत्व असते तेव्हा अक्षरत्वधर्म पूर्ण नाहीसा होतो? असे मानावयाचे किंवा ते परस्पर अविरोधी आहेत म्हणजे क्षरत्व असते तेव्हाहि अक्षरत्व धर्म असतो व अक्षरत्वधर्म असतो तेव्हाही क्षरत्वधर्म असतो असे मानायचे? हा येथे भ्रम उत्पन्न होतो.

पहिल्यापक्षी परब्रह्माचे एक नक्की लक्षण सिद्ध होत नाही आणि नित्य वस्तु अनित्य व अनित्य वस्तु नित्य होते असे मनातच धरता येत नाही. दुसऱ्यापक्षी नित्य व अनित्य या दोन धर्माचा अविरोध साधावयाचा तर त्यापैकी एक खरा व खोटा मानल्याखेरीज अविरोध साधणे शक्य नाही. शेवटी परब्रह्माची अविनाश स्थितिच नित्य मानणे बुद्धिला भाग पडते.

देखे सारासार विचारिता । भ्रांतीते पाही असारता ।
तरी सार ते स्वभावता । नित्य जाणे ॥२.१३३॥

खरी वस्तु नित्य असते ती होय आणि असत् टाकाऊ वस्तु जी वस्तु अनित्य असते तिला म्हणतात. भ्रांतिच अनित्य असते. परब्रह्म कधी नामरूप दशेत देखील क्षर भावाला प्राप्त होत नाही असेच श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

अर्जुना हा नित्य । अचल हा शाश्वत ।
सर्वत्र सदोदित । परिपूर्ण हा ॥

अर्जुना, परब्रह्म नित्य आहे. (उत्पत्तिरहित) अचल म्हणजे कधी न बदलणारे. त्याचे सच्चिदानंद धर्म सदा तसेच राहतात. शाश्वत म्हणजे नाशरहित आहे. सदा सर्वत्र आहे म्हणजे केव्हाहि त्याचा संकोच विकास होत नाही व कोणत्याहि दशेत पूर्णच राहते म्हणजे त्याचे ठिकाणी अपूर्णता कधीहि येत नाही.

हा गुणत्रयरहित । अनादि अविकृत ।

त्रिगुणाहून निराळा, अनादि व परिणामरहित म्हणजे त्याच्या वस्तुरूपतेत किंवा धर्मात केव्हाच बदल होत नाही. याप्रमाणे परब्रह्माचे लक्षण सांगून श्रीज्ञानेश्वरमहाराज- अथवा ऐसा नेणसी । हे ज्ञान तुला नसल्यामुळे तूं जर आत्म्याच्या ठिकाणी नाश म्हणजे क्षरत्व मानीत असलास तर -

जे आदि स्थितिवंत । निरंतर असे नित्य ।
जैसा प्रवाह अनुस्यूत । गंगाजळाचा ॥२.१५३॥

ज्याला यथार्थ ज्ञान नाही, त्याला- 'अज्ञानाने मानलेले उत्पत्तिनाश प्रवाहरूपाने नित्य आहेत असे जाणून शोक सोड' - अर्थात् ज्ञान होईपर्यंत दृश्य प्रपंचाचा उत्पत्तिनाश प्रवाह नित्य आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज मानतात. श्रीशंकराचार्य देखील ज्ञान होईपर्यंत प्रपंचाचे प्रवाहनित्यत्व मानतात. पण हे प्रवाहनित्यत्व, श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात त्याप्रमाणे परब्रह्माचा स्वभाव आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणत नसून ज्यांना यथार्थ ज्ञान नाही त्या अज्ञान्याच्या दृष्टीने आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

तैसी अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टी कल्पिते ।
हे देहचि होते जाते । जाणति पुढे ॥

अखंड अशा आत्मसत्तेवर अज्ञान्याच्या अज्ञानदृष्टीने मानलेले देह उत्पन्न होतात व नाहीसे होतात, हे ज्ञानी जाणतात.

चैतन्य चढे ना वोहटे । चेष्टवी ना चेष्टे ।
ऐसी आत्मज्ञाने चोखटे । जाणती जे ॥

स्वतः ज्ञानी आपल्या दृष्टीने - चैतन्यांत ऱ्हास वृद्धि काहीहि होत नाही, ते कोणाला व्यापार करावयाला लावत नाही किंवा स्वतः करीत नाही - असे जाणतात.

अगा काढूनी भ्रांतीचे डांग । उभवी सृष्टीचे आंग ।
हे असो बहु जग । जया नाम ॥

भ्रांतिरूपी अरण्यातील लाकडे गोळा करून, ज्याला जग म्हणतात त्या सृष्टीचे अंग उभे केले आहे.

जो अपुलेनि विसरे । सर्व भूतत्वे अनुकरे ।
तो आत्मा बोलिजे । क्षरपुरुष नामे ॥१५.४६५॥

आत्मस्वरूपाला विसरलेला जीव आपणच सर्व सृष्टिस्वरूप होतो व त्यामुळे भूतांचे अनित्यत्व तो आपल्यावर ओढून घेतो. ब्रह्म सृष्टिस्वरूप ज्या प्रक्रियेने होते त्या प्रक्रियेने नुसत्या ब्रह्माचाच समावेश श्रीज्ञानेश्वर महाराज करीत नाहीत. आत्मविस्मृति म्हणजे अविद्या किंवा माया हे कारण मानतात. ब्रह्माचा क्षर हा स्वभाव नसून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात-

आणि क्षरपणाचा नाथिला । आळ यया ऐसोनि आला ।
जे उपाधिची आतला । म्हणोनिया ॥

उपाधीच्या आत सापडल्यामुळे क्षरत्व हा नसताच त्याच्यावर खोटा आरोप आला आहे.

नामरूपसंबंध । जातिक्रियाभेद ।
हा आकारासीच प्रवाद । वस्तुसी नाही ॥

असे म्हणून नामरूपाहून ब्रह्मवस्तु निराळी आहे असे श्रीज्ञानेश्वर महाराज

सांगतात. तेव्हा ब्रह्म नामरूप दशेत क्षर होते असे त्यांचे मत नाही.

अक्षर ब्रह्म परम ॥

याचा अर्थ शंकराचार्यानी परमात्मा असा केला आहे. 'श्रीज्ञानेश्वरमहाराज हा अर्थ स्वीकारीत नाहीत' इ. आपलेच सर्व विचार श्रीज्ञानदेवोपासक श्रीज्ञानेश्वरमहाराजांवर लादत आहेत. शांकरवेदान्तात परब्रह्म प्रकृतीच्या पलीकडे मानले आहे व ते अकर्तृ अभोक्तृ आहे. कर्तृत्व भोक्तृत्व हे धर्म प्रकृतीचे आहेत असे मानले हे खरे; पण श्रीज्ञानेश्वरमहाराजहि तसेच मानतात. श्रीज्ञादेवोपासकाच्या म्हणण्याप्रमाणे मानीत नाहीत हेहि तितकेच निश्चित आहे. अक्षर ब्रह्म म्हणजे निरुपाधिक ब्रह्म व तेच गीतेच्या १५ व्या अध्यायात उत्तम पुरुष म्हणून सांगितले आहे. त्या अक्षर ब्रह्माला,

जे परमात्मा इती । बोलिजे नामी ॥१५.५३६॥

परमात्मा नांव आहे असे श्रीज्ञानेश्वर महाराजहि म्हणतात.

म्हणोनि पुरुष क्षराक्षर । दोन्ही देखोनि अवर ।
याते म्हणती पर । आत्मरूप ।

अक्षर ब्रह्माला परमात्मा असे येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीहि संबोधिले आहे. शंकराचार्यांनीहि तसाच उल्लेख केला आहे. ज्ञानदेवोपासक व त्यांचे आाधारभूत महार्थमंजरीकार यांनी परब्रह्माचे ठिकाणी कर्तृत्व मानले आहे; पण श्रीज्ञानेश्वरमहाराजहि परब्रह्माचे ठिकाणी कर्तृत्व मानतात हे त्यांचे विधान अत्यंत चूक व डोळ्यात धूळ फेकणारे आहे,

हे म्हणोनि तिन्ही या जाणा । कार्य कर्तृत्व कारणा ।
प्रकृति मूळ हे राणा । सिद्धांचा म्हणे ॥

या ओवीवरून स्पष्ट आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज कर्तृत्व हा धर्म ब्रह्माचा मानीत नाहीत. तो धर्म प्रकृतीचा मानतात. या विषयी ज्ञानेश्वरीत अनेक ओव्या आहेत व वर आम्ही तसे दाखविले आहे. **अधियज्ञ** या शब्दाचा आचार्यांनी जसा सगुणपर अर्थ केला आहे तसाच श्रीज्ञानेश्वरमहाराजानीही तो अधियज्ञ, **'एथ गा मी पंडुकुमरा'** मीच सगुण स्वरूप धारण करणारा अधियज्ञ असे आपल्या सगुण स्वरूपाला उद्देशून म्हटले आहे. शंकराचार्याचा विष्णु शब्द न वापरता अधियज्ञाला परमात्मा शब्द श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वापरला असे श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात पण आम्हाला तसे कोठे दिसून येत नाही. अधिदैवत म्हणजे जीव या विषयी मीच, **जो परमात्माचि परी दुसरा ।** परमात्मा शब्द वापरला आहे, अधियज्ञा विषयी नाही.

पुनः नामरूपात्मक सृष्टी हा ब्रह्माचा स्वभाव मानला तर स्वभाव उत्पन्न होणारा नसतो. तो वस्तूचे ठिकाणी नित्य असतो. म्हणून तो प्रगट करावा लागत नाही व जेथे उत्पत्तीचा प्रश्न असेल तेथे कर्तृत्व मानावे लागते. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

कीळेचे पांघरूण । आपजवी रत्ना कोण ।
की सोनेले सोनेपण । जोड जोडू ॥

रत्नाचे ठिकाणी तेज कोणी उत्पन्न करतो किंवा सोन्याचे ठिकाणी सोनेपणा कोणी जोडून देतो का? ज्ञानदृष्टीने जगत् ब्रह्मस्वभाव असल्यामुळे जगताची उत्पत्ति व त्याचा कर्ता श्रीज्ञानेश्वरमहाराजांना मान्य नाही. स्वतः श्रीज्ञानदेवोपासक बळेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांना त्यांचे व आचार्यांचे सिद्धांत जुळते असताना, महार्थमंजरीकाराचे अनुयायी बनविण्याची लटपट करीत असतांना त्यांनीच उलट ज्ञानेश्वरमहाराजांची मते व आचार्याची मते बरोबर जुळतात असे दाखविणाऱ्यांना लटपटी ठरवावे हे कमालीचे धाष्ट्र्य आहे.

शून्य शब्दार्थ

शून्य हा शब्द ज्ञानेश्वरीत पुष्कळ ठिकाणी आला आहे. श्रीज्ञानदेवोपासक त्याचे अर्थाविषयी वाद करितात. श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात, 'ज्ञानेश्वरीतील शून्य शब्दाचा अर्थ निश्चय करण्याकरिता एवढे पांडित्य व द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या लिहिण्यातून त्यांनी कोणत्या अर्थाने तो शब्द वापरला आहे हे जर कळूं शकले तर त्याचा अर्थ अधिक निश्चित होईल.

सर्व शून्याचा साहे । निष्कर्ष जो ॥ (अ. १३-८८५)

निष्कर्ष म्हणजे सार. श्रीज्ञानदेवोपासकांच्या म्हणण्याप्रमाणे 'शून्याचा अर्थ कर्तृत्व' असा करून कर्तृत्वाचे सार म्हणजे काय म्हणावयाचे? त्यांनी गीतेच्या ८ व्या

अध्यायातील घेतलेली,

येन्हवी सपुरण तयाचे पहावे । तरी शून्यचि नोहे स्वभावे ॥

ही ओवी लक्षात आणून 'सर्व भाव पदार्थाचा जो अभाव त्याचाहि भावरूप सार म्हणजे निर्विशेष भावरूप ब्रह्म आहे.' असा सपुरण शब्दाचा त्यांनी अर्थ केला तो आम्हाला मान्य आहे.

'शून्यचि नोहे स्वभावे' या चरणात स्वभावामुळे 'शून्य नोहे' म्हणजे ब्रह्मवस्तु घनदाट भरलेली व आकाशाहून सूक्ष्म आहे ती शून्य म्हणजे नाही असे नाही. येथे ब्रह्माच्या अस्तित्वाने त्याच्या विरोधी शून्यतेचा निषेध केला तेव्हा अस्तित्वाच्या विरोधी असणाऱ्या शून्याचा अर्थ अभावरूप झाला नाही काय? स्वतः श्रीज्ञानदेवोपासकांनी आपल्या लेखांत फुटक्या भांड्यातून किंवा विरळ वस्त्रातून एखादा पदार्थ गळत नसेल तर तो नसलाच पाहिजे असे कोणास वाटले तर तसे मात्र नाही. ते नाहीपणाने शून्य नाही. या वाक्याने शून्याचा लौकिक अर्थच घेतला आहे हे विचारवंताना स्पष्ट दिसते. नाहीपणाने शून्य व सपुरपणाने शून्य असे क्लिष्ट व दुष्ट व्याख्यान करण्यापेक्षा सर्वाचा अभाव झाला तरी ज्याचा अभाव होत नाही असा सरळ अर्थ करण्यास काय हरकत? पण आमच्या श्रीज्ञानदेवोपासकाना ज्ञानेश्वरमहाराजाचे ब्रह्म सकर्तृक ठरवावयाचे आहे ना? ते अशा खटपटी शिवाय कसे साधणार? गीतेच्या १३ व्या अध्यायात पुनः शून्य शब्द आला आहे.

तेहि गुणत्रय जेव्हा लोपे । ते जे शून्य ॥ (अ. १३-१२५)

गुणांचा नाश झाल्यावर जे शून्य स्वरूप असते तेथे गुणांच्या अभावाला शून्य म्हटले आहे. एवढे म्हटल्याने श्रीज्ञानेश्वरमहाराज ब्रह्महि शून्य समजतात असे आम्ही समजतो असे कोणी अनुमान करू नये. ब्रह्म असे भावरूप आहे की त्याच्या ठिकाणी इतर पदार्थांचा भावांचा व अभावांचा शून्य म्हणजे अभाव आहे. म्हणजे सर्व शून्याला ब्रह्म आधार आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे आहे. गीतेच्या ८ व्या अध्यायात श्रीज्ञानदेवोपासकांनी घेतलेल्या ओव्यांच्या पलीकडे काही ओव्या आहेत त्या पाहिल्या असता असे दिसते की शून्य शब्दाने श्रीज्ञानेश्वर महाराजांना आम्ही आताच म्हटल्या प्रमाणे, ब्रह्माचे ठिकाणी कर्तृत्व, क्रिया व सृष्टि या सर्वांचाच अभाव आहे हे सांगावयाचे आहे.

पै निर्विकल्पाचिये बरडी । फुटे आदिसंकल्पाची विरूढी ॥
पाहिजे कवण हे आघवे विये । तव मूळ ते शून्य ॥
म्हणूनि कर्ता मुद्दल नसे । सेखी कारणहि कांही नसे ।
माजी सर्वचि आपैसे । वाढोचि लागे ॥
ऐसा कर्तेनिविण गोचर । अव्यक्ति हा आकार ॥

या ओव्यावरून परब्रह्माचे ठिकाणी जगत्कर्तृत्व आहे असे जर श्रीज्ञानेश्वर महाराजांना म्हणावयाचे असते तर हा जगदाकार कर्त्यावाचूनच वाढू लागतो असे त्यांनी म्हटले नसते. परब्रह्माने जगत् उत्पन्न केले असे स्पष्टच म्हटले असते. उलट ब्रह्मरूपी निर्विकल्प बरड्या जमिनीत आदि संकल्पाचा अंकुर उत्पन्न होतो.

परी दुजेनविण एकला । परब्रह्मचि संचला ।
अनेकत्वाचा आला । पूर जैसा ॥

असे सृष्टीच्या उत्पत्तीचे वर्णन करून सृष्टी सर्व खोटी असून अशा खोट्या सृष्टीचे उत्पत्तीस कर्ता लागत नाही व ब्रह्म कोणत्याहि रीतिने कर्तृ झाले नाही असेच श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणत आहेत. ब्रह्माला निर्विकल्प बरड्या जमिनीची श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जी उपमा दिली त्यांतील निर्विकल्प बरड इत्यादि विशेषणावरून काय अर्थ घ्यावा याचा शून्याचा लौकिक अर्थ सोडून यौगिक अर्थ घेतला पाहिजे असे प्रतिपादणाऱ्या विद्वान ज्ञानदेवोपासकांना विचार येऊ नये हे आश्चर्य आहे निर्विकल्प म्हटल्याने सृष्टिसंकल्प उठणे शक्य नाही असे सूचित होते. बरड म्हटल्याने अंकुर फुटणे शक्य नाही हे सूचित होते. वंध्येला पुत्र झाला म्हटले म्हणून श्रीज्ञानदेवोपासक शब्दावरून वंध्येला खरच मुलगा झाला असा अर्थ घेतील असे वाटते. श्रीज्ञानदेवोपासकानी केलेला अर्थ घेतल्यास –

ऐसा कर्तेनिविण गोचर । अव्यक्ति हा आकार ॥

इत्यादि पुढील ओव्या सुसंगत होत नाहीत. पुढे त्याच १३ व्या अध्यायात –

अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा । जया नाम म्हणती ब्रह्मा ।
स्थिति जे विष्णुनामा । पात्र जाहले ॥ (१३-९२४)
मग आकार हा हारपे । तेव्हा रुद्र जे म्हणिपे ।
तेहि गुणत्रय जेव्हा लोपे । तै जे शून्य ॥ (१३-९२५)
नभाचे शून्यत्व गिळून । गुणत्रयाते नुरवून ।

जे शून्य ते महाशून्य । श्रुतिवचन संमत ॥ (१३-९२६)

इत्यादी ओव्या आल्या आहेत. यात नामरूपाचा किंवा व्यक्तत्वाचा अभाव हा शून्याचा अर्थ करून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, आकाशाचा नाहीपणा गिळून गुणत्रयाचा अभाव करून व्यक्ताव्यक्तभावरहित असे ब्रह्म निर्विशेष आहे. यावरून ब्रह्माची शून्यता म्हणजे निर्विशेषता किंवा कर्तृत्वादिसर्वधर्मरहितता असा अर्थ श्रीज्ञानेश्वर महाराजांना अभिप्रेत दिसतो.

सर्व शून्याचा निष्कर्षु । जेणे बाईला केला पुरुषु ।

ही अमृतानुभवातील ओवी आणि

अर्जुना कांहीच जेथ नाही । तो प्रकृतीचा भर्तार पाही ॥१३-९८४))

ही ज्ञानेश्वरीतील ओवीं, या दोन ओवीचा अर्थ केल्यास असे स्पष्ट दिसते की सर्व शून्याचा निष्कर्ष म्हणजे, 'काहीच जेथ नाही' हाच शून्य शब्दाचा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराज करीत आहेत.

तयाच्या तंव ठायी । निपटुनि कांहीच नाही ॥१३-९९९॥

याही ओवीत शून्यार्थाचे स्पष्टीकरण आहे. अमृतानुभव अध्याय ४ मध्ये -

तैसे असणे आणि नसणे । हे नाही जया होणे ।
आता मिथ्या ऐसे येणे । बोले गमे ॥४-२५॥
तरी कांही नाही सर्वथा । ऐसी जरी व्यवस्था ।
तरी नाही हे प्रथा । कवणासी पां ॥२६॥
शून्यसिद्धांतबोधू । कोणे सत्ता होय सिद्धू ।
नसता हा अपवादू । वस्तूसी जरी ॥२७॥

'आहे-नाही' ही भाषा जेथे लागू पडत नाही. आहे व नाही असे ज्या वस्तूविषयी म्हणता येत नाही ती वस्तु खोटी नाहीच म्हणावयाची, अशी शंका घेणाऱ्याला श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, अशी वस्तु नाहीच म्हणावयाची किंवा शून्य म्हणावयाची तर त्या वस्तूचे शून्यत्व तरी कोण जाणतो. शून्य म्हणणारा काही शून्य नव्हे - म्हणजे तो नाही असे म्हणता यावयाचे नाही. या ओव्यातही शून्याचा अर्थ नाहीपणा असाच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्वीकारला आहे. निर्विशेष किंवा निर्विकल्प अशा ब्रह्मवस्तूचे ठिकाणी ज्या एखाद्या विशेषणामुळे तिचा निर्देश करता येईल असा विशेष कोणताच नाही, असे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे म्हणणे आहे. गीता अ.१८ मध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

कां धाडलिया एकाएक । वाढे तो शून्य विशेख ॥

एकातून एक काढला असता जे राहते त्याला शून्य म्हणतात. या सर्व वचनावरून श्रीज्ञानोपासक शून्याचा यौगिक अर्थ घ्यावा असे म्हणतात. तसा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांना संमत आहे किंवा शून्य म्हणजे काही नाही या लौकिक अर्थाला धरूनच त्यांनी ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथांतून वापरला आहे हे वाचकांनीच ठरवावे. ''ब्रह्म शून्य आहे म्हणजे सर्व विशेषभावरहित केवल सत्तामात्र आहे'' असा अर्थ.

म्हणोनि केवळ जी सत्ता । तो पुरुष गा पंडुसुता ॥

या ओवीतील अर्थ दुसऱ्या रीतीने सांगावयाचा तो शून्य शब्दाने सांगितला आहे. या व्याख्येनुसार पाहता ब्रह्म केवळ निर्विशेष सत्तारूप असून तेथे कर्तृत्व, ज्ञातृत्व किंवा इच्छा ही काहीही नाहीत.

तेथ स्वभावे धनंजया । नाही कोणीच क्रिया ।
म्हणोनी प्रवाद तया । नैष्कर्म्य ऐसा ॥
अ. १८-९७८॥
झाला ज्ञातृज्ञेया विहीन । चिदाकार ॥
निष्क्रिय उरले । चिन्मात्रचि ॥

ते सर्वधर्म -

'प्रकृती ते समस्ता । क्रिया नाम ॥'

प्रकृतीचे आहेत असे शंकराचार्याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजही मानतात.

गणेशाचे सहा हात

श्रीज्ञानेश्वरीतील प्रारंभीच्या ओव्यात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी षड्दर्शनांवर गणेशाच्या सहा हातांचे रूपक केले आहे. त्यात 'वेदान्तदर्शन व पूर्वमीमांसा दर्शन याचे कोणत्या हातावर रूपक न करता गणेशाच्या कानावर त्यांनी त्याचे रूपक केले' असे श्रीज्ञानोपासक म्हणतात. यावर तुम्ही नीट लक्ष देऊन वाचा एवढेच त्यांना आम्हाला मोठ्या खेदाने सुचवावे लागते.

वेदान्त तो महारसु । मोदक मिरवे ।

हा वेदान्त दर्शनाचा उल्लेख होय.

एके हाती दंत । जो स्वभावता खंडित ।
तो बौद्धमतसंकेत । वार्तिकांचा ॥

या ओवीत कर्मकांड किंवा पूर्वमीमांसा दर्शनाचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी उल्लेख केला आहे. कानाचे ठिकाणी पुनः त्याचे रूपक कां केले आहे, असे कोणी म्हणतील. याचे कारण असे आहे की, न्याय, वैशेषिक, सांख्य व योग या चार दर्शनांचे सिद्धांत गोवलेला मूळ ग्रंथ निराळा व पूर्वपक्षखंडनपूर्वक व त्या सिद्धांताचे मंडन करणारा म्हणजे मीमांसा करणारा मूळ ग्रंथ निराळा, असे विभाग नाहीत, त्यांचे सूत्रग्रंथ हेच दर्शनग्रंथ व मीमांसा ग्रंथही आहेत. पूर्वदर्शन (कर्मकांड) व उत्तरदर्शन (वेदान्त) यांचा प्रकार तसा नाही. वेद-ब्राह्मण यातून कर्मकांडसिद्धांत सांगितले असून पूर्वपक्ष खंडनपूर्वक त्या सिद्धांताचे मंडन करणारा किंवा मीमांसा करणारा ग्रंथ पूर्वमीमांसासूत्ररूपी ग्रंथ स्वतंत्र आहे. तसेच उत्तरदर्शनाचे सिद्धांत उपनिषदातून सांगितले असून त्याच्या सिद्धांताची मीमांसा करणारा ब्रह्मसूत्र हा स्वतंत्र ग्रंथ आहे. म्हणून उपनिषदातील वेदान्तावर हातातील मोदकाचे रूपक केले आणि वेदब्राह्मणातील कर्मसिद्धांतावर स्वभावतः तुटलेल्या दाताचे रूपक केले आहे. अर्थात् स्वतंत्र मीमांसा दृष्टीने दोन्ही दर्शनांची जी सूत्रे बाकी राहिली त्यावर कानाचे रूपक श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केले ते योग्यच आहे. श्रीज्ञानदेवोपासकांचे बाकीचे व्याख्यान निव्वळ अज्ञानमूलक व शेखीचे असल्यामुळे तुच्छ आहे.

सृष्टिभवन प्रक्रिया सांगताना महेश्वरानंदाची प्रक्रिया श्रीज्ञानेश्वर महाराजांना मान्य आहे असे बळेच दाखविण्याकरिता श्रीज्ञानदेवोपासकांनी कशी लटपट केली हे पाहण्याजोगे आहे. ज्ञाने. अ. ८ मध्ये -

पै निर्विकल्पाचिये बरडी । फुटे आदिसंकल्पाची विरूढी ।

ही ओवी आहे. ती घेऊन श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात, ''निर्विकल्प शून्यात' परब्रह्मात पहिल्याने संकल्प उठला व तो उठताक्षणीच ब्रह्मांडाचे घड त्यात प्रगट होऊ लागले. यात मायावादाला यत्किंचितही अवकाश आहे काय? शांकरभाष्यातून डोके वर उचलून भारतीय अद्वैततत्वज्ञानाच्या विशाल क्षेत्राकडे निराग्रह दृष्टिक्षेप करणाऱ्या वाचकास श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे निर्मल झरे सांपडणे कठिण नाही.'' या सद्गृहस्थाने वरील ओवीच्या पलीकडे ज्या ओव्या आल्या त्या वाचकासमोर मांडल्याच नाहीत हे वर आम्ही सांगितलेच आहे. पुनः ८ व्यात पूर्ण सृष्टीचा क्रम सांगण्याचा प्रसंग नाही. कर्माची व्याख्या करताना सृष्टिरूप कर्म सांगितले गेले. खरा सृष्टिक्रम ज्ञानेश्वरी अ. १५ मध्ये दिला असून तेथे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

येऱ्हवी मध्य ऊर्ध्व अध । हे नाही जेथ भेद ।
अद्वयासी एकवद । जयाठायी ॥

खाली वर मध्य हे भेद जेथे नाही तेथे अद्वैतच आहे, दुसरे काही म्हणता येत नाही. असे (सर्वांच्या पलीकडे म्हणून) ऊर्ध्वब्रह्म भववृक्षाच्या मुळांना आधार आहे. भववृक्षाची मुळे कशी येथे बरडावर लागली हे सांगताना–

बळिया बांधूनि आळे । मायायोगाचे ॥

ब्रह्माचे ठिकाणी मायेचे किंवा अज्ञानाचे आळे केले आणि ब्रह्माचे ठिकाणी मायेच्या योगाने आत्मविस्मृतीचा कंद बनला.

वस्तूसी आपुला जो अबोध । तो ऊर्ध्वी आटुळीजे कंद ॥

हा कंदच संसारवृक्षाचे बीज आहे.

वेदान्ती हाचि प्रसिद्ध । बीजभाव ॥

खडकावर शेती करावयाची असल्यास खडकावर बी पेरले जाणे शक्य नाही, म्हणून मातीचा खोल थर द्यावा लागतो. त्याप्रमाणे निर्विकल्प बरड अशा ब्रह्मभूमीवर संसार वृक्षाचे बीज लागणे शक्य नाही, म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी माया मातीचा प्रथम जाडा थर दिला हे स्पष्टपणे तेच सांगत आहेत. वेदान्ताची माया श्रीज्ञानेश्वरमहाराजांना मान्य नाही असे –

ऐसी इया वेदान्ती । निरूपण भाषा प्रतीति ।

या ओवीवरून श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात. याचे उत्तर मी वर दिलेच आहे. पुनः वेदान्त्याची माया जर महाराजांना मान्य नसती तर, ऐसी इया वेदान्ती । निरूपण भाषा प्रतीति । या ओवीनंतर लगेच श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

ते ऊर्ध्व आत्मा निर्मळे । अधोर्ध्व सूचिती मुळे ।
बळिया बांधोनी आळे । मायायोगाचे ॥

माया मान्य नसल्यास निरूपणात तिचा उल्लेख टाळावयाला पाहिजे. पण तसे न करतां अनेक ठिकाणी तिचा उल्लेख आला आहे. एवढेच नाही तर 'अविद्या' 'प्रकृती' यांचाही निरूपणात स्वीकार केला आहे.

मायायोगे जीव । दशे आले ॥
तेवि मायामय सरिता । न तरवे जीवा ॥
हा मायापूर कवणें । तरिजेल गा ॥
कां स्वप्नासी कारण निद्रा । तैसी प्रकृति हे नरेंद्रा ।
या अशेषाहि भूतसमुद्रा । गोसाविणी गा ॥
प्रकृति आंगा रिघे । सृष्टिपणाचिया ॥
चराचर आघवे । जिये प्रकृति आत सांठवे ॥
विश्वचि ऐसे म्हणिजे । तरी ते माया ॥

सारांश, जडविनाशी ब्रह्म होताना ब्रह्मच जडविनाशी झाले हे तत्त्वज्ञान श्रीज्ञानदेवोपासकाचे आहे, श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे नव्हे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी कर्मरूप सृष्टी व ब्रह्म यांच्यामध्ये मायेचे भ्रांतिपटल मानले आहे. ''शंकराचार्यांची माया सान्त सदसद्विलक्षण आहे. पण श्रीज्ञानेश्वर महाराजांची माया सान्त नाही, सत्य आहे,'' असेही एक विधान श्रीज्ञानदेवोपासकांनी आपल्या हातचे ठोकून दिले आहे.

तैसे मूळ बीज अविद्या खाय । ते ज्ञान जै उभे होये ।
तेचि यया अंत आहे । एरव्ही नाही ॥

जडविनाशी कारण जी अविद्या किंवा माया हिचा नाश करणारे ज्ञान जेव्हा प्राप्त होते तेव्हा सर्व संसारवृक्षाचा नाश होतो, एरवी नाही. ज्ञानाने अज्ञान नाहीसे होते हे ज्ञानेश्वरमहाराजांचे शंकराचार्यांच्या प्रमाणेच म्हणणे आहे. अशी एकच नाही, पुष्कळ ओव्या आहेत. त्याचप्रमाणे ''अमूर्त ब्रह्माचे मूर्त जडविनाशी जगद्रूप होणे व पुनः त्याचे अमूर्त ब्रह्मरूप होणे हा प्रवाह नित्य चाललेला आहे. यालाच शक्तिस्वभाव- माया म्हणतात,'' असे जे श्रीज्ञानदेवोपासकांचे म्हणणे तेहि श्रीज्ञानेश्वरमहाराजांना संमत आहे असे दिसत नाही.

मूळ अज्ञानचि लटके । मा तयाचे कार्य हे केतुके ।
म्हणोनि संसाररूप सत्यके । वावोचि गा ॥ १५-२२३
म्हणोनि पै धनंजया । आम्ही वानिले रूप ते माया ।
कासविचेनि तूपे राया । वोगरिले जैसे ॥
मृगजळीची गा तळी । तिये दिठी दुरूनी न्याहाळी ।
वाचुनि तेणे पाणिये साळी केळी । लाविसी काई ॥
संसार वृक्षाच्या ठायी । साचोकार तंव नाही ।
मा नाही तया आदि काई । कोण होईल ॥
जो साच जेथुनि उपजे । तयाते आदि हे साजे ।
आता नाहीचि तो म्हणिजे । कोठूनिया ॥
म्हणोनि जन्मे ना आहे । ऐसिया सांगो कवण माये ।
यालागी नाहीपणेचि होय । अनादि हा ॥
तरी प्रबोध जंव नोहे । तंव निद्रे काय अंत आहे ।
की रात्री सरे तंव पाहे । तया आरौते ॥

भावार्थ :- ज्या अज्ञानामुळे हा संसारवृक्ष भासतो ते अज्ञान जर खोटे (यालाच शांकरवेदान्तात मिथ्या, सदसद्विलक्षण, अनिर्वचनीय इत्यादी शब्दाने संबोधिले आहे व तोच अर्थ येथे सर्व निरूपणावरून श्रीज्ञानेश्वर महाराजांना अभिप्रेत आहे असे स्पष्ट दिसते) तर त्याचे कार्य संसार हा कसा खरा होईल? मग तुम्ही संसार वृक्षाचे वर्णन कसे केले या प्रश्नाला श्रीज्ञानेश्वरमहाराज उत्तर देतात की, भ्रांतीने त्याचे वर्णन केले आहे. जसे, एखाद्याने आज आम्ही कासवीच्या तुपाने मेजवानी केली असे म्हणावे, तसे आम्ही जे भ्रांतिजन्य अशा जगद्रूपी दृश्याचे वर्णन केले ते नुसते अर्थरहित शब्दमात्र आहे; यथार्थ नाही. मृगजळ नुसते पाहावे त्या पाण्याने बगीचा लावता येतो का? जगताचे ठिकाणी जर सत्यता नाही तर तशा मृगजळासारख्या भासमात्र वस्तूला उत्पत्ति कोठली आली? एखादा पदार्थ एखाद्या पदार्थापासून खराच उत्पन्न होत असेल तर उत्पत्ती किंवा आदि मानता येईल पण जो पदार्थ अस्तित्वातच नाही त्याला कोठून उत्पन्न झाला असे म्हणता येईल? म्हणून जी वस्तू मूळची सिद्ध नाही किंवा जी नाहीच म्हणून उत्पन्न झाली असे मानता येत नाही, त्या वस्तूला जन्म देणारी आई कोणती सांगता येईल? 'हे जगत् मूळचेच सिद्ध आहे म्हणून आम्ही त्याला अनादि म्हणतो, असे नसून ते मुळी नाहीच म्हणून अनादी म्हणतो.'' त्याचप्रमाणे या संसारवृक्षाचा अंत होत नाही हे जे म्हणणे आहे तेहि कोणत्या दृष्टीने आहे हे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. ज्याप्रमाणे झोप संपत नाही तोपर्यंत स्वप्नाचा अंत होत नाही, त्याप्रमाणे अज्ञानाचा नाश करणारे ज्ञान प्राप्त होत नाही तोपर्यंत जगत् अविनाशी आहे.

ते आत्मज्ञानाचे खांडे । अद्वैतप्रभेचेनि वाडे ।
नेदिल उरो कवणेकडे । भववृक्षासी ॥

ज्ञान झाल्यावर अविद्येसह जगत्कार्याचा नाश होतो. मग ते भासतच नाही.

अर्जुना ऐसेनि पाही । आद्यंत ययासी नाही ।
माजी स्थिति आभासे कांही । तरी टवाळ ते गा ॥

वर सांगितल्याप्रमाणे ज्या जगद्वस्तूला आदि-अंत नाही ती ज्ञान होईपर्यंत आहे असे जे वाटते तो खोटा आभास आहे. ती वस्तुस्थितीने अस्तित्वात नाही.

''आचार्यांच्या मायावादाचा तिळभरही स्वीकार न करता परमात्म्याच्या इच्छा- ज्ञान- क्रिया या तीन शक्तीतून जग प्रकट झाले आहे असे ज्ञानेश्वर म्हणतात.'' असे ज्ञानदेवोपासक ठासून सांगत आहेत. पण या विधानात सत्याचा अंश किती आहे हे आतापर्यंतच्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षात येईल. श्रीज्ञानेश्वरीच्या १५ व्या अध्यायात प्रकृति-पुरुषाचे विवेचन करताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

तो तरी अकर्ता । उदास अभोक्ता ।
परी इया पतिव्रता । भोगविजे ॥
तयाच्या तंव ठायी । निपटुनि कांहीच नाही ।
की तया आघवेही । आपणचि होय ॥

परमात्मा अकर्ता आहे, अभोक्ता आहे. प्रकृतिमुळे तो कर्ता व भोक्ता दिसतो. त्याचे ठिकाणी मुळीच कांही नाही. आणि जे कांही आहे असे वाटते ते सर्व प्रकृतीचे आहे.

किंबहुना सकळ । खेळ इयेचा ॥

सर्व पसारा प्रकृतीचा आहे. परमात्मा असा आहे की -

किंबहुना एक निश्चयो नाही ।

अमुक प्रकारचा आहे असा निश्चय देखील करता येत नाही असा निर्विशेष आहे. ही प्रकृति म्हणजे हे भ्रमाचे महाद्वीप, भ्रांतीचे बेट आहे. हे 'कामाची मांडवी" सर्व संकल्पाचा मंडप आहे. 'कला येथूनिया झालिया' कला हे देखील प्रकृतीचे कार्य आहे. 'तया अमनस्काचे मन' हीच मनरहित अशा परमात्म्याचे ठिकाणी मनपणाने स्फुरते,

तया अविकाराते विकृति । माजी कीजे ॥

हीच अविकारी परमात्म्याला विकारी झाल्यासारखे भासविते.

इये प्रसिद्धचि दैवी । माया हे नाम ।

हिलाच दैवीमाया म्हणतात -

इच्छा ज्ञान क्रिया । वियाली हे ॥

इच्छा, ज्ञान व क्रिया यांचा प्रकृतिपासूनच जन्म आहे. परमात्म्याचे ठिकाणी त्या मुळीच नाहीत.

प्रकृति येणे जिये । याचिया सत्ता जग विये ।

परमात्म्यामुळे प्रकृती जीवंत आहे व परमात्म्याच्या सत्तेचा आश्रय मिळाला की मी जगाला जन्म देतो.

स्फूर्ति म्हणजे काय ?

स्फूर्ति म्हणजे काय हे सांगण्याकरिता श्रीज्ञानदेवोपासकांनी जे व्याख्यान केले त्यात कांहीच हाशील नाही.

सकळ ना निष्कळ । अक्रिय ना क्रियाशील ।
कृश ना स्थूळ । निर्गुणपणे ॥१३-११०९॥
साभास ना निराभास । प्रकाश ना अप्रकाश ।
अल्प ना बहुवस । अरूपपणे ॥११०॥
रिता ना भरीत । रहित ना सहित ।
मूर्त ना अमूर्त । शून्यपणे ॥१११॥
आनंद ना निरानंद । एक ना विविध ।
मुक्त ना बद्ध । आत्मपणे ॥१११२॥
येतुला ना तेतुला । आयता ना रचिला ।
बोलता ना उगला । अलक्षपणे ॥१११३॥
सृष्टीचा होणा न रचे । सर्व संहारे न वेचे ।
आथी नाथी या दोहीचे । पंचत्व हा ॥१११४॥
मवे ना चर्चे । वाढे ना खाचे ।
विरे ना वेचे । अव्ययपणे ॥१११५॥
एकरूप पै आत्मा । देही जे म्हणती प्रियोत्तमा ।
ते मठाकार व्योमा । नाम जैसे ॥१११६॥

तैसे तयाचिये अनुस्यूति । होती जाती देहाकृति ।
तो घे ना सांडी सुमति । जैसा तैसा ॥१११७॥
म्हणोनि इये शरीरी । कांही करवी ना करी ।
आयताहि व्यापारी । सज्ञ न होय ॥

या सर्व ओव्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराज आत्म्याचे स्वरूप निर्विशेष आहे असे सांगत आहेत. येथे स्पंद, उद्यम, कला वगैरे प्रकार श्रीज्ञानेश्वर महाराज मानतात असे श्रीज्ञानदेवोपासकांचे म्हणणे. ही श्रीज्ञानेश्वर महाराजांची उपासना नसून उपहास आहे असे आम्हाला वाटते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे विधान कोठेही केले नाही. त्यांच्या मतात स्फूर्ति म्हणजे द्रष्टा-दृष्यभास एवढाच अर्थ आहे. यापलीकडे श्रीज्ञानदेवोपासकांनी जे अर्थ दिले आहेत ते त्यांच्या वाङ्मयात कोठेही आलेले नाहीत.

तिन्ही अवस्थांचेनि द्वारे । उपाधि उपहिताकारे ।
भावाभावरूप स्फुरे । दृश्य जे हे ॥

जागृतिआदि तीन अवस्थेत उपाधिरूपाने व उपाधीला आधार म्हणून जेवढे कळणारे दृश्य भावरूप व अभावरूप आहे तेच स्फुरत असते.

तैसे जे कांही आथी नाथी । तेथे होय ज्ञेय स्फूर्ति ॥

''जेवढे काही, आहे किंवा नाही, म्हणून संबोधिले जाते त्या ज्ञेयाला स्फूर्ति म्हणतात.'' पाण्यावर पाणी उठले की पाण्याचे ठिकाणी स्फूर्ति झाली. आपण त्याला तरंग म्हणतो. तरंग ही पाण्याची स्फूर्ति आहे. याचा अर्थ मूळ वस्तूचा, वस्तूचेच ठिकाणी भिन्न भास किंवा निराळेपणा याला स्फूर्ति म्हणतात. या स्फूर्तिलाच शांकर वेदान्तात, विवर्त ही संज्ञा दिली आहे.

अज्ञान्याला 'ही दृश्य स्फूर्ति' त्या 'स्फूर्तीला जाणणारा तो द्रष्टा' त्याहून निराळी वस्तु वाटते; - पण ज्ञान्याला, ते दृश्य द्रष्टाच आहे असे वाटते. दृश्य व द्रष्टा या दोन्ही स्थितीत एक द्रष्टाच आहे, दृश्य म्हणून निराळे कांही नाही असे तो पाहतो.

दृश्य जावोनिया द्रष्टे । द्रष्ट्यासीचि जै भेटे ।
तै एकलेपणे न घटे । द्रष्टेपणहि ॥१८-११५७॥

दृश्य पदार्थ द्रष्ट्याहून निराळा, द्रष्टाच आपल्या समोर झाला असे समजल्यावर दृश्यभाव जातो व त्याबरोबर द्रष्टृत्वही जाते.

तैसा दृश्य आणि द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा ।
पाहता एकीकाष्ठा । स्फूर्तिमात्र तो ॥

वरील अर्थाचेच प्रतिपादन करणारी ही अमृतानुभवातील ओवी आहे. दृश्य ही निराळी वस्तु आहे असे जाणणारा द्रष्टा व दृश्य हे दोन्ही खोटे आहेत. पण दृश्य म्हणजे मीच असे पाहणारा द्रष्टा खोटा नाही व ही स्फूर्तिही खोटी नाही, एवढेच नाही तर, नित्य अविनाशी आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. हाच सिद्धांत शंकराचार्यांनी बृहदारण्यकोपनिषदात प्रतिपादिला आहे.

दृष्टिरिति द्विविधा भवति लौकिकी पारमार्थिकी चेति ।
तत्र लौकिकी चक्षुसंयुक्ता अन्तःकरणवृत्तिः ।
सा क्रियते जायते विनश्यति च या तु आत्मनो दृष्टिः अग्न्युष्णप्रकाशादिवत्
सा द्रष्टुः स्वरूपत्वान्न जायते न विनश्यति ।

द्रष्ट्याहून दृश्य जेव्हा निराळे मानले जाईल तेव्हा पाहण्याची इच्छा पाहण्याची क्रिया होईल; पण द्रष्टाच केवळ असला म्हणजे द्रष्टा, दृष्यही मीच आहे असे म्हणेल, तेव्हा पाहण्याची क्रिया होत नाही. कारण आपणच आपल्याला पाहण्याची इच्छा करीत नाही म्हणून तो पाहतही नाही.

ब्रह्मसूत्रकारांना क्षेत्र म्हणजे काय हे समजलेच नाही असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात असे श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या वाङ्मयात कोठे स्पष्ट असे म्हटले नाही. ज्ञानेश्वरीतील १३ व्या अध्यायात -

वेदीचे बृहत्सामसूत्र । जे देखणेपणे पवित्र ।
परी तयाहि हे क्षेत्र । नेणवेचि ॥१३-६८॥
आणिक आणिकीहि बहुती । महाकवि हेतुमंती ।
यालागी मती । वेचिलिया ॥६९॥
परी ऐसे हे एवढे । का अमुकेयाचेचि हे फुडे ।
हे कोणाहि वरपडे । होयचि ना ॥७०॥

या ओव्या आहेत. त्यांच्या आधारे श्रीज्ञानदेवोपासक ब्रह्मसूत्रकार भगवान् व्यास यांच्यावर घसरलेले दिसतात. भगवत्प्रणीत वैदिक वाङ्मयावर आदर न ठेवता एखाद्या पंथागमावर पूज्य बुद्धी ठेवणाऱ्या श्रीज्ञानदेवोपासकासारख्या

लोकांनी वैदिक महात्म्याविषयी असे अनुदार उद्‌गार काढावे हे त्यांच्या शीलाला साजेसेच असते. श्रीज्ञानदेवोपासकांना आम्ही असे विचारतो की ब्रह्मसूत्रकारांना क्षेत्र म्हणजे काय हे न समजो पण त्या दृष्टीने पाहता मला समजले असे श्रीज्ञानेश्वरमहाराज तरी कोठे म्हणतात काय? क्षेत्र म्हणजे काय हे कोणालाच समजले नाही इतके बोलून-

आतां यावरी जैसे । क्षेत्र हे असे ।
तुज सांगो तैसे । साद्यंत गा ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी क्षेत्रात कोणत्या वस्तूचा समावेश होतो हे सांगण्यास सुरवात केली.

पै परतत्वा अरौते । स्थावरा आंतौते ।
जे काही होते जाते । ते क्षेत्रचि हे ॥

परब्रह्मानंतर जेवढे काही उत्पन्न झाले व नाश पावले असे वाटते ते सर्व क्षेत्रच होय. म्हणजे सर्वच सूक्ष्म-स्थूल सृष्टीच क्षेत्रात मोडते असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. असेच दुसरे कोणीच मानले नाही काय? येथे क्षेत्र शब्द आला असेल इतरत्र अनात्मा शब्द आला आहे एवढाच फरक. शंकराचार्यांनी तसेच मानले आहे हे आम्ही दाखविलेच आहे. पुनः श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी १५ व्या अध्यायात हा सर्व क्षेत्रसमूह वांझेच्या लेकराप्रमाणे किंवा मृगजळाप्रमाणे खोटा म्हणजे मुळीच अस्तित्वात नाही असे प्रतिपादन केले असल्यामुळे -

वांझेच्या लेका । कैची जन्मपत्रिका ।

अशा वस्तूच्या अस्तित्वाची, मालकीची काहीही यथार्थ कल्पना देणे कोण्याही शहाण्याला शक्य नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्यासह (स्वतः वगळून नाही) कोणासच क्षेत्र कळत नाही असे म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना जसे हे क्षेत्र संपूर्ण खोटे आहे असे अनुभवाने कळले तसे ब्रह्मसूत्रकारांनाही कळले होते.

ज्या महार्थमंजरीकाराच्या तत्त्वज्ञान प्रणालीचा श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वाङ्‌मयातून अल्पही मागमूस सांपडत नाही. ते तत्त्वज्ञान बळेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या गळ्यात बांधून श्रीज्ञानदेवोपासकच त्यावरच सर्व आपल्या चर्पटपंजरीची उभारणी करीत आहेत व शंकराचार्यांच्या द्वेषाचे गरळ ओकीत आहेत. मूळ मतभेदाचा मुद्दा समजला व त्याविषयी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मत काय आहे हे लक्षात आले म्हणजे लेखकाचे हे प्रलाप सन्निपातातले आहेत हे वाचक सहजच ओळखतो. श्रीज्ञानेश्वर महाराजांचा शैवाद्वैत संप्रदाय होय असे श्रीज्ञानदेवोपासकांनी आपल्या हाताचेच लावून दिले. शैवाद्वैत म्हणण्याला कोणाचाच विरोध नाही. ब्रह्माद्वैत जसे शंकराचार्य म्हणतात तसे त्यांना शिवाद्वैत, कृष्णाद्वैत, किंवा वैष्णवाद्वैत कोणतेही अद्वैत विरोधी नाही. अद्वैत मानायचे कसे हाच मुख्य प्रश्न असल्यामुळे अद्वैत कसे मानता येते याचा जो त्यांनी ऊहापोह केलेला आहे त्याप्रमाणे जे मान्य करतील त्या कोणाचेही अद्वैत शंकराचार्य यांना मान्य आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज शिवाला, कृष्णाला, विष्णूला पूर्ण ब्रह्मच समजतात. म्हणून त्यांच्या अद्वैताला शिवाद्वैत नांव दिले तर त्यांची हरकत आहे असा अर्थ नव्हे. – पण शिवाद्वैत म्हणून जो काश्मीरकडे पंथ आहे त्या पंथाचे श्रीज्ञानेश्वरमहाराज अनुयायी आहेत असे दाखविण्याचा श्रीज्ञानदेवोपासकांनी जो भारी उपद्‌व्याप मांडला आहे त्याचा मात्र आम्ही निषेध करितो. आदिनाथ, सांप्रदायाचे मूळ असल्यामुळे तो पंथ शिवाद्वैत मताचा आहे हे त्यातून कसे निघू शकते? आणि या लेखाचे द्वारा, श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनांच्या आधारे तो निषेध आम्ही सप्रमाण वाचकांच्या पुढे मांडला आहे.

शंकराचार्यांनी ज्ञानेश्वरांच्या परंपरेतील एखाद्या गुरूचा पराजय केल्याची कथा अजून तरी कोठे सांपडत नाही असे श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात. ब्रह्मसूत्र भाष्यात वैष्णवमताचे खंडन करताना, तुमच्या प्रमाणेच आचार्य म्हणतात - तेवढ्या बाबतीत आमचे व वैष्णवांचे मतैक्य आहे व त्याचे आम्ही खंडनही करीत नाही. पण काही विरुद्ध अंश आहे त्याचे खंडन करणार आहो. म्हणजे अनुकूल मताचे खंडन आचार्यांनी केले नाही व ते खंडन करणे म्हणजे स्वतः आपणच आपले खंडन केले असे होणार. यावरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या परंपरेतील तत्त्वज्ञान्याचे आचार्यांनी खंडन केले नाही, हा श्रीज्ञानेश्वरहाराजांच्या गुरुपरंपरेचे तत्त्वज्ञान आचार्यमताप्रमाणे आहे याचा सबळ पुरावाच आहे. स्वमतविरोधी जर श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गुरुपरंपरा असती तर त्यांचे खंडन आचार्यांनी अवश्य केले असते. कारण स्वमतविरोधी सर्व मतांचे त्यांनी खंडन केले आहे.

नाथसंप्रदायात सदसद्विलक्षण किंवा अनिर्वचनीय माया मानली नाही; कारण नाथसंप्रदाय मायेचे सत् लक्षण सांगतो हे म्हणणे सर्वथा खोटे आहे. जड

विनाशी जगाचे कारण माया श्रीज्ञानेश्वर महाराजांनी खोटी म्हणजे अनिर्वचनीय अशीच मानली आहे हे आम्ही वर दाखविलेच आहे. श्रीज्ञानदेवोपासक जो नाथसंप्रदाय व त्याचे तत्त्वज्ञान म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या गळ्यात बांधू पाहतात तो नाथसंप्रदाय व ते तत्त्वज्ञान श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे नव्हे. शंकराचार्यांप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जर माया भ्रांतिरूप म्हणजे खोटी अनिर्वचनीय, सदसद्विलक्षण मानली नसती तर तिच्या नाशाचा साधनोपदेश श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगण्याचे कारण काय?

पै अन्यथाबोध आघवा । मावळोनि तया पांडवा ।
बोधमात्रेच जीवा । ठावो होय ॥१८-९६४॥

या ओवीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अन्यथाबोध जावो म्हणून सांगितले आहे. तो अन्यथाबोध मग कोणता व तो कशामुळे आहे याचा श्रीज्ञानदेवोपासकांनी विचार करावा. कारण श्रीज्ञानदेवोपासकांच्या नाथ तत्त्वज्ञानात त्याला स्थान नाही. ''माया ही परमेश्वराची स्वभावशक्ति आणि त्या स्वभावशक्तीनेच परमात्मा जगद्रूप झाला; म्हणून ते जगतही ब्रह्मरूपच आहे. येथे मायाभ्रमाला जागा आहे का?'' हे श्रीज्ञानदेवोपासक आचार्यभक्तांना विचारतात. त्याला उत्तर हेच की असे आहे तर ब्रह्मज्ञान होण्याला कांही जगाचा प्रतिबंधच होणे शक्य नाही. मग,

जाहला म्हणोनि विसर । आत्मबोधाचा ॥७.१०३॥
येणे उपाये मज भजले । ते हे माझी माया तरले ॥७-१०२॥
अहंममता भ्रांति । विषयांध झाले ॥
म्हणेनि माझेचि मी नव्हती । माझेचि मज नोळखती ॥६७॥
कां जे योग माया पडळे । हे जाहले असती आंधळे ॥
तेणे भूते भांबावली ॥७-१७१॥
जो परमात्माचि परि दुसरा । जे अहंकार निद्रा निदसुरा ।
म्हणोनिया स्वप्नाचिया वोरबारा । संतोषे शिणे ॥
अविद्येचे पालवे झाकले । अविद्येची जवनिक फिटे ॥
तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वाया ॥

अशा अनेक ओव्या आलेल्या आहेत व त्यात मायेमुळे ब्रह्माद्वैत जाणण्यास अडथळा होतो हे कां दाखविले आहे? ज्ञानेश्वरीत अहिंसेवर व्याख्यान करताना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी दुसऱ्याची मते देऊन आपले अहिंसेविषयी मत सांगतो असे म्हटले आहे. त्या ओवीचा आधार घेऊन श्रीज्ञानेश्वरमहाराज शंकराचार्याच्या मायावादाचे स्वरूप सांगत असताना ''आचार्यभक्त हे पहा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आचार्याच्या मायावादाचा स्वीकार केला आहे'' असे म्हणून, त्या ओव्यांचा पुरावा देतात, असे श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात. येथे श्रीज्ञानदेवोपासकांनी आपलेच तुणतुणे वाजविण्याच्या धार्ष्ट्याची परमावधि केली आहे. 'अहिंसा' व्याख्यानात जसे परमत सांगून व त्यांत दोष दाखवून आपले मत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे तसे हे परमत व यात हा दोष, आता माझे मत हे असे आहे असे कोठेच मायेविषयी म्हटले नाही. बाह्यांग कसे असेल ते सांगवत नाही; पण श्रीज्ञानदेवोपासकांचे अंतरंग मात्र शंकराचार्यांच्या निरर्थक द्वेषाने काळेकुट्ट आहे हे मात्र त्यांच्या लिखाणावरून दिसून येते. ज्याप्रमाणे एकचक्षु पुरुषाला त्याच्या नीट डोळ्याच्या बाजूने तेवढे दिसते, अंध झालेल्या डोळ्याच्या बाजूचे दिसत नाही. त्याप्रमाणे श्रीज्ञानदेवोपासकांना आचार्यांच्या मायावादाचे विचार तेवढे दिसावेत व जगद्ब्रह्मविचार मात्र दिसू नयेत हे आश्चर्य आहे.

श्रीज्ञानदेवोपासक म्हणतात - शक्ति व शक्त हा केवळ शब्दांच्या व्याकरण व्यवस्थेतील भेद आहे. तात्विक भेद नव्हे.

न च धर्मिणो धर्मी भिद्यते ।

धर्मीपासून त्याचा धर्म भिन्न नाही, हा नाथसांप्रदायाचा सिद्धांत आहे. परमेश्वराची शक्ती व्यतिरेकात जड होत नाही. ती नित्य चितच रहाते. यावर आमचे उत्तर हे आहे. हा नाथसांप्रदायिकाचाच सिद्धांत आहे असे नाही. आचार्यांचाही हाच सिद्धांत आहे. याच सिद्धांताचे बळावर आचार्य श्रीज्ञानदेवोपासकासारख्या तत्त्ववेत्त्यांना विचारतात की ब्रह्म चैतन्यस्वरूप व त्याची शक्तिही तद्रूपच, मग अक्षरब्रह्मापासून झालेले जगत् अक्षरच नको का राहावयाला? ते क्षर कसे होणार? आणि आपण तर आपल्या व्याख्यानात (१ जुलै १९५१) अक्षरब्रह्मच जगद्रूप झाले की क्षर होते म्हणता ? ही विसंगति नाही का? धर्म व धर्मी जर भिन्न होत नाही असे तुम्ही म्हणता आणि तुम्हीच जगद्रूप ब्रह्माला त्याच्या मूळ अविनाशी धर्माहून कसे भिन्न करता? आचार्य म्हणतात, वस्तुतः ब्रह्म सच्चिदानंद, माया सच्चिदानंद व तिचे कार्य जगतही सच्चिदानंद आहे. ते ब्रह्म आपल्या धर्माहून

केव्हाहि भिन्न राहत नाही. ही वस्तुस्थिती ज्यांना कळत नाही ते अज्ञानी लोक होत, त्यांना ब्रह्म कळत नाही. जगतही ब्रह्मरूप दिसत नाही. ते जडविनाशी दिसते. याला कारण भगवंताच्या मायेने ते भ्रांत झाले आहे.

श्रीज्ञानदेवोपासकांनी आचार्यांच्या संन्यासनिष्ठेवर जे व्याख्यान दिले आहे ते प्रस्तुत वादाच्या मुद्याशी असंबद्ध आहे. म्हणून त्याचे आम्ही परीक्षण करीत नाही. पण एवढे मात्र आम्ही सुचवू इच्छितो की आचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा नीट अभ्यास न करिता आणि ज्ञानेश्वरीचाही नीट अभ्यास न करिता जसे श्रीज्ञानदेवोपासकांनी नाथ तत्त्वज्ञान म्हणून भरमसाट व्याख्यान झोडले तसेच तेही व्याख्यान आहे. जुने विचार सांगणारा काय आपली विद्वत्ता मिरवणार? व त्याकरिता त्याची उठाठेव तरी काय असणार ? आपल्या विद्वत्तेची शैली जर कोणी मिरवू शकत असेल तर तोच मिरवू शकतो व त्याकरिताच त्याचा सर्व प्रयत्न असतो की ज्याला जुन्या विचारसरणीला सोडून काही नवीन सांगावयाचे आहे किंवा सर्व लोक मानतात त्याप्रमाणे अमुक ग्रंथकाराचे मत नसून आम्ही म्हणतो त्याप्रमाणे त्याचे मत आहे अशा आपल्या जावईशोधाची ज्यांना खुमखुमी असते. शंकराचार्यानंतर गीतेवर व्याख्यान करणाऱ्याला ज्या ज्या व्याख्यानकर्त्यांची आचार्यांच्या संन्यासनिष्ठेवर टीका केली ती पुष्कळशी अशीच भरमसाट व अज्ञानमूलक आहे.

दोन संप्रदाय कां ?

'नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान व शांकरतत्त्वज्ञान जर भिन्न नाही तर एकाच तत्त्वज्ञानाच्या दोन संप्रदायपरंपरा कशाला अस्तित्वात आल्या असत्या?' हा एक सवाल श्रीज्ञानदेवोपासक करितात. त्याचे उत्तर असे आहे की वैदिक ज्ञानभक्तिप्रणालीत गुरु आणि ईश्वर अशी दोन एकाच परब्रह्माची उपास्य रूपे आहेत. दोघांचीही उपासना करावी लागते.

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥

ही श्रुति प्रमाण आहे. प्रथम ईश्वराचे स्वरूप प्राप्य राहते व गुरुस्वरूप ईश्वराचे स्वरूप प्राप्त करून देणारे असते. ईश्वरच जीवाला आपले स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून गुरुरूप होतो. ज्ञानानंतर गुरु व ईश्वर हे एकरूपच होतात. पहिले गुरुने सांगितल्याप्रमाणे ईश्वराची उपासना करावयाची असते. ईश्वराची उपास्यरूपे मुख्यतः दोन आहेत. शिव व विष्णु. हे शुद्ध कारणब्रह्मच आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी भगवान् श्रीकृष्णाचे म्हणणे स्पष्ट करताना -

तरी श्रद्धा वस्तूशी आदरू । करिता जाणिजे प्रकारू ।
जरी होय सद्गुरू । सदाशिवू ॥

विष्णुरूपाचे प्रेम कसे करावे याची खूण शिवाला सद्गुरु केल्याने मिळते. व त्याचप्रमाणे शिवाचे प्रेम कसे करावे याची खूण विष्णूला सद्गुरु केल्याने मिळते.

माधवो माधवावीशौ परस्परनुतिप्रियौ ।

शिव व विष्णु हे परस्पराचे प्रेमपात्र आहेत. म्हणून परस्परांच्या प्रेमाची खूण परस्परांना गुरु केल्याने मिळते. शंकराचार्यांच्या संप्रदायात आदिनारायणापासून परंपरा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या नाथसंप्रदायात ईश्वर म्हणून विष्णूची भक्ती आहे हे त्यांच्याच भक्तीवरून दिसते. अर्थात् विष्णुभक्तीचे रहस्य समजण्याकरिता विष्णुभक्तशिवापासून गुरुपरंपरा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजापर्यंत जी नाथपरंपरा आली ती पुढे विसोबा खेचर, नामदेव, चोखामेळा येथपर्यंत गेली. त्यांच्याही उपासनेवरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या परंपरेत विष्णु उपासना आहे हे स्पष्ट होते; म्हणूनच त्या सर्वांना वैष्णव म्हटले जाते.

शेवटी आम्ही श्रीज्ञानदेवोपासकांना एवढेच सुचवितो की, तुम्ही व तुमचे महेश्वरानंद जगत् ब्रह्मरूपच आहे म्हणता याविषयी कोणाचा वाद नाही. हे आचार्यांनाही संमत आहे. पण विनाशी भावही ब्रह्मच आहे म्हणता हे आचार्यांना मान्य नाही. ते म्हणतात सच्चिदानंद ब्रह्मापासून झालेले जगत् सच्चिदानंदच पाहिजे व तसेच आहेही. अज्ञानी लोकांना, जे जगताचे सच्चिदानंद धर्म दिसत नाहीत, एवढेच नाही तर ते सच्चिदानंद धर्माहून विपरीत धर्माचे दिसते हा भ्रम आहे व तो ब्रह्माचे अज्ञानामुळे झाला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा दुसऱ्याला निराग्रह बुद्धीने विचार करण्याचा उपदेश करण्यापेक्षा स्वतःच आधी महेश्वरानंदाच्या तत्त्वज्ञानातून डोके वर काढून शांकरसिद्धांत नीट समजून घ्या म्हणजे तुम्हालाच तुमच्या प्रतिपादनात कितीसा तथ्यांश आहे हे कळून येईल.

आणि नाना लवणकणाचिये राशी । क्षारता एक जैशी ।

समुद्राच्या पाण्याचे मीठ झाले म्हणजे त्या मिठात क्षारता राहत नाही असे होत

नाही. तसे ब्रह्मच जर जगत् झाले तर ते, ब्रह्मधर्माचे स्वरूप सत् चित् आनंदपूर्ण असे अनुभवाला यायला पाहिजे, त्याच्या विरुद्ध धर्माचे अनुभवाला जोपर्यंत येते तोपर्यंत तो अनुभव अज्ञानभ्रांतिजन्यच मानावा लागेल असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचेही म्हणणे आहे. यावरून श्रीज्ञानेश्वर महाराज कोणाला अनुसरतात ते पाहा.

ooo